# निर्देश पत्र
## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय : मा. महासभा दि. १५/०१/२०१५ रोजी स. ११.०० वा प्रकरण क्र. ४४ ते ५६

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख : सुरक्षित

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | पूरक कार्यसूची प्रकरण क्र. ५७ ते ६ |

(४)

१४/१५

अभिलेखांचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ / ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १२/०१/२०१५.

## मा. महासभा दि. १५/०१/२०१५

### पुरक घोषणा

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक १५/०१/२०१५ रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ५७ | सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र एल. मेहता यांचा दिनांक ०७/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>------------------------------<br>मार्केट व खेळाचे मैदान असे आरक्षण करण्याबाबत. |
| ५८ | सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र एल. मेहता यांचा दिनांक ०७/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>------------------------------<br>आरक्षण क्र. २१४ ही जागा मार्केट आरक्षणाखाली घेणेबाबत. |
| ५९ | सन्मा. सदस्या सौ. निलम ढवण यांचा दिनांक ०८/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>------------------------------<br>मे. काऊटाऊन लँड डेव्हलपमेंट प्रा.लि. यांना ३० वर्षासाठी शाळेची इमारत बांधणेसाठी भाडेपट्यावर देणेबाबतचा करारनामा रद्द करुन शाळेसाठीचा भूखंड महानगरपालिकेच्या ताब्यात घेणे व जागेवर शाळे ऐवजी नाट्यगृह बांधण्याच्या प्रस्तावाबाबत. |
| ६० | सन्मा. सदस्य श्री. शरद केशव पाटील यांचा दिनांक ०८/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>------------------------------<br>शहरातील आरक्षण विकसित करण्याचे धोरण ठरविणे बाबत. |
| ६१ | सन्मा. सदस्य श्री. प्रशांत केळूसकर यांचा दिनांक ०८/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>------------------------------<br>मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर क्र. ०३ येथील चौकास उमाकांत मिश्रा चौक व मिरारोड (पूर्व) जनरल अरुण कुमार वैद्य मार्गावरील (कनकिया रोड) सिनेमॅक्स समोरील चौकास ''संत गुरु गोविंद सिंह चौक'' असे नामकरण करणे. |

(हरेश ल. पाटील)
**महापालिका नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

मा. महासभा सुचना क्रमांक ०४, दि. ०५/०१/२०१५ सोबतची विषय पत्रिका

सभा गुरुवार दि. १५/०१/२०१५

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे** – |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – |
| ४४ | दि. १९/०७/२०१४ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** – |
| ४५ | स्थायी समितीच्या एका सदस्याने राजीनामा दिल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये एक (१) सदस्याची नेमणूक करणे.<br>राजीनामा दिलेल्या सदस्याचे नांव :- १) श्रीम. वंदना मंगेश पाटील. (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) |
| ४६ | वृक्ष प्राधिकरण समितीच्या एका सदस्याने राजीनामा दिल्यामुळे वृक्ष प्राधिकरण समितीवर एक (१) सदस्याची नेमणूक करणे.<br>राजीनामा दिलेल्या सदस्याचे नांव :- १) डॉ. आसिफ शेख. (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** – |
| ४७ | पुर्नविनियोजन प्रस्तावास मान्यता देणे बाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| ४८ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ८२ नुसार नगरपालिका निधी स्थापन करणे व त्यामध्ये अशासकीय संस्था, सामाजिक संस्था, धर्मदाय संस्था, लोकप्रतिनिधी, खाजगी विकासक किंवा अनिवासी भारतीय यांच्याकडून पैसा, वस्तू, साहित्य इ. तसेच बांधकाम स्वरुपात व परकीय चलनात मिळणारी मदत, देणगी, भेट इ. स्विकारण्यास परवानगी मिळणेबाबत. |
| ४९ | मिरा-भाईंदर महानगरपालिकेस नव्याने प्राप्त होणाऱ्या बसेस पार्किंगसाठी तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्था करणे बाबत. |
| ५० | कलम ४१ (अ) अ, जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ व कलम १५ पर्यावरण (संरक्षण), कायदा, १९८६ याबरोबर नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० प्रमाणे निर्देश-भांडवली खर्चामधुन २५ टक्के तरतुद नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्पासाठी करणेबाबत. |
| ५१ | आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.<br>मिरा भाईंदर महानगरपालिका वाढीव पाणी पुरवठा योजना (एम.आय.डी.सी.स्त्रोत) |
| ५२ | विविध विकास कामांच्या सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत. |
| ५३ | महानगरपालिकेच्या मालमत्ता कर धारकांना आकारण्यात आलेले व्याजदर कमी करणेबाबत. |
| ५४ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०७ - अ अन्वये स्थानिक निधी लेखापरिक्षा यांचे कडील सन २०११-१२ चा लेखापरिक्षा अहवाल सादर करणेबाबत. |
| ५५ | मा. उच्च न्यायालयाच्या दि. २८/०३/२०१४ च्या आदेशानुसार भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालय मनपातर्फे चालविणे व त्यासाठी आवश्यक बांधकामाविषयक कामे, औषधे व उपकरणे खरेदी, हाऊसकिपिंग, लॉंड्री इ. विविध बाबींसाठी निविदा मागविण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. |
| ५६ | मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या क्रिडा संकुल इमारतीचा वापर सुरु करण्यासाठी धोरण निश्चित करणेबाबत. |
| -- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०५ जानेवारी २०१५

E/Backup- 2/D/MD/Nagarsachiv/Vishaypatrika/Vishaypatrika-Mahasabha 12-17

अ.क्र./सचिव/पुढे/२५-०१/२८-४५ दि. ८/१/१५

# नरेन्द्र एल. मेहता

**विरोधी पक्ष नेता**

**माजी महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, दुसरा मजला,
छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे - ४०१ १०१
दुरध्वनी : २८०४५२५५ / २८१९२८२८ EXT : १३२/१३४
मोबाईल : ९८२१३४६११५

कार्यालय : सेव्हन इलेव्हन मेंन्शन, सेव्हन स्केअर अॅकॅडमी स्कुल समोर, दिपक हॉस्पिटल लेन, मिरारोड (पूर्व) E-mail : narendramehta711@gmail.com

जावक क्र. विपने/193/2014-15 दिनांक : 7/1/2015

१५/०१/२०१४ च्या महासभेमध्ये "ज" खाली प्रस्ताव घेणेबाबत..

प्रकरण क्र. ५७ करिता

प्रति,
मा. नगरसचिव साहेब
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय - मार्केट व खेळाचे मैदान असे आरक्षण करण्याबाबत...**

मिरारोड येथे एन.एस.स्कूल ते सिल्व्हर पार्क या परिसरामध्ये नागरीकांसाठी मार्केट, खेळाचे मैदान नसून तेथील नागरीकांना या सर्व सोयी व सुविधा महानगरपालिका देवू शकत नाही. म्हणून त्या भागात नविन आरक्षणे महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करण्याचे सुचविण्यात येत आहे.

तरी सदर परिसरातील लोकांचा विचार करता वरील सर्व्हे क्रमांकामध्ये उपरोक्त आरक्षण ठेवण्याचा प्रस्ताव "ज" खाली येत्या मा. महासभेत घेण्यात यावा.

सुचक :- अनुमोदक :-

# नरेन्द्र एल. मेहता

**विरोधी पक्ष नेता**

**माजी महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मनपा/सचिव/पु.चि/१९८-२०१४-१५, ७/१/१५

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, दुसरा मजला,
छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे - ४०१ १०१
दुरध्वनी : २८०४५२५५ / २८१९२८२८ EXT : १३२/१३४
मोबाईल : ९८२११३४६११५

कार्यालय : सेव्हन इलेव्हन मॅन्शन, सेव्हन स्केअर ॲकॅडमी स्कुल समोर, दिपक हॉस्पिटल लेन, मिरारोड (पूर्व) E-mail : narendramehta711@gmail.com

जावक क्र. विप्रने/192/2014-15 दिनांक : 7/1/2015

<u>१५/१/२०१४ च्या महासभेमध्ये "ज" खाली प्रस्ताव घेणेबाबत..</u>

प्रकरण क्र. ५८ करिता

प्रति,
**मा. नगरसचिव साहेब,**
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

<u>विषय - आरक्षण क्र.२१४ ही जागा मार्केट आरक्षणाखाली घेणेबाबत..</u>

मिरा भाईंदर क्षेत्रात भाईंदर (प.) येथे गोल्डन नेस्ट ते हटकेश या भागात फार मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे. व नविन गृहसंकुलनाच्या बांधकामामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. यामुळे महानगरपालिकेने तयार केलेल्या रस्त्यांवर दोन्ही बाजूस मोठ्या प्रमाणात फेरिवाल्यांचे अतिक्रमण वाढत आहे. यामुळे रहदारीस व नागरीकांना मोठ्या प्रमाणात त्रास व अडचण सोसावी लागत आहे.

गोल्डन नेस्ट ते हटकेश या दरम्यान महानगरपालिकेचे मार्केट आरक्षण नाही ही बाब या परिसरात राहणाऱ्या नागरीकांची गरज आहे. या कारणाने सदर परिसरातील रस्त्यावरील फेरिवाल्यांच्या अतिक्रमणाचा विचार करता व नागरीकांना व विद्यार्थ्यांना होणारा रहदारीच्या त्रासाचा विचार करता या परिसरात मार्केट आरक्षण असणे हि आवश्यक बाब आहे.

गोल्डन नेस्ट ते हटकेश परिसरातील लोकसंख्येची गरज, विकास व हित लक्षात घेता आरक्षण क्र. २१४ हि जागा मार्केट आरक्षणा खाली येण्यासाठी योग्य असल्याने, महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मार्केट करीता फेरबदल करण्यासाठी सदर कलमान्वये हा विषय "ज" खाली येत्या मा. महासभेमध्ये घेण्यात यावा.

सुचक :- [signature] अनुमोदक :- [signature]

# नरेन्द्र एल. मेहता

**विरोधी पक्ष नेता**

**माजी महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, दुसरा मजला,
छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे - ४०१ १०१
दुरध्वनी : २८०४५२५५ / २८१९२८२८ EXT : १३२/१३४
मोबाईल : ९८२१३४६११५

कार्यालय : सेव्हन इलेव्हन मेंन्शन, सेव्हन स्केअर ॲकॅडमी स्कुल समोर, दिपक हॉस्पिटल लेन, मिरारोड (पूर्व) E-mail : narendramehta711@gmail.com


जावक क्र. मनपा / विपने / १८१ / २०१४-१५ दिनांक : ०८/१/२०१५

नगरसचिव विभाग
म.प./न.प./ज.पै./आ.क्र. ६३ / २०१४-१५
दिनांक :- ०८/०१/२०१५

प्रति,
मा. महापौर सो.,
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**<u>विषय :- "ज" प्रस्ताव प्रथम घेणेबाबत...</u>**

महोदय,

महानगरपालिकेने दि. १५/०१/२०१५ रोजी मा. महासभा आयोजित केलेली आहे. विषयपत्रिकेच्या अनुषंगाने मी सभा कामकाजानुसार "ज" चे प्रस्ताव आपणांकडे दिलेले आहे.

तरी विषयपत्रिकेवर ठेवलेल्या विषयांच्या क्रमांकाच्या अगोदर मी दिलेले "ज" च्या प्रस्तावांना प्रथम प्राधान्याने मा. महासभेत ठेवण्यास विनंती आहे.

आपला,

(नरेन्द्र एल. मेहता)
विरोधी पक्षनेता

प्रत,
मा. नगरसचिव सोहेब,
मिरा-भाईंदर म.न.पा.

प्राप्त दि. ०८/०१/२०१५
बैठक क्र. ११:०५
[signature]
09/01/2015

स्वीकार/पु.क्र./१८/३/२०१४-१५,दि.८/१/१५

**सौ. निलम हरिश्चंद्र ढवण**

**नगरसेविका**

**गटनेता-शिवसेना**

मिरा भाईंदर महानगरपालिका

**विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मुख्य कार्यालय,**

**स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),**

**ता. जि. ठाणे - ४०१ १०१.**

**निवास** : बी/१०३, सरस्वती सदन नं. ३, सरस्वती नगर, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५.

**कार्यालय** : शॉप नं. ३, साईगिरी सोसायटी, साईबाबा मंदिराजवळ, साईबाबा नगर, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५.

**मोबाईल : ९८६९२६५६२२ / ८६५५८८०५२५**

जावक क्र. प्रकरण क्र. ५८ करिता

दिनांक : ८/१/२०१५

प्रति,

मा. नगरसचिव

नगरसचिव विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय - दि.१५/०१/२०१५ रोजीच्या मा. महासभेसमोर "ज" अन्वये विषय घेणेबाबत.

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमधील दहिसर चेकनाका जवळील मौजे महाजनवाडी, स.क्र. १०७/१पै.,१पै., १०८/२, १०९/१ ते ७,८पै.,१० ते १४,१५पै.,१५पै.,१६,१७पै.,१८ ते २८ या औद्योगिक वापराच्या जागेमध्ये रहिवास वापराच्या गृहप्रकल्पासाठी (I to R) महानगरपालिकेने मंजूरी दिलेली आहे.

सदरच्या गृहप्रकल्पामध्ये नागरी सुविधा क्षेत्र म्हणून ७७८१.०२ चौ.मी. क्षेत्राचा भूखंड दर्शविलेला असून सदरचा भूखंड महानगरपालिकेच्या मालकीचा झालेला आहे. सदरच्या नागरी सुविधा क्षेत्राच्या भूखंडाच्या एकुण ७७८१.०२ चौ.मी. क्षेत्रापैकी ३८९०.५१ चौ.मी. भूखंडावर शाळेची इमारत बांधणेसाठी विकासक मे. काऊटाऊन लॅन्ड डेव्हलपमेंट प्रा.लि. यांना महानगरपालिकेने मंजूरी दिलेली आहे.

सदर शाळेच्या सुविधाऐवजी अन्य सुविधा विकसीत करण्यासाठी मा.आ.श्री. प्रताप सरनाईक हे मागील ४ वर्षापासून पाठपुरावा करत असून याबाबतची माझ्यासह ईतर १५ नगरसेवकांचीही मागणी आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये नाट्यगृह या सुविधा शहरांच्या नागरीकांसाठी उपलब्ध नसल्यामुळे तेथे नाट्यगृह बनविण्याची मागणी आम्ही करत आहोत. सदरच्या नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडापैकी राजकीय वरदहस्त लाभलेल्या या विकासकाने हा भूखंड हस्तांतरीत न करता, स्वतःच्या शाळेच्या वापराकरिता कुठलीही निविदा न काढता महानगरपालिकेच्या अधिका-यांना हाताशी धरुन व तत्कालीन आयुक्तांची दिशाभूल करुन गिळंकृत केला आहे.

तसेच सदरचे क्षेत्र मे. काऊटाऊन लॅंड डेव्हलपमेंट प्रा.लि. यांना ३० वर्षासाठी भाडेपट्ट्यावर देणेबाबत महानगरपालिकेबरोबर करारनामा झालेला आहे. सदरचा करारनामा रद्द करुन शाळेसाठीचा भूखंड महानगरपालिकेच्या ताब्यात घेणे व जागेवर शाळे ऐवजी नाट्यगृह बांधण्याचा प्रस्तावाबाबत निर्णय घेणेत यावा.

सबब सदरचा विषय दि.१५/०१/२०१५ रोजी होणा-या मा. महासभेसमोर "ज" अन्वये घेण्यात यावा, हि विनंती.

Dhawan

सौ. निलम ढवण

(नगरसेविका)

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत - माहितीस्तव :

मा. आयुक्त सो.

मिरा भाईंदर महानगरपालिका

প্রাপ্তি তাং- ৫/৭/৯৫

৩০০-১২-৩৪-৯৭

सचिव/पुस्तक घोषणा ७९/६ दि: ०८/०१/२०१५


# शरद केशव पाटील
नगरसेवक
गटनेता
सदस्य : स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय,
छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

श्रीकृष्ण निवास, दुसरा माळा, राधा कृष्ण मंदिराजवळ, राधा कृष्ण मंदिर मार्ग,भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे. मोबाईल : 9821213300


जावक क्र. ______________

दिनांक : ०८/०१/२०१५

१५-१-२०१५ रोजीच्या महासभेत "ज" खाली प्रस्ताव घेणे बाबत.

प्रकरण क्र. ६० करीता

प्रति,
मा. नगरसचिव साहेब,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

विषय : शहरातील आरक्षण विकसित करण्याचे धोरण ठरविणे बाबत.

महोदय,

मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण ३२६ आरक्षणे आहेत. सदर पैकी बरीच आरक्षणे ताब्यात देखिल आलेली आहेत. अशा प्रकारे ताब्यात आलेल्या आरक्षणात अनधिकृतरित्या अतिक्रमण होत चालेले आहेत. तरी ते अतिक्रमण रोखण्यासाठी शहरातील आरक्षणे कोणी विकसित करावीत यासाठी धोरण ठरविणे गरजेचे आहे. म्हणून हा विषय "ज" अन्वये घेण्यात यावा ही विनंती.

आपला विश्वासू,

(सही)

शरद केशव पाटील
गटनेता – नगरसेवक
मिरा-भाईंदर महानगरपालिका

প্রাপ্ত তারিখ ০১/০৭/২০১৫ ইং

08/01/2015

सचिव / पुरक घोषणा / २०/७-२०१४-१५ दि.०८/०१/१५


# प्रशांत एन. केळुसकर

**सभापती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय,**
**स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),**
**ता. जि. ठाणे - ४०१ १०१.**

**कार्यालय : सेवन इलेवन मेंशन, दिपक हॉस्पीटल लेन, सेवन स्क्वेयर एकेडमी जवळ, मिरा-भाईंदर रोड, मिरा रोड (पु.) जि. थाण- ४०१ १०७.**
**दूरध्वनी : 2810 5050 मोबाईल : 9320346115 ईमेल : keluskar_p@yahoo.in**


जावक क्र. मनपा/स.स्थायी स/७४/२०१४-१५ दिनांक : ०८/०१/२०१५

प्रति,

प्रकरण क्र. ६७ करिता

मा. नगरसचिव,

मिरा-भाईंदर महनगरपालिका

**विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन (एक) (ज) अन्वये प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणे बाबत...
मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर क्र. ०३ येथील चौकास उमाकांत मिश्रा चौक व मिरारोड (पूर्व) जनरल अरुण कुमार वैद्य मार्गावरील (कनकिया रोड) सिनेमॅक्स समोरील चौकास "संत गुरु गोविंद सिंह चौक" असे नामकरण करणे.

**महोदय,**

वरील विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर क्र. ०३ येथील चौकास यापुर्वी तत्कालिन नगरपरिषद काळात मा.स्थायी समिती सभा दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ अन्वये संत गुरु गोविंद सिह चौक असे नामकरण करण्यात आले होते, परंतु सदर नामकरण होण्यापुर्वी पासुनच सदर चौकास उमाकांत मिश्रा या नावाने ओळखले जात आहे. सद्यास्थितीत देखिल सदर चौकावर उमाकांत मिश्रा चौक असेच नाव दिलेले आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सिख वेलफेअर असोशिएशन यांच्या पदाधिकाऱ्यांशी प्रशासनाने व पदाधिकारी यांनी चर्चा केल्यानंतर सिख वेलफेअर असोशिएशन यांनी मिरारोड शांतीनगर सेक्टर ३ येथील चौका ऐवजी मिरारोड (पूर्व) जनरल अरुण कुमार वैद्य मार्गावर (कनकिया रोड) सिनेमॅक्स समोरील चौकाचे नामकरण न झाल्याने सदर चौकास "संत गुरुगोविंद सिह चौक" असे नामकरण करण्याची विनंती केली आहे. मा.स्थायी समिती सभा दि.२९/१२/२००१४ ठराव क्र.१२२ अन्वये सदर प्रस्तावास मान्यता देऊन अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणेस शिफारस केली आहे. खालील प्रमाणे नामकरण प्रस्ताव आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | मिरारोड, शांतीनगर सेक्टर ३ येथील चौक | उमाकांत मिश्रा चौक |
| २ | मिरारोड, जनरल अरुण कुमार वैद्य (कनकिया रोड)मार्गावरील सिनेमॅक्स समोरील चौक | संत गुरु गोविंद सिंह चौक |

वरील प्रमाणे नामकरण प्रस्तावाना महानगरपालिकेची अंतिम मान्यता मिळण्यासाठी माझा प्रस्ताव येत्या मा.महासभे पुढे ठेवण्यास विनंती आहे.

आपला विश्वासू

(प्रशांत एन केळुसकर)
सभापती
स्थायी समिती

प्राप्त दि. ०८/०१/२०१५
वेळ : ०५ : २०

08/01/2015

115

1

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०५/०१/२०१५.

## मा. महासभा

**मा. महासभा सूचना क्र. :- ०४, दिनांक ०५/०१/२०१५**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ______________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा गुरुवार दि. १५/०१/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०४, दि. ०५/०१/२०१५ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मिरा भाईदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. १५/०१/२०१५ रोजी आयोजित केली आहे.**
**सदर सभेकरिता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न |
|---|
| **२९ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. २९/०५/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ओपन लँड टॅक्स से संबंधित निम्मलिखित बिंदु स्पष्ट करे<br>इस सुचना का स्त्रोत / रिकॉर्ड का नाम दिजीए |
| अ) प्रत्येक बिल्डर पर लगाये गये टॅक्स को २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२, २०१२-१३ के हिसाब से विभाजीत कर बताइये? |
| ब) कौन कौन से ऐसे बिल्डर हो सकते है, जो आप द्वारा दी गई जवाब मे ओपन लॅन्ड टॅक्स के लिये नही लिये गये है? |
| **३० सौ. निलम हरिश्चंद्र ढवण मा. सदस्या यांनी दि. २८/०७/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) बाजार फी वसुली करणाऱ्या ठेकेदारांना फेरीवाल्यांकडून बाजार फी म्हणून किती फी वसुल करण्याची परवानगी आहे? |
| अ) महापालिकेने ठरवून दिलेल्या दरापेक्षा ठेकेदाराने जास्ती फी वसुल केल्यास महापालिका प्रशासनाला कसे कळते? |
| ब) ज्या ठिकाणाहून किंवा बाजारातून ठेकेदार बाजार फी वसुल करत आहेत, तेथे महापालिकेने दराबाबत सुचना फलक लावला आहे का? नसल्यास कधी लावणार? |
| क) ना फेरीवाला क्षेत्रामधून ठेकेदार बाजार फी वसुल करत आहेत, मात्र महापालिकेने फक्त फेरीवाला क्षेत्र गृहीत धरुन परवानगी दिली आहे. यामुळे महापालिकेच्या महसुलाचे नुकसान होते किंवा नाही? |
| ड) ना फेरीवाला क्षेत्रामधून बाजार फी वसुल करु नये या अटीवर ठेकेदाराला ठेका देण्यात आला आहे. मग ना फेरीवाला क्षेत्रामधून बाजार फी वसुल करणाऱ्या ठेकेदारांवर आजपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली आहे किंवा भविष्यात कोणती कारवाई करण्यात येईल? |
| **३१ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. २९/१०/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्ष झालेली आहे अश्या कर्मचाऱ्यांना मोफत घरे देण्याचा मा. महासभेत ठराव पारीत झालेला आहे काय? |
| अ) या ठरावाची तारीख, तसेच ठराव मंजूर झाला असल्यास सदर ठरावाची काय अंमलबजावणी करण्यात आलेली आहे? |
| ब) आतापर्यंत सफाई कामगारांकरीता किती घरे बांधण्यात आली व कोणत्या ठिकाणी? |
| क) मनपा मध्ये २५ वर्ष सेवा झाली आहे असे किती सफाई कामगार आहेत? त्यांचे नाव व पत्ते द्यावेत? |
| ड) आतापर्यंत किती कामगारांना घरे देण्यात आली? |
| इ) मा. महासभेत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान राबविणेचे ठराव सहमत झाले आहे का? |
| ई) सुवर्णजयंती नगरोत्थान म्हणजे काय या अंतर्गत काय सुविधा देण्यात आलेल्या आहेत याची संपूर्ण माहिती द्यावी? |
| **३२ श्रीम. मिरादेवी रामलाल यादव मा. सदस्या यांनी दि. ०८/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) बी.एस.यू.पी. योजना अंमलबजावणी करण्याकरीता २.५ वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक करणेकामी फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. प्रस्ताव पाठविण्याची तारीख काय? |
| अ) सदर प्रस्तावाबाबत शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली? |
| ब) वाढीव चटई क्षेत्राबाबत शासनाने पाठवलेली उत्तरांची माहिती देणे? |
| क) वाढीव क्षेत्र शासनाकडून मंजूरी मिळाल्यास बी.एस.यू.पी. योजना अंतर्गत चालू असलेल्या कामांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे का? |
| **३३ श्रीम. मिरादेवी रामलाल यादव मा. सदस्या यांनी दि. ०८/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) शांतता क्षेत्राचे लावलेल्या फलकाची साईज किती चौरस मीटर आहे? |
| अ) एकूण लावलेल्या प्रत्येकी साईजप्रमाणे किंमत किती? |
| ब) एकूण किती खर्च आलेला आहे? |
| क) शांतता क्षेत्र लावलेल्या फलकाच्या ठिकाणी योग्यतेने पालन होते का आणि सदरची जबाबदारी कोणाची? |

| |
|---|
| ड) आतापर्यंत शांतता क्षेत्राचे उल्लंघन करणाऱ्या लोकांवर कारवाई करण्यात आली? नाव व त्यांची एकूण दंडात्मक कारवाई केली त्याची माहिती? |
| **३४ डॉ. नयना मनोज वसाणी मा. सदस्या यांनी दि. १३/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) राशनिंग कार्यालयाकरीता भाड्याने जागा उपलब्ध करुन देणे तसेच सदर ठिकाणी पाणी मीटर कार्यशाळेचेही बांधकाम करुन घेणे असा ठराव पारित झाला होता का? |
| अ) सदर ठरावाच्या अनुषंगाने राशनिंग कार्यलय उभारण्यात येऊन भाड्याने देण्यात आले आहे. तरी पाणी मीटर कार्यशाळेचे बांधकाम का झाले नाही? |
| ब) बांधकाम झाल्यास त्या ठिकाणी पाणी मीटर तपासणी कार्यालयाचे विधिवत काम का सुरु झाले नाही? |
| क) या विषयावर संबंधित अधिकाऱ्याने काय कारवाई केली त्याचा संपूर्ण तपशिल द्यावा? |
| **३५ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. १६/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडी प्लास्टीक पिशव्या जप्त करणेबाबत महाराष्ट्र शासनाने काढलेल्या जी.आर. कॉपी देणे. |
| अ) ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्या जप्ती करणेबाबत देण्यात आलेल्या आदेश प्रती. |
| ब) महानगरपालिका क्षेत्रात आजपर्यंत ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्या एकूण किती जप्त केल्या आहेत? |
| क) महापालिकेने ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्या जप्त केलेल्या दंडाची माहिती देणे. |
| **३६ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. २५/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मा. महासभा दि. १६/०५/२०१३ मध्ये घेतलेला माझ्या प्रश्ना (रिलायन्स) संबंधीत जे काही आश्वासन मला देण्यात आले होते त्याबाबत आतापर्यंत काय कारवाई केली आहे? |
| अ) मा. महासभा दि. ०५/०६/२०१३ मध्ये घेतलेला माझा प्रश्न ओ.एल.टी. बाबत दिलेल्या आश्वासनबाबत आजपर्यंत काय कारवाई केली आहे? |
| ब) प्रॉपर्टी रजिस्टर बनविण्यासाठी नियमानुसार बनविण्यासाठी आतापर्यंत काय केले आहे. याबाबतची माहिती त्वरीत देण्यात यावी. प्रॉपर्टी रजिस्टर बनविण्यासाठी बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये काय कायदा आहे? |
| **श्रीम. दिप्ती शेखर भट्ट मा. सदस्या यांनी दि. १०/११/२०१४ रोजी विचारलेला प्रश्न** |
| मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) शांतीनगर येथील आर.जी. च्या जागांबाबत खालील प्रश्न चर्चेसाठी सादर करण्यांत येत आहेत. |
| १) आर.जी.च्या कोणकोणत्या जागा महापालिकेतील संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने हस्तांतरीत झालेल्या आहेत? जर असेल तर त्या कोणत्या? कोणत्या आर.जी. जागेवर महापालिकेमार्फत काम सुरु करण्यात आलेले आहे. |
| अ) आर.जी. मध्ये फेरबदल करण्यांत येऊ शकतो का? तसेच या अनुषंगाने पत्र क्र.मनपा/नर/३१४९/२००७-०८,दि.१२/१२/२००७ व पत्र क्र. एस.एस.बी.-२००७/३१३, दि. १८/१२/२००७ या पत्रांचा खुलासा देण्यात यावा. |
| ब) फेरबदल करण्यांत आला असेल तर तो कोणत्या नियमाने करण्यांत आला? |
| क) विकासकर्तानेे मंजुर नकाशाचे उल्लंघन केले असेल तर अशा विकासकर्तावर आपण कोणती कार्यवाही करतो? |
| ड) मिरा भाईंदर महानगरपरलिका आरक्षित जागेच्या मंजूर नकरशाच्या अटीशर्तीचे उल्लंघन केल्याचे दिसून आल्यावर त्याच्यावर गुन्हा दाखल केलेला असताना आपण त्याच्या दुसऱ्या प्लॅनला मंजूरी देऊ शकतो का? |
| इ) आर.जी. आरक्षित जागेवर प्लॅन व्यतिरिक्त काम मंजूर करु शकतो का? मंजूर केलयास कोणतया अधिनियमाने करु शकतो? ह्याचा खुलासा करावा. |
| ई) मी दिलेल्या दि. १०/०५/२०१३ च्या पत्रान्वये मिरारोड (पूर्व) मधील कोणत्या आरक्षित आर.जी. जागा व मोकळी जागा (ओपन स्पेस) कोठे कोठे वापरण्यात आलेल्या आहेत त्याचा सविस्तर खुलासा करावा. |
| **श्री. जुबेर इनामदार मा. सदस्य यांनी दि. १०/११/२०१४ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका मा. स्थायी समिती सभा दि. २१/०८/२०१४ प्रकरण क्र. ७४, ठराव क्र. ७१ अन्वये महानगरपालिका अधिकारी व प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे या बहुमताने मंजूर झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने महापालिकेने सदर विषयाबाबत काय कारवाई केलेली आहे? |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

**मा. महासभा सुचना क्रमांक ०४, दि. ०५/०१/२०१५ सोबतची विषय पत्रिका**

**सभा गुरुवार दि. १५/०१/२०१५**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे –** |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| ४४ | दि. १९/०७/२०१४ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका –** |
| ४५ | ~~मिरा भाईंदर महानगरपालिकेवर ५ व्या नामनिर्देशित पालिका सदस्याची नेमणूक करणेबाबत.~~ |
| ४६ | स्थायी समितीच्या एका सदस्याने राजीनामा दिल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये एक (१) सदस्याची नेमणूक करणे.<br>राजीनामा दिलेल्या सदस्याचे नांव :- १) श्रीम. वंदना मंगेश पाटील. (राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी) |
| ४७ | वृक्ष प्राधिकरण समितीच्या एका सदस्याने राजीनामा दिल्यामुळे वृक्ष प्राधिकरण समितीवर एक (१) सदस्याची नेमणूक करणे.<br>राजीनामा दिलेल्या सदस्याचे नांव :- १) डॉ. आसिफ शेख. (राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी) |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** |
| ४८ | ~~पाणी पट्टी दरात वाढ करणे बाबत.~~ (दि. २९/१२/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. ११३) |
| ४९ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४८ क नुसार रस्ता कर लागु करणेस मंजुरी मिळणेबाबत. (दि. २९/१२/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. ११५) |
| ५० | अग्निशमन दलाकडील विविध महसुली उत्पन्नाच्या सुधारीत दराच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत. (दि. २९/१२/२०१४ ~~रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले~~ प्रकरण क्र. ११६) |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज –** |
| ५१ | पुर्नविनियोजन प्रस्तावास मान्यता देणे बाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| ५२ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ८२ नुसार नगरपालिका निधी स्थापन करणे व त्यामध्ये अशासकीय संस्था, सामाजिक संस्था, धर्मदाय संस्था, लोकप्रतिनिधी, खाजगी विकासक किंवा अनिवासी भारतीय यांच्याकडून पैसा, वस्तू, साहित्य इ. तसेच बांधकाम स्वरुपात व परकीय चलनात मिळणारी मदत, देणगी, भेट इ. स्विकारण्यास परवानगी मिळणेबाबत. |
| ५३ | मिरा-भाईंदर महानगरपालिकेस नव्याने प्राप्त होणाऱ्या बसेस पार्किंगसाठी तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्था करणे बाबत. |
| ५४ | कलम ४१ (अ) अ, जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ व कलम १५ पर्यावरण (संरक्षण), कायदा, १९८६ याबरोबर नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० प्रमाणे निर्देश-भांडवली खर्चामधुन २५ टक्के तरतुद नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्पासाठी करणेबाबत. |
| ५५ | आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.<br>मिरा भाईंदर महानगरपालिका वाढीव पाणी पुरवठा योजना (एम.आय.डी.सी.स्त्रोत) |
| ५६ | विविध विकास कामांच्या सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत. |
| ५७ | महानगरपालिकेच्या मालमत्ता कर धारकांना आकारण्यात आलेले व्याजदर कमी करणेबाबत. |
| ५८ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०७ - अ अन्वये स्थानिक निधी लेखापरिक्षा यांचे कडील सन २०११-१२ चा लेखापरिक्षा अहवाल सादर करणेबाबत. |
| ५९ | मा. उच्च न्यायालयाच्या दि. २८/०३/२०१४ च्या आदेशानुसार भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालय मनपातर्फे चालविणे व त्यासाठी आवश्यक बांधकामाविषयक कामे, औषधे व उपकरणे खरेदी, हाऊसकिपिंग, लॉंड्री इ. विविध बाबींसाठी निविदा मागविण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. |
| ६० | मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या क्रिडा संकुल इमारतीचा वापर सुरु करण्यासाठी धोरण निश्चित करणेबाबत. |
| -- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे –** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

**महानगरपालिका सचिव कार्यालय,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- ०५ जानेवारी २०१५**

**(हरेश ल. पाटील)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/७६४/२०१४-१५ दिनांक :- २६/०२/२०१५

## // परिपत्रक //

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ____________________
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय/महोदया,

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा शनिवार दि. १५/०१/२०१५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. शासन निर्णय क्र. मिभाम-१११४/१५९१/प्र.क्र.१२५/२०१४/नवि-२८, दि. १४/०१/२०१५ अन्वये दि. १५/०१/२०१५ रोजी महासभेची बैठक बोलविण्याबाबत घेतलेला निर्णय निलंबीत करण्यात आला होता. तसेच दि. ०७/०२/२०१५ रोजी आयोजित मा. विशेष महासभा ठरावाद्वारे तहकूब करुन, दि. १५/०१/२०१५ रोजीच्या सभेचे निलंबन शासनाकडून रद्द करुन, दि. ०२/०३/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता उक्त दोन्ही सभांचे एकत्र आयोजन करणेचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

नगरविकास विभागाकडील पत्र क्र. मिभाम-१११४/१५९१/प्र.क्र.११४/१४/नवि-२८, दि. २४/०२/२०१५ अन्वये, दि. १५/०१/२०१५ रोजीची मा. महासभा पूढील दिनांकास आयोजित करण्यास प्रत्यवाय नसावा असे कळविण्यात आलेले आहे. करिता दि. ०७/०२/२०१५, ठराव क्र. ४९ अन्वये, दि. १५/०१/२०१५ रोजीची महासभा व दि. ०७/०२/२०१५ रोजीची तहकुब मा. विशेष महासभा दि. ०२/०३/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात येत आहे. मा. महासभा दि. १५/०१/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरण क्र. ४४ ते ५६ व पुरक घोषणा क्र. ५७ ते ६१ या विषयांवर निर्णय झालेनंतर, मा. विशेष महासभा दि. ०७/०२/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरण क्र. ६३ ते ६६ चर्चा करण्यात येईल.

तरी सदरहू सभेस सर्व सन्मा. सदस्यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. सभागृहाच्या मान्यतेने.

# मा. महासभा

# दि. १९/०७/२०१४

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. १९/०७/२०१४**

आज शनिवार दि. १९/०७/२०१४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.३० वाजता सभा सुचना क्र. २ दि. ०८/०७/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | महापौर |
| २) | शरद केशव पाटील | सभापती, स्थायी समिती |
| ३) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ४) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ५) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ६) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ७) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ८) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ९) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १०) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १२) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १३) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १४) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १५) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १६) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १७) | पाटील सुनिता कैलास | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| १८) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १९) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २०) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २१) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २२) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २३) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २४) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २५) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २६) | पाटील वंदना विकास | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| २७) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| २८) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २९) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ३०) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| ३१) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३२) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३३) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३४) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३५) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३६) | जैन गिता भरत | सदस्या |
| ३७) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३८) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३९) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४०) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ४१) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४२) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४३) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४४) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४५) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४६) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ४७) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४८) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ४९) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ५०) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५१) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५२) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५३) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५४) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५५) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५६) | सुजाता रविकांत शिंदे | सदस्या |
| ५७) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ५८) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५९) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६०) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ६१) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६२) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६३) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६४) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ६५) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६६) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६७) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६८) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६९) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ७०) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७१) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७२) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ७३) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७४) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७५) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७६) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७७) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ७८) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ७९) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८०) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ८१) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८२) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ८३) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ८४) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ८५) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८६) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ८७) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| २) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ५) | भट्ट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ८) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज – निरंक**

१) सय्यद नुरजहाँ नझर हुसेन उपमहापौर
२) मेंन्डोंसा स्टिवन जॉन सदस्य

**मा. महापौर :-**

मा. सदस्य / सदस्या, अधिकारी व कर्मचारी वर्ग, पत्रकार बंधू व शहरातील सर्व नागरिकांना रमजान ईद निमित्त व पर्युषण पर्व या सणाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा. सदरची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शनिवार दि. १९/०७/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०२, दि. ०८/०७/२०१४ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रशासनाकडून के खाली प्रस्ताव आलेला आहे. हा विषय घ्यायचा आहे.

**मा. महापौर :-**

घ्यायचा आहे.

**नगरसचिव :-**

हा विषय शेवटी घेतला जातो. प्रश्नोत्तर तासाला सुरूवात होते. सन्मा. सदस्या दिपीका पंकज अरोरा ह्यांचा प्रश्न आहे. ११.३५ झाले आहेत.

**दिपीका अरोरा :-**

मॅडम मिरा भाईंदर शहर में जितने प्रभाग है, आप अच्छे से जानते है। उसके हिसाब से जो उत्तर मुझे आया है फवारणी के लिए प्रभागमें जो टेम्पो भेजे जाते है वह सिर्फ ३ है। ५ धुँवा करते थे उसके बाद २ स्क्रॅप मे गये है। ३ आज वर्किंग कंन्डीशन मे हमारे पास है। प्रशासन को लगता है क्या यह मिरा भाईंदर पॉप्युलेशन के लिए सफिशिएन्ट है।

**डॉ. पडवळ :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. तीनच टेम्पो स्प्रेईंग मशिन आहेत. ते सफिशिएन्ट नाहीत. त्यामुळे प्रशासनाने चार नविन टेम्पो स्प्रेईंग मशिनचा प्रस्ताव पुट-अप केलेला आहे आणि मंगळवार पर्यंत त्या निविदा फायनल होऊन १५ ऑगस्ट पर्यंत ७ टेम्पो राहतील. मग प्रत्येक प्रभाग समितीस एक टेम्पो, एक स्पेईंग मशिल देऊ. १ स्पेअरमध्ये ठेवला जाईल.

**दिपीका अरोरा :-**

माझ्या माहितीप्रमाणे दोन टेम्पो खरेदी केले आहेत. पण त्याच्यावर व्हेहीकल माऊंट मशिन नाही केलेली. तुम्ही ते गोडाऊन मध्ये ठेवायला ऑर्डर करता.

**डॉ. पडवळ :-**

२ टेम्पो ६ महिन्यापूर्वी खेरदी केले होते. परंतू मशिन बसवण्यासाठी तरतूद पाहिजे होती ती तरतूद शिल्लक नव्हती. ह्या आर्थिक अर्थसंकल्पामध्ये तरतूद उपलब्ध झाली. परंतू आचारसंहिता, लागल्यामुळे निविदा प्रक्रिया तात्काळ सुरू करता आली नाही. आचारसंहिता संपल्यानंतर ती सुरू करून मंगळवार पर्यंत निविदा प्रक्रिया पूर्ण होईल.

**दिपीका अरोरा :-**

वर्ष झाल तुम्ही मला दिल आहे की एक प्रभाग में ७ दिन मे एक बार टेम्पो घूमना चाहिए। मेरे अजेंडा में दिया है थर्सडे मुझे बिल दिया है। मेरे प्रभाग में फवारणी करने का। जब तक ढाई से तीन महिने में २५ बार राठोड को फोन नही करती हूँ वो गाडी उपलब्ध नही की जाती। उसके बाद ऐसे सिली रिझन प्रशासन के तरफ से दिए जाते है वह अॅक्सेप्टेबल नही है की ड्रायव्हर नही है। इट इज अ ले आन्सर। मैने उनको इतनी बार यह आन्सर दिया है की मुझे ड्राइव्हिंग आती है, आपको चाहिए तो मैं ड्राइव्हिंग करके ले जाती हूँ। क्या अभी नगरसेवक वो भी काम करना शुरू करे।

**डॉ. पडवळ :-**

मॅडम मुख्य प्रश्न आहे. तीनच टेम्पो आहेत.

**दिपीका अरोरा :-**

ही तुम्ही आताची माहिती देतात. मी गेल्या वर्षीची माहिती तुम्हाला सांगते. ६ टेम्पो ५ टेम्पो होतात त्या दिवशी पण मला हेच आन्सर भेटले. ड्रायव्हर नाही कोण येणार, लेबर नही है। दवाई नही, हे ऐकायला त्याला आम्ही फोन करतो. पब्लिकको हमें जब आन्सर देना पडता है तो आप रिटन में लिखके दो की हमारे पास इस दिन ड्रायव्हर नही है। ड्रायव्हर महिने में कितने दिन नही रहेगा। अगर एक्स्ट्रा नही रखना चाहते तो बोलिए हम लोग आके पार्ट टाईम काम करते है।

**डॉ. पडवळ :-**

मॅडम ओकेशनली ड्रायव्हरचा प्रॉब्लेम असतो.

**दिपीका अरोरा :-**

ओकेशनली नाही. मी तुम्हाला रेकॉर्डवरती दाखवू शकते. कोणत्या दिवशी कोणी मला काय म्हटले. हे मी लिहून ठेवलेले आहे. काय उत्तर मला भेटलं हे मान्य आहे का?

**डॉ. पडवळ :-**

मॅडम पूर्वी असे प्राम्ब्लेम होते, हे मी सुध्दा ऐकून होतो. मार्च २०१३ पर्यंत हा विभाग माझ्याकडे नव्हता. एप्रिलपासून माझ्याकडे आलेला आहे. इथून मी खात्री तुम्हांला देतो हे ६ टेम्पो प्रत्येक प्रभागामध्ये कोणतेही कारण न देता औषध नाही, ड्रायव्हर नाही असे काही न सांगता सर्व पंक्च्युअल राहतील. एक स्पेअरमध्ये ठेवलेला आहे. काही प्रॉब्लेम झाला तर तो आपण त्या ठिकाणी पाठवून प्रत्येक भाग हा विथ टेम्पो , विथ स्प्रेईंग मशिन हा व्यवस्थित कवर केला जाईल. एवढे मी सांगू शकतो.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम ही उत्तर बरोबर नाहीत. मी नव्हतो ते होते म्हणजे उद्या हे जाणार दुसरे येणार ते पण हेच सांगणार का? ह्याच्यापुढे मी बरोबर करेन ही उत्तर नाहीत आणि हे जे बोलतात ३ टेम्पो आहेत. मला सांगा ते टेम्पो कुठे कुठे फिरतात. जागेवरून हलतात का ते सांगा. तुम्ही आता जर तिथे गेलात तर ते टेम्पो किती दिवस तिथे उभे होते मी तुम्हाला दाखवतो चला.

**डॉ.पडवळ :-**

तीनही टेम्पो चालू आहेत.

**शरद पाटील :-**

चालू आहेत ते जागेवरून हलतात का?

**डॉ.पडवळ :-**

हलतात ना.

**शरद पाटील :-**

मला सांगा काल त्यांनी कुठे औषध मारले.

**डॉ.पडवळ :-**

तीनही टेम्पो प्रभाग समितीमध्ये २,३,४ मध्ये आहेत. इतर प्रभाग समितीमध्ये मागवून स्प्रेईंग करतो.

**शरद पाटील :-**

मला सांगा काल तुमचा टेम्पो कुठे फिरत होता. त्याचा रिपोर्ट तुमच्याकडे आहे का?

**डॉ.पडवळ :-**

मी माहिती मागवून घेतों.

**शरद पाटील :-**

आज प्रश्नोत्तराचा तास आहे तर तुम्ही माहिती का मागवून घेतली नाही.

**डॉ.पडवळ :-**

माहिती आहे. मी मागवून घेतो.

**शरद पाटील :-**

माहिती आहे तर आणायला पाहिजे. तुम्ही सभेला आलात ना.

**दिपीका अरोरा :-**

आज छः महिना से यह प्रश्न अजेंडा में आ रहा है। तो आपने आज लाना चाहिए था।

**डॉ.पडवळ :-**

साहेब मी काय सांगतो दररोज त्यांच्या सह्या पण घेतल्या आहेत.

**शरद पाटील :-**

माझे म्हणणे ते नाही. त्या मॅडम जे बोलतात त्या प्रत्येक वेळेला तुमच्या राठोड साहेबांना सांगतात की आमच्या वॉर्डात औषध मारायचे आहे. तर तिथे टेम्पो येतात का? त्याचे उत्तर द्या. त्यांच्याकडे टेम्पो का येत नाही? तुमच्या त्या प्रभागामध्ये टेम्पो आहे का? नगरसेवकांनी इथपर्यंत बोलायची वेळ यायची का? की ड्रायव्हर नसेल तर ड्रायव्हींग करायला मी आहे.

**डॉ.पडवळ :-**

साहेब टेम्पो आपल्याकडे कमी आहेत. त्यामुळे प्रत्येकाच्या मागणीनुसार तात्काळ टेम्पो देता येत नाही, ही सध्याची परिस्थिती आहे. म्हणून चार टेम्पो नविन घ्यायचा प्रस्ताव ठेवला. ते झाल्याशिवाय मागणीनुसार देता येणार नाही.

**दिपीका अरोरा :-**

सर डेंग्यु के लिए मोहिम होती है। तरतूद होती है। बजेट होता है। डेंग्यु के प्रिकोशनरी एक हेड है फवारणी करना आप अॅग्री करते है की नही करते है।

**डॉ.पडवळ :-**

हो मॅडम.

**दिपीका अरोरा :-**

जो बाद में खर्चा करना है वह पहले खर्चा किजीए। साल भर में मशिन की माँग क्यो नही की।

**डॉ.पडवळ :-**

मागच्या वर्षी मशिन संपलेली होती.

**दिपीका अरोरा :-**

साल भर पहले मुझे पता चल गया की दो टेम्पो स्क्रॅब में गए है। तभी आपने बजेट ॲन्टी डेंग्यु के लिए किया, सीडी बॉटने का काम किया। दवाई छिडकने का काम करते है, सर्व्हे करने का खर्च करते है तो उससे अच्छा डेंग्यु हो ही नही उसका प्रिकॉशन पहले क्यो नही लेते।

**डॉ.पडवळ :-**

मॅडम डेंग्युसाठी आपण सर्व प्रिकॉशन घेतो.

**दिपीका अरोरा :-**

यह प्रश्न आज पहली बार महासभा मे नही उठाया है। हर बार मॅडम यह बात होती है। छोटी छोटी चिजों को सेनिटेशन की हायजीन की सुविधा पब्लिक को उपलब्ध कराने के लिए बारबार २५ बार कॉल करे। और कोई काम नही है। बिकॉज इट इज ऑन द प्रायोरिटी बेसिस फॉर द.पब्लिक वी हॅव टू डू इट।

**जुबेर इनामदार :-**

साहेब फवारणी हा एक विषय आहे. डासासाठी एक प्रयोग करत असतो. त्याच बरोबर एम.एल.ऑयल हे केमीकल उपलब्ध करून घेत होतो. साठलेल्या पाण्याच्या वरती टाकायला. आपल्याकडे सध्या तरी त्याचा साठा नाही आहे. तो एक त्याचा प्रभावी उपाय होता. त्याच्यासाठी कोणी काही पाठपुरावा करायला तयार नाही.

**डॉ.पडवळ :-**

साहेब आपल्याकडे स्प्रेईंग मशिनपैकी टेमीकॉस आपल्याकडे उपलब्ध आहे.

**जुबेर इनामदार :-**

आज उपायुक्त सुट्टीवर आहेत. तुम्हांला त्यांनी जेवढ शिकवून पाठवले आहे तेवढेच बोलणार.

**डॉ.पडवळ :-**

नाही. हे माझ्याकडे आहे. आणि मी स्वतःच सांगतो. टेंडर प्रक्रिया.................

**जुबेर इनामदार :-**

मीं टेंडर बद्दल बोलतच नाही. एम.एन.ऑईल बद्दल विचारतो.

**डॉ.पडवळ :-**

ऑईल बद्दल मी सांगतो. दीड कोटीची औषध खरेदीची टेंडर फायनल ह्याच्यामध्ये आलेले आहे. ते पण पुढच्या आठवड्यात फायनल होईल. ती औषध ह्या मंथ एन्ड पर्यंत आपल्याला येतील.

**जुबेर इनामदार :-**

साहेब आरोग्याचा विषय किती महत्वाचा आहे. आपण त्याच्यामध्ये अशाप्रकारे हलगर्जी पणा करू शकतो का? आपल्याला लागणारी प्रत्येक वस्तू आपण ताबडतोब घेतो. साठा संपेपर्यंत शेवटच्या थेंबापर्यंत आपण थांबतो का? पावसाळ्याचे दिवस म्हणजे १०० टक्के पाणी साचणार. त्याच्यावर एम.एल.ऑईल पाहिजे. पावसाळ्याच्या अगोदर ह्या विषयावर विचार केला पाहिजे.

**दिपीका अरोरा :-**

सभी समिती को कितने दिन मे १-१ गाडी मिलेगी?

**डॉ.पडवळ :-**

मॅडम १५ ऑगस्टपर्यंत प्रत्येक प्रभागाला १-१ टेम्पो विथ स्प्रेईंग मशिन अवेलेबल केला जाईल.

**दिपीका अरोरा :-**

मेरे पास दो पत्र है। एक लेटर में दिया है १५ दिन में प्रभाग में गाडी आएगी और एक मे लिखा है ७ दिन तो कौन सा सही है।

**डॉ.पडवळ :-**

मॅडम ते सुरूवातीला जे उत्तर दिल होत टेम्पो किती फ्रिक्वेन्सीने जातो ते विचारल होत म्हणजे आयडीयली किती फ्रिक्वेन्सीने जायला पाहिजे. ते उत्तर दिले की ७ दिवसाने एका ठिकाणी स्प्रेईंग व्हायला पाहिजे. सध्या जातो तो १५ दिवसाने डिफेशिएन्सी असल्सामुळे ते उत्तर होत.

**कांचन पुजारी :-**

मा.महापौर मॅडम आणि मा. आयुक्तांच्या परमिशनने बोलते, राठोड जे आहेत ते ह्या कामामध्ये कॅपेबल आहेत का? प्रत्येक वेळेला फोन केला तर फोन उचलत नाही. आणि फोन उचलला तर बोलतो मी जागेवर नाही. कनकिया पोलिस स्टेशन जवळ असून आमचा प्रभाग ५ किती लांब आहे. तो माणूस त्या कामामध्ये कॅपेबल आहे का ते बघा.

**अनिल भोसले :-**

मा. महापौर मॅडम मिरा भाईंदर शहरामध्ये राठोड प्लस ३० व्यक्ती औषध फवारणीसाठी आहे. आपले जे वॉर्ड आहेत त्याच्यात ३० कर्मचारी आहेत. राठोड जे अधिकारी आहेत ते असतील तर माहिती घ्या त्यांनी दोन वर्षापासून कोणत्या वॉर्डामध्ये व्हिजीट सुध्दा मारली नाही. ही सत्य परिस्थिती आहे. मी सुध्दा त्यांना अनेक वेळा फोन केला. वॉर्डामध्ये स्वतःहून व्हिजीट मारली नाही ही सत्य परिस्थिती आहे. राठोडवर कारवाई

करावी अशी मी महासभेत मागणी करतो. हे अधिकारी बेजबाबदारपणाने काम करतात. लोकांच्या आरोग्याशी खेळतात, आपल्या शहरात अनेक जण डेंग्युने मृत्युमुखी पडले आहेत. ह्याला अधिकारी जबाबदार नाहीत का मॅडम.

**शिल्पा भावसार :-**

माझ्या वॉर्डासाठी पण मी तीच मागणी नेहमी करत असते. अडीच तीन महिन्यापासून आमच्या वॉर्डात फवारणी झाली नाही. गेल्या महिन्यांत प्रभाग समितीची मिटींग लावली होती तिथेपण राठोड साहेबांना आम्ही सांगितले की आम्हांला फवारणीसाठी कधी पाठवता तर ते बोलतात उद्या तुमच्या वॉर्डात टेम्पो पाठवतो, परवा पाठवतो पण तो टेम्पो काही येतच नाही. त्या गोष्टी मी पानपट्टे साहेबांना सांगितल्यावर त्यांनी मला सांगितले पावसात फवारणी करत नाही. तर त्याच्याऐवजी आपल्याकडे दुसरी काय प्रोव्हिजन आहे. आम्ही जिथेपण मिटींगला गेलो आणि तिकडे ऐकले डेंग्युने कोण माणूस मेला आता भाईंदर वेस्टला गणेश देवल नगरला एक डेंग्युचा पेशन्ट कस्तूरी हॉस्पीटलला ॲडमीट आहे. आपण झाल्यानंतर चौकशी करायला जातो. राठोड साहेबांवर सक्त कारवाई करा. काम करायचे असेल तर व्यवस्थित करा. नाही तर त्याच्या ऐवजी दुसरे कोणीतरी द्या. म्हणजे ते वॉर्डात लक्ष ठेवतील.

**दिपीका अरोरा :-**

मॅडम सही बात है। राठोडजी के नाम सुने थे जब वो आए हमे आश्वासन दिए थे। दॅट इज रियली अ गुड पर्सन। आरोग्य में उन्होने अच्छा काम किया है। दर्शन बहोत ही छोटे निकले।

**वेंचर मेन्डोन्सा :-**

मा.महापौर मॅडम, साहेब मला गेल्या वर्षी किती लोकांना डेंग्यु झालेला आहे त्याची मला माहिती द्या.

**डॉ.पडवळ :-**

सन २०१४ मध्ये आतापर्यंत आपल्याकडे डेंग्युचे संशयित रूग्ण १६१ आहेत. त्यापैकी दोन संशयिताचे डेथ झालेले आहेत. दोघाचे रक्त नमूने फायनल कन्फरमेशनसाठी सिव्हील हॉस्पीटलला पाठवले आहेत. त्याचा रिपोर्ट अजून आलेला नाही.

**वेंचर मेन्डोन्सा :-**

साहेब आता फवारणी नाही. टेम्पो नाहीत. मग फवारणी कम्पलीट होणार नाही. मग परत मच्छराचे अंडे होणार. तुम्हाला लोकांची संख्या वाढवायची आहे का?

**डॉ.पडवळ :-**

आपल्याकडे हॅन्डपंप आहेत. टेम्पोचे स्प्रेईंग हे मोठे प्लॉट आहेत की ज्या ठिकाणी हॅन्ड पंपनी करणे सोयीचे नसते. त्याठिकाणी टेम्पो वापरतो. टेम्पो नाही ह्याचा अर्थ हॅन्डपंपनी स्प्रेईंग करत नाही असे नाही. आपल्याकडे प्रत्येक वॉर्डमध्ये २-२ कर्मचाऱ्याव्दारे स्प्रेईंग चालू आहे.

**शर्मिला बगाजी :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलते की, पडवळ साहेब तुम्ही सांगता आपल्याकडे तीन टेम्पो आहेत. राठोड सांगतो दोन टेम्पो. काही असू दे. ३ किंवा २ तुम्ही माहिती देऊ शकता का? दर दिवशी वॉर्ड मध्ये टेम्पो फिरतो का? आम्ही ३ महिने झाले मागणी केली. मा.आयुक्तांकडे गेले तिथूनही फोन केला. उद्या देतो. परंतू आजपर्यंत टेम्पो आला नाही. नाल्यावर एवढे मच्छर झाले आहेत. तुम्ही एकदा व्हिजीट तरी करा. आणि कुठे फिरतात त्याची आम्हाला माहिती तरी द्या.

**सुहास रकवी :-**

मॅडम आपल्याकडे डेंग्युचे लागण झालेले रूग्ण असतात. त्यांना आपल्या मनपाकडून काही आर्थिक मदत दिली जाते का? त्यांना आपल्या मनपाकडून ट्रिटमेन्ट तरी होईल का? फार गरीब लोक असतात हे मच्छर वगैरे झोपडपट्टीच्या त्या साईडलाच होतात. ह्याच्यावर काय उपाययोजना करता आली तर बघा अशी विनंती आहे.

**शर्मिला बगाजी :-**

मा. आयुक्त साहेब माझा पडवळ साहेबांना एक प्रश्न होता मला उत्तर दिले नाही.

**डॉ.पडवळ :-**

आपल्याकडे २,३,४ प्रभाग समितीमध्ये सध्या टेम्पो आहेत. तुमचे म्हणणे आहे. टेम्पो मिळत नाही बरोबर आहे. त्याच्यासाठीच आपण ते चार टेम्पो घेतो. पुढच्या १५ ऑगस्ट पर्यंत....................

**शर्मिला बगाजी :-**

१५ ऑगस्टपर्यंत तिथे काय करायचे तिथे नाले आहेत. साफसफाई होत नाही. मच्छराची एवढी पैदास झाली आहे त्याला काय उपाय आहे.

**डॉ.पडवळ :-**

मॅडम तुमच्याकडे टेम्पो पाठवून द्यायला सांगतो.

**शर्मिला बगाजी :-**

उद्या देणार ना.

**डॉ.पडवळ :-**

हो.

**शर्मिला बगाजी :-**

उद्या नाही आला तर मी तुमची कम्पलेन्ट कमिश्नरकडे करेन.

**निलम ढवण :-**

डेंग्यु संदर्भात मागच्या वर्षाची डेंग्युने किती पेशन्ट मेले त्याची माहिती दिली गेली. परंतू आता पावसाळा सुरूवात झाली न झाली तोच डेंग्युचे पेशन्ट चालू झाले. त्याच्यातून बऱ्याच जणांना जीव गमवावा लागलेला आहे. ह्या संदर्भात ४-५ महिण्यापूर्वी प्रत्येक प्रभागामध्ये सर्व्हे करण्यासाठी एम.पी.डब्ल्यु. ची संख्या वाढवा, असा ठराव दिलेला होता. आता घरोघरी सर्व्हे करण्याची वेळ आलेली आहे. आमच्या आजुबाजूच्या परिसरामध्ये २-३ जणांना जीव गमवावा लागला आहे. एम.पी.डब्ल्यु. ची संख्या वाढवण्या संदर्भात आम्ही ठराव केलेला होता. परंतू अद्यापही त्याच्यात वाढ नसेल तर पुन्हा किती पेशन्ट गेले ते मोजायला सुरूवात झालेलीच आहे. त्यामुळे एम.पी.डब्ल्यु च्या संख्येमध्ये वाढ करा. कृपया प्रत्येक प्रभागामध्ये घरोघरी, कसा सर्व्हे करता येईल त्या संदर्भात प्रशासनाने काळजी घ्यावी.

**सुरेश खंडेलवाल :-**

मा. महापौर मॅडम आपके परवानगीसे चर्चा का विषय बहोत अच्छा था। प्रश्न पिछले साल पूछा पर अभी अच्छे समय पे इसका नंबर आया। सभी सदस्य को बोलने का मौका मिला। विषय है टेम्पो का २ और ४-६ प्रशासन १०० टक्के आपने कहा किसी का भी ध्यान नही रहता है। पहले आयुक्त विक्रम कुमार साहब उस समय आरोग्य की स्थिती और आजकी आरोग्य के स्थिती और आजकी आरोग्य की स्थिती में जमिन आसमान का फरक हो चूका है। साफसफाई के दृष्टिसे मिरा भाईंदर शहर की गिनती टॉप पर पहूँच गई थी। लेकिन आज की स्थिती बिकट है। निचे के कर्मचारीयों पर किसी का कंट्रोल नही है। आज के स्थिती में आप को बताना चाहूँगा टेम्पो से जो दवाईयों का छिडकाव होता है वह दवाई हॅन्ड स्प्रे से भी उनके लेबर करते है। पहले धूँवा फवारणी होती थी। लोगो का एक प्रकार का सॅटीसफॅक्शन मिलता था। की कही ना कही मच्छर मारने के लिए प्रशासन कुछ कर रहा है। लेकिन आज की स्थिती ऐसी है की स्प्रे से दवाई मारके जाते है उससे मच्छर पैदा नही होते। सर वो दवाई का छिडकाव होता। आगे मच्छर नही आएगे इसके लिए शाम के टाईम पे स्थिती बिलकूल उल्टी होती है। की जो मच्छर है उनका क्या? मेरा आपसे एक निवेदन है की पिछली बार यह धूँआ फवारणी जिस हिसाबसे बंद की गई। पानपट्टे साहेब और आपके प्रशासन का निर्णय था की धुँआ फवारणी को बंद करके मच्छर को हम किस तरह से खत्म कर सकते है। उसकी उत्पत्ती रोख सकते है। यदि आप उसपे थोडासा वर्किंग करेंगे तो मुझे लगता है जो देढ देढ करोड के बजेटसे सामान ला रहे है कितना यूज हो रहा है। मैने कितने बार देखा है पानी ज्यादा होता है उसकी दवाई कम होती है। पम्प के अंदर लाते है। उसका आज तक रिझल्ट नही है। डेंग्यु को मरिजों की संख्या हर साल बढती जाती है। थाणा म्युनिसिपल कॉर्पोरेशनने धुँआ फवारणी बंद किया था। अभी उन्होने भी शुरू किया है। मेरा सुझाव है की पम्प के थ्रू जो केमिकल डालते है। उससे धुँआ फवारणी भी आपको लगता है उचित है। तो लोगो के मन मे कमसे कम मेन्टली सटीसफॅक्शन होगा की प्रशासन कुछ कर रहा है। कचरा उठाने के बाद की पावडर का छिडकाव नही होता। इतनी सारी दवाई आती है। इतना सारा बजेट करते है। लेकिन वह सामान कहाँ जाता है। मैं आज तक समझ नही पाया हूँ। मेरा आपसे एक ही निवेदन है आप प्रत्यक्ष रूपसे इसके अंदर थोडासा जानकारी लेकर साफसफाई के दृष्टिसे कदम उठाएगे ऐसी आपसे आशा रखता हूँ। जल्दी से जल्दी इसमें कारवाई करेंगे ऐसी आपसे उम्मीद करता हूँ।

**शिल्पा भावसार :-**

मा.महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते, साहेब आपणांस नम्र विनंती आहे की, महिन्याला किती वेळेला टेम्पो खराब होतात. आम्हाला प्रत्येक वेळेला हेच सांगतात की, टेम्पो बिघडला आहे. आपण नविन घेतलेले टेम्पो सुध्दा बिघडतात काय? आणि त्याच्यातच आपण पैसे टाकत राहायचे. जो पैसा आरोग्यासाठी खर्च करतो. त्याचा आपल्याला काही फायदा मिळत नाही ना आणि अशीच परिस्थिती राहीली तर शहरामध्ये डेंग्यू जास्त प्रमाणात पसरेल.

**राजेंद्र जैन :-**

टेम्पो की जो बात चल रही है उसमे किसी भी नगरसेवक के पास प्रशासन की तरफ से कार्यक्रम नही है की हमारे वॉर्ड में टेम्पो कब आएगा या वो टेम्पो कहा काम करेगा। मेरे पास कोई लिखीत जानकारी नही है। मेरे वॉर्ड में टेम्पो आएगा की नही आएगा। १-२ बार टेम्पो आया था। बाद में नही आया। आपके पास कोई सिस्टम नही है। टेम्पो का सिस्टम लिखीत में होना चाहिए। खंडेलवाल साहब ने बोला धूँआ फवारणी पहले होती थी अभी नही होती है। साहबने बोला विक्रम कुमार साहब के टाईम अच्छा था। सफाई अच्छी थी लेकिन धुँआ फवारणी भी तभी बंद की गई थी। पानपट्टे साहबने बोला धुँआ फवारणीसे फायदा नही होता। मैने उनको आग्रह किया था इसका फायदा नही होता इसका सायंटिफिक प्रुफ कॅम्परिजन बिटवीन धुँआ फवारणी लाईव्ह साईड जो आप कर रहे है इसकी कोई सायंटिफिक स्टडी हो जिसको डिस्कशन कर सके की यह करना चाहिए की नही करना चाहिए। मुंबई में अभी भी धुँआ फवारणी होती है। हमने सिम्पल बोल दिया धुँआ फवारणी नही करनी है। उसके पिछे कुछ सायंटिफीक बेसीस नही है। तो हम भी जनता को बोल सकते है की धुँआ फवारणीसे फायदा नही है। मा.आयुक्त महोदय खंडेलवाल साहबने एक बात बहोत अच्छी बोली है।

उन्होने बोला की करोडो की दवाई आती है। उसको किस तरह से डिस्ट्रीब्युट करते है। उसका चेन क्या है। उसको चेकींग कैसे करते है। विक्रम कुमार साहब थे तब मेरी कम्प्लेन्टसे उन्होने फायर ब्रिगेडपे छापा मारा था। जितने किटकनाशक डब्बे थे उसको रिकॉल दबाए थे वो नही मिले। कितने डब्बे आपने इश्यू किए कितने डब्बे सप्लाई हुए और वापिस कहाँ गए। इसको इतना दिया इसको इतना दिया वह आप स्टडी करेंगे सिर्फ साईन मारा होगा की वो इतर लिटर लेके गया वो आदमी कौन, मोबाईल नंबर, नाम, पद क्या उसपे कुछ नही लिखा है। इसका कैसे युज होता है।

**नगरसचिव :-**

वेळ संपलेली आहे.

**मा. महापौर -**

सर्व नगरसेवक आज गंभीर विषयावर बोलले आहेत. मी आयुक्तांना सांगते की, धुँआ फवारणी जे बंद केलेले आहे ते लवकरात लवकर चालू करण्यांत यावे.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेसाठी दोन लक्षवेधी आलेली आहेत. पहिली लक्षवेधी गिता भरत जैन, दुसरी सुरेश खंडेलवाल दोन्ही लक्षवेधी पर्युषण पर्व यावर आलेल्या आहेत. त्या मी मा.महापौरांना सुपुर्द करतो.

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरीता सन्मा. सदस्या श्रीमती गिता भरत जैन व सन्मा. सदस्य सुरेश खंडेलवाल ह्यांची लक्षवेधी आलेली आहे. दोन्ही लक्षवेधी एकाच विषया संदर्भात असल्याने दोन्ही सदस्यांना ह्या विषयावर बोलण्यास परवानगी देण्यांत येईल. परंतू सुरेश खंडेलवाल ह्यांची लक्षवेधी स्विकारत आहे.

**नगरसचिव :-**

प्रत्येक वर्ष के अनुसार जैन धर्म के पावन पर्व पर्युषन पर्व दि. २२/०८/२०१४ से दि. २९/०८/२०१४ तक मनाया जाएगा। महाराष्ट्र शासन के आदेश क संकिर्ण १०२००४/प्र.क्र.१२१/नवि-२७ दि. ०७/०९/२००४ के अनुसार सभी महानगरपालिका सीमा के अंतर्गत आनेवाली कत्तलखाने व मांसाहारी दुकाने "पर्युषण पर्व" पर बंद रखनी चाहिए। आपसे इस पत्र के माध्यम से अनुरोध है की इस आदेश का पालन करते हुए व शहर में रहनेवाले सभी जैन समाजवासियो की भावना का खयाल रखते हुए दि. २२/०८/२०१४ से दि. २९/०८/२०१४ ते सभी कत्तलखाने व मांसाहारी दुकाने बंद रखने हेतु प्रशासन ठोस कदम उठाते हुए आदेश करें।

**शरद पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने सचिव साहेब आपल्याकडे पहिली लक्षवेधी कोणाची आली.

**नगरसचिव :-**

गिता जैन ह्यांची.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम आपल्याला विनंती करतो अधिकार आपलाच आहे. पण कधीतरी विरोधकांची लक्षवेधी घ्या.

**मा. महापौर :-**

ह्याच्या अगोदर वसानी मॅडमची घेतलेली त्याच्या अगोदर अजून कोणाची असे काही नाही.

**शरद पाटील :-**

तेव्हा एकच लक्षवेधी होती. आता पहिली गिता जैन मॅडमची आहे तर त्यांची घ्या.

**मा. महापौर :-**

ऑलरेडी सांगितले आहे तुम्ही बसा.

**शरद पाटील :-**

हमने मा. महापौर मॅडमसे हमारी विनंती रखी है।

**सुरेश खंडेलवाल :-**

सबको बोलने का मौका मिलेगा।

**गिता जैन :-**

खंडेलवालजी बात बोलने की नही है। बोलना कुछ है ही नही। जब मैने और आपने सेम रखा है तो बोलना कुछ है नही। लेकीन मा. महापौर मॅडम को यह बोला जा रहा है जब सेम विषय पे दो लक्षवेधी आयी थी और अगर मै पहले दे रही तो मेरी अमान्य करने की .................

**मा. महापौर :-**

मैने क्या बोला की, चर्चा करने को मिलेगा, पर लक्षवेधी उनकी स्विकार कर रही हूँ।

**गिता जैन :-**

वही पुछ रही हूँ। उसका रिझन क्या है। जब दोन सेम है तो दोनो स्विकार करीए।

**मा. महापौर :-**

मैने उनका लिया आप उसमे चर्चा किजीए।

**गिता जैन :-**

मुझे आपसे रिझन चाहिए। मैने पहले लक्षवेधी दि थी तो मेरा रिजेक्ट करने का .................

**मा. महापौर :-**

यहाँ पे मेरा अधिकार है। यहाँ का जो रूल है। वही मैने फॉलो किया। मैने मेरे घर का रूल यूज नही किया।

**सुरेश खंडेलवाल :-**

मै लक्षवेधी के माध्यम से सभा का ध्यान आकर्षित करना चाहता हूँ की जैन धर्म का पर्युषण पर्व जैसे की आप जानते है मिरा भाईंदर शहर के अंदर सभी धर्मों के लोग काफी बरसो से प्रेम भावसे और सभी धर्मों में आस्था बनाए रखते सभी रहते आये है। और एक दुसरे के धर्म की भावना का सभी ने मान और सन्मान रखा है। अभी दृष्टिकोनसे मैं महापौर मॅडमसे निवेदन करना चाहता हूँ जैन धर्म का पावन पर्युषण पर्व पर दि.२२/०८/२०१४ से २९/०८/२०१४ तक पर्युषण पर्व मनाया जाए। हर वर्ष हम यहाँ पर एक निर्णय लेते है की हर वर्ष पर्युषण पर्व पर ८ दिन कत्तलखाने और मांसमटण खाने की दुकान बंद रखने के लिए जैन समाज की भावना का सम्मान करते हुए सभी हर वर्ष यहाँ पर निर्णय लेते है। लेकीन वस्तुस्थिती कुछ अलग होती है। इसके लिए इसबार मेरा सभी से अनुरोध है की उनके भावना का सन्मान करते हुए हम यदी पर्युषण पर्व पर ८ दिन कत्तलखाने और मांस मटण के जो भी दुकाने है यदी सब बंद रखेगे तो जैन समाज का हमेशा अहिंसा परम धर्म की प्रेरणा रही है तो उसको एक संदेश हम दे सकते है। मेरा इस माध्यम से सभी से निवेदन करूँगा की इस पर निर्णय लेकर प्रशासन को आदेश करे इस बारे में आगे कारवाई करे।

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम सन्मा. सुरेश खंडेलवाल ह्यांनी जी सुचना मांडली आहे. ती अत्यंत योग्य सुचना आहे. आता श्रावण महिना पण सुरू होणार आहे. महिनाभर श्रावण आपण पाळतो. त्यांनी जी ८ दिवसांची सुचना केली आहे. माझी आपणांस अशी विनंती आहे की महिनाभर ठेवला तरी काही हरकत नाही. माझ्या प्रभागात मोठ्या प्रमाणात जैन समाज आहे.

**दिनेश जैन :-**

मा. महापौर मॅडम खंडेलवालजीने बहोत अच्छा विषय रखा है। यह हसी मजाक का विषय नही है। यह जैन समाज के भावना से जुडा हुआ विषय है। एक साल में मैने विषय उठाया था की जितने भी मिरा भाईंदर में कत्तलखाने है उसको काच लगाया जाए। ताकि जैन समाज के भावना को ठेच न पहूँचे। लेकिन यहाँ सभागृह में चर्चा करते है लेकीन एक भी दुकान पे काच न लगी। लेकिन यह ऐसा न हो उसे महाराष्ट्र शासन का आदेश है ३ दिन मटन मच्छी की दुकान पुरे हिंदुस्थान में बंद रहे यह शासन का आदेश है। लेकिन मा. महापौर मॅडम बॉम्बे में हर जगह कत्तलखाने की दुकान बंद रहती है। लेकिन मिरा भाईंदर में तीन दिन कत्तलखाने बंद करने के लिए पसीना निकल जाता है। हमे कोई भी जात का सहकार्य नही मिलता है। मै आपसे प्रार्थना करता हूँ की आप इसके लिए विशेष भाव रखते हुए अगर ८ दिन करेगे तो समाज के लिए अच्छी बात है। लेकिन उसके उपर अंमल होना चाहिए, खाली दिखाने के लिए करेंगे उसका कोई मिनिंग नही है। आप कठोर निर्णय ले की ८ दिन में जो भी दुकान खोलेगा उसका लायसन्स कॅन्सल होगा। तो उसका मिनिंग है।

**गिता जैन :-**

मॅडम अभी आसिफ शेखने हलके मुडमे कहाँ है एक महिना बंद रखो।

**आसिफ शेख :-**

मैने सिरियसली कहाँ है। अभी हमारा रमजान उसके बाद श्रावण महिना है।

**गिता जैन :-**

तो मै यह समझू आसिफ भाई की यह श्रावण चालू है और आपको नही खाना है इसलिए ..................

**आसिफ शेख :-**

आप को जैन समाज से प्यार है उससे कही गुना ज्यादा हमको प्यार है। इसलिए हम हमारे प्यार का इजहार कर रहे है।

**गिता जैन :-**

मा. महापौर मॅडम अहमदाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशनने न सिर्फ श्वेतांबर के लिए बल्की उसके बाद जो दिगंबर चालू होनेवाले है कमसे कम १० और ८ दिन १८ दिन अहमदाबाद कॉर्पोरेशन ने बंद रखा था। उस बंद को सुप्रिम कोर्ट ने चॅलेन्ज किया गया था। लेकिन सुप्रिम कोर्ट ने उनको अहमदाबाद कॉर्पोरेशन के फेवर में यह निर्णय दिया गया था। १८ दिन बंद रहने से किसी भी राईडस उसमे हनन नही होगे। तो इसलिए आप इतने उदार बने है तो मै तो ८ दिन हमारा पर्युषण जो श्वेतांबर का होता है और उसके बाद १० दिन दिगंबर का पर्युषण। मै तो ठराव मांडती हूँ १८ दिन का हो जाए। मुझे कुरलेकर साहब है तो प्लीज खडे हो।

**बर्नड डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब मला एवढच विचारायचे आहे की ह्याच्यामध्ये मांस मटण असा शब्द आलेला आहे. मी कोणत्या धर्माच्या विरोधात बोलत नाही. त्यांनी बंद कराव मी तर सांगतो मिरा भाईंदर शाकाहारी बनवावं.

ह्या मतांशी सहमत आहे. परंतू मला सांगा मांस आणि मटण तर मासचे स्पष्टीकरण द्या. मांस म्हणजे मांसळी येते का? ह्याची माहिती द्यावी. मांसमध्ये कोणकोणते प्रकार आहेत.

**दिपक कुरळेकर (मा.उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, २००४ ला शासनाने एक पत्र काढले होते ज्यामध्ये जैन पर्युषण पर्वाच्या निमित्ताने दोन दिवस सर्व कत्तलखाने बंद करण्याबाबत पत्र काढले होते. त्यानंतर त्याच पत्रावर पुन्हा पाठपुरावा केल्यानंतर २००९ पुन्हा तेच पत्र दिले की २००४ च्या पत्राप्रमाणे प्रशासनाने अंमलबजावणी करावी. आणि २ दिवस सर्व कत्तलखाने बंद ठेवण्यांत यावे.

**बर्नड डिमेलो :-**

माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. मांस आणि मटणमध्ये मांसळीचा उल्लेख येतो का?

**दिपक कुरळेकर (मा.उपायुक्त) :-**

मांसाहार जो ह्याच्यामध्ये वेगवेगळ्या प्राण्याचे जेव्हा मीठ असते त्याला वेगवेगळे शब्द वापरले जातात.

**बर्नड डिमेलो :-**

ह्याचे स्पष्टीकरणे पाहिजे. नाहीतर मी सांगतो वर्षभर बंद ठेवायचे. मासेमारी करायला जाणारे जे मच्छीमार लोक आहेत. जवळ जवळ १००० रोज लोक मासेमारी करतात. त्या कालावधीमध्ये पूर्ण बोटी आणि मासेमोरी बंद करू. मनपाने त्यांना घरबसल्या पगार पुरवत असेल मला वाटते आम्ही बोटी बंद करू. बाजारात कुठे विकायची गरज नाही. दुकान उघडायची गरज लागणार नाही. बाया ज्या गावागावात फिरतात त्या फिरणार नाहीत. तुम्हांला मांसलीचा वाससुध्दा येणार नाही आणि मासेमारी करणार सुध्दा नाही. जर तसा प्रकार असेल तर मला वाटते ह्या सभागृहाने ठराव मांडून प्रत्येक बोटीला जेवढे इन्कम येते ती मनपा भरपाई देईल हे आम्हांला आश्वासन द्यावे. अहमदाबादच्या गोष्टी करावयाच्या असतील तर अहमदाबादचा लेखी ठराव आणावा त्यांनी. मच्छीमाऱ्यांना काय, मटणवाल्यांना काय दिले त्या गोष्टी इथे करायच्या तरच ह्या ठरावावर चर्चा करून घ्या. नाहीतर पिढ्या न पिढ्या राहत असलेले चारी बाजूला समुद्र असलेली मिरा भाईंदर जे मांसळीवर जगणारे शेतकरी आणि मच्छीमार आणि बकरे, गायी, म्हशी पाळणारी लोक आहेत. कोणाला तरी राजकीय श्रेय मिळण्यासाठी जैन लोकांची संख्या माझ्या पारड्यात पडतील ह्यांचा मतांचा बाजार न मांडता जे खरोखरच कष्टकरी आहेत त्यांचा उदारनिर्वाहावर गदा येता कामा नये, असा विचार करून नंतरच पाऊल उचलावे. अन्यथा महाराष्ट्र शासनांनी जो ठराव दिलेला आहे. आम्ही त्याचा कधी विरोध केलेला नाही आणि मताचे राजकारण करण्यासाठी जैन लोकांना खुश करण्याकरता वाटेल महिना, दिड महिना, १८ दिवसांची मागणी करतील परंतू कोळ्यांचा आणि त्याच्यावर उपजिविका करणारे लोकांचा पहिला विचार व्हावा.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम इथे मुद्दामहून अहमदाबादचा उल्लेख करण्यांत आला. पूर्णपणे देशामध्ये जेवढे राज्य आहेत त्या सगळ्याची माहिती गोळा करा. कुठे काय काय बंद असतो माझ्या माहितीप्रमाणे दिल्लीमध्ये, उत्तर भारतमध्ये असे काहीच नाही. राज्य शासनाने जो दोन दिवसाचा उल्लेख केलेला आहे. जे डायरेक्शन पाठवले आहेत त्याप्रमाणे मनपा कारवाई करते. आणि ते सर्वांनाच मान्य आहे. कारण ह्या शहरात जैन समाजाचीच लोक राहत नाही तर बऱ्याच समाजाची लोक ह्या शहरात राहतात आणि त्यांचाही अधिकार आहे. दुसरा हा एक मोठा व्यवसाय आहे. मच्छीमारांचा व्यवसाय आहे. तसेच चिकन विकणाऱ्याचा व्यवसाय आहे. त्यांच्याकडे काम करण्याऱ्या लोकांच्या रोजगाराचा हा विषय आहे. अशा प्रकारे ८ दिवस १० दिवस १५ दिवस हा चेष्ठेचा विषय झाला नाही पाहिजे. त्याच्यावर योग्य निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. त्याची अंमलबजावणी करण्यांत यावी.

**गिता जैन :-**

मॅडम तुम्ही खंडेलवालजीची लक्षवेधी घेतली आहे. त्यांना विचारा ही इन्क्ल्युड फिश ऑर नॉट.

**मा. महापौर :-**

तुमचे क्लीयर झाले की त्यांना विचारते.

**गिता जैन :-**

मला क्लीयर करायचे आहे तुम्ही त्यांची लक्षवेधी मान्य केली आहे. मग त्यांना क्लीयर करू द्या.

**मा. महापौर :-**

त्यांनी खंडेलवालजींना विचारले नाही तर प्रशासनाला विचारले आहे. तुम्हांला काय बोलायचे आहे ते तुम्ही बोला.

**नरेंद्र मेहता :-**

प्रशासनांनी खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

प्रशासनाने खुलासा केला ना.

**गिता जैन :-**

प्रशासनांनी खुलासा करावा. दे व्हिल इन्क्ल्युड फिश ऑर नॉट.

**मा. महापौर :-**

सन्मा.सदस्य बर्नड डिमेलोने प्रशासन को पुछा है।

**गिता जैन :-**

मॅडम आता इनामदार साहेबांनी सांगितले त्यांच्या पोटाचा विचार करावा. सुप्रिम कोर्टाने आपल्या ऑर्डरमध्ये काय सांगितले आहे ते मी वाचून दाखवते. It is short restriction for a few days and surely the non vegetarian can remain vegetarian for this short period. Also the traders in need will not suffer much nearly because their business has been closed down for 9 days in a year. There is no prohibition to their business for the remaining 356 days in a year. In a multi cultural country like us with such diversity one should not be over sensitive and over touchy about a short restriction when it is being done out of respect for the sentimental of a particular section of society. It has been stated above that the great empire Akbar himself. Use to remain a vegetarian for a few days every day out of respect for the vegetarian section of the Indian society and the out of respect for his Hindu wife. We too should have similar respect for the sentimental for others even if they are a minority act.

**जुबेर इनामदार :-**

नॉट फॉर ऑर अव्हर गुजरात. स्पेसिफीकली फॉर अहमदाबाद ऑन्ली.

**गिता जैन :-**

सर यह सुप्रिम कोर्ट का ऑर्डर है।

**जुबेर इनामदार :-**

असू द्या. फक्त अहमदाबादासाठी आहे. असं तुम्हीच सांगितले मला माहित नाही. तुमच्याकडे ऑर्डर आहे.

**दिनेश जैन :-**

जुबेर साहेब सुप्रिम कोर्ट देशाची आहे. गुजरातची नाही.

**जुबेर इनामदार :-**

गुजरात राज्यासाठी नाही. फक्त अहमदाबाद सिटीसाठी आहे.

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडम आपल्याला एक विनंती आहे. महाराष्ट्र शासनाने ह्याबाबत आदेश दिले आहेत त्याप्रमाणे मनपाने कारवाई करावी ही विनंती.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम अभी सुप्रिम कोर्ट की बात आयी है। इसका मतलब है की मनपा के विरूध्द आवाज उठाकर उसके विरूध्द गया इसके लिए सुप्रिम कोर्ट का आदेश हुँआ। जैसे इन्होंने आवाज उठाई है वैसे मेरा भी लक्षवेधी यहा "ज" के माध्यमसे प्रस्ताव होता है। राज्य सरकार के जी.आर. के अंदर हम लोग रिक्वेस्ट करते है इनके सभी के भावना को ध्यान में रखते हुए जो लोग विक्री करते है कत्तलखना चलाते है उनको रिक्वेस्ट करके अगर आठ दिन रखा जाए तो इनका भी भावना का सम्मान किया जा सके। प्रशासन हर बार उसपे उचित कारवाई भी करता है। यह लक्षवेधी है। लक्षवेधी मे सन्मा.सदस्य खंडेलवालजी का जो मत है मेरे खयाल से इनका भी वही मत है। उस लक्षवेधी के हिसाबसे शासन के हिसाबसे ओर यहाँ के लोगो की भावना देखते हुए मा.महापौर मॅडम मै आपसे गुजारीश करता हूँ की उसके हिसाबसे आप आदेश करे और इस विषय को खत्म करे। लक्षवेधी है उसपे ठराव होता नही। अगर ठराव होता है तो मै सचिव साहब से पुछता हूँ, सचिव साहेब लक्षवेधी पे ठराव होता है क्या?

**नगरसचिव :-**

लक्षवेधीवर ठराव होत नाही, त्याच्यावर फक्त चर्चा होते.

**नरेंद्र मेहता :-**

मा.महापौर मॅडम, सन्मा.सदस्य गिता जैन आणि सन्मा.सदस्य खंडेलवालजींनी लक्षवेधी उपस्थित केली आहे. ह्या शहरामध्ये महाराष्ट्रातील सर्वात मोठ तिर्थस्थान बावन जिनालय मंदिर ह्या शहरात आहे. शहराचा अभिमान आहे. कुठल्याही शहरात सर्वात जास्त जैन मंदिर असतील तर मिरा भाईंदर शहरात आहेत. जैन समाजाची जास्त संख्या मिरा भाईंदर शहरांमध्ये आहे. जैन समाज हिंसा धर्माचे पालन करत असतो. प्रभु महावीर ह्यांनी दिलेल्या मार्गदर्शनावर चालत असतो कोणावरही अन्याय होऊ नये अशी जैन समाजाची भावना असते. पर्युषण पर्व हा ८ दिवसात कुठलीही पशू हत्या होऊ नये अशी जैन समाजाची भावना आहे. कुठल्याही व्यावसायीक किंवा उद्योगपती किंवा कामकाज करणाऱ्या विरोधात नाही. त्या पवित्र दिवसामध्ये ह्या शहरामध्ये पशू हत्या होऊ नये असा त्या मागचा एक उद्देश आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकामध्ये २००-२५० कत्तलखाने जे मांस विकणारे दुकाने आहेत. दरवर्षी १५० लोकांना जैन समाज त्यांना नुकसान भरपाई देते आणि स्वखुशीने दुकान बंद करा. ३ दिवस शासनातर्फे आदेश दिले आहेत. काही अशा संस्था आहेत जे समोरून जाऊन त्यांना नुकसान भरपाई देते आम्ही ह्या जैन समाजाचे आहोत ह्या आठ दिवसाचे आम्ही तुमचे नुकसान भरपाई करतो. पण ह्या आठ दिवसासाठी आम्हाला सहकार्य करावे. मागच्या वर्षी १४० दुकानाने पैसे घेऊन दुकान स्वखुशीने बंद केली होती. समाजाची भावना आहे की आम्ही ह्या शहरातले नागरीक आहोत. नगरपालिकेने आमच्या मागणीकडे गांभिर्याने विचार करावा. बर्नड डिमोलोंनी प्रश्न उपस्थित केला की त्यांच्यात मच्छीमार येतात की नाही. जैन समाजाला माहित आहे की सगळे एका दिवसात बंद होणे शक्य नाही.

प्रत्येकाचा आपापला व्यवसाय आहे. त्यांच्यावर कोणाचा आक्षेप नाही. कोण खातो त्याच्यावरही नाही. आम्ही कत्तलखाने हा शब्द वापरतो. ह्या शहरातले कत्तलखाने ८ दिवस बंद करावे अशी ह्या समाजाची भावना आहे.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर मॅडम मला स्पष्ट करायचे आहे की गेल्या वेळेला जे उदा. मी विचारले त्यांनी मांस हा शब्द मांसळीसाठी लागू होतो आणि बायांना उठवले आणि बाजारावर बंदी घालण्यासाठी अधिकारी गेले होते. अधिकाऱ्यांनी कारवाई करून मासे विकणाऱ्यांना त्यांनी बंदी केली ते होऊ नये असे आश्वासन देत असाल तर आमचा कुठेही विरोध नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम प्रशासनाकडे शासनाचा जी.आर. आहें. त्याप्रमाणे त्यांनी कारवाई करावी. तो त्यांचा विषय आहे. जैन समाजाची ही भावना आहे की जी मटण विक्रीची दुकान आहेत जे रस्त्यावर आहे ते त्या मंदिरात जात असतात................

**मा. महापौर :-**

मेहता साहेब मला एक विचारायचे आहे की बावन जिनालय आपण हे कधी बांधले.

**नरेंद्र मेहता :-**

मी छोटा असताना.

**मा. महापौर :-**

२००७ ते २००९ पर्यंत तुम्ही महापौर होते तेव्हा कधी ८ दिवस बंद करायचे असा प्रश्न उपस्थित झाला नाही. जैन तेव्हा पण होते. आजही आहात ना. ह्या शहरामध्ये कशाला असे प्रश्न आणता जिथे सर्वांना भांडायचे आहे. मा.तुळसीदास म्हात्रे महापौर झाले तेव्हा पण ह्या हाऊसमध्ये भांडण झाले. कारण का तर ते महापौर झाले. तुम्ही असताना असा प्रश्न उठवला नव्हता. तेव्हा उठवला असता तर मी पण मान्य केले असते *की तुम्ही जैन आहेत आणि तेव्हापासून ही प्रथा स्टार्ट केली.*

नरेंद्र मेहता :-

मॅडम मी जैन आहे ते मला चांगलच ठाऊक आहे.

**मा. महापौर :-**

हे तुम्ही चुकीचे करता. नंतर हे ठराव शहरात वाटणार आम्ही सांगितले त्यांनी नाही सांगितलं. कत्तल खाना बंद करायचा नाही करायचा हा सेन्सेटीव्ह विषय आहे. धिज इज वेरी रॉंग.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

ते महापौर होते तेव्हा आम्ही हजर होते तुम्ही नव्हता.

***गिता जैन :-***

तुम्ही गेल्यावर्षी का लेटर दिलेल मतासाठी.

**मा. महापौर :-**

मी मतासाठी नव्हत दिलं.

**गिता जैन :-**

माझ्याकडे कॉपी आहे.

**मा. महापौर :-**

मी दिलेल मी कुठे सांगते दिल नाही. त्यांनी दिल मी पण दिलं.

**गिता जैन :-**

*आम्ही जैन आहोत आम्ही पाळतो तुम्ही पाळता का?*

**मा. महापौर :-**

शहरामध्ये हा सेन्सेटीव्ह विषय कोणी स्टार्ट केला. एवढी वर्ष ते महापौर असताना तुम्ही हाऊसमध्ये नव्हते.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

ह्या सेम विषयावर चार वर्षा अगोदर भांडण झाली आहेत. सगळ्यांच्या भावना आपल्याला इथे समजून चालायचे आहे.

(सभागृहात गोंधळ)

**गिता जैन :-**

लक्षवेधी सेम का आणली.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी सेम आणली तर काय झाले.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

मी फक्त एवढेच विचारले बावन जिनालय कब स्टार्ट हुआ। आपके महापौर के बाद बना है की उनके महापौर बनने के पहले। आप जैन अभी बने या जैन पहले से थे।

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम माझ्या जातीवर आक्षेप घेऊ नका. त्याचे काय मिनिंग आहे. जन्मापासून आहे. तुम्ही शब्द मागे घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

मी प्रश्न ह्यासाठी विचारला की तुम्ही महापौर असताना का विषय घेतला नाही.

**नरेंद्र मेहता :-**

लक्षवेधी महापौरांना मांडता येत नाही. मी एकटा होतो. अपक्ष होतो. त्या वेळेला कोणी करायला तयार नव्हत आज आलो आहे की आमचे बहुमत आहे.

**मा. महापौर :-**

मेहता साहेब त्यावेळेला तुम्ही महापौर असताना शरद पाटील साहेब बोला आंपण सर्वांनी त्यांना पाठिंबा दिलेला................

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

महाराष्ट्राचा जो जी.आर. आहे त्याचे पालन करून आपण दरवर्षी जसे ८ दिवस करतो........

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये हिंदु, मुस्लिम, सिख, इसाई सगळे लोक राहतात. माझी विनंती आहे महाराष्ट्र शासनाचा जी.आर. आहे त्याप्रमाणे प्रशासनाने योग्य ती आणि स्ट्रिक कारवाई करावी.

**फरिद कुरेशी :-**

मॅडम मला दोन तीन विषय घ्यावे लागतील. सर्व प्रथम गिता जैन मॅडम बोलल्या अहमदाबादचा विषय माझे असे म्हणणे आहे की ह्या विषयावर मॅडम पण माझे समर्थन करतील असे वाटते. जैन समाजाचा जो काही ८ किंवा १८ दिवसांचा जो काही विषय असेल ठिक आहे. पण अहमदाबाद गुजरातमध्ये दारूबंदीपण आहे. आणि रमझान महिना आहे. आमच्या समाजाला किंवा इतर समाजाला दारू बंदीचा विषय असतो. तर त्याचे पण आपण पालन करावे असे मला वाटते. तर आपण व्हाईन शॉप, व्हाईन हॉटेल बंद करा. दुसरा विषय असा आहे मी स्वतः खाटीक समाजाचा आहे. ८ दिवस १० दिवस हा व्यवसाय बंद करण्यासारखा हा विषय आहे. व्यवसाय बंद करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जो दोन दिवसाचा जी.आर. दिलेला आहे त्याचा रिस्पेक्ट करून दोन दिवस आम्ही बंद करीत होतो. मागच्या वर्षी मी स्वतः जाऊन बघितले की जेव्हा प्रशासनाची लोक, पोलिस अधिकारी तिकडे बंद करायला जातात किंवा जी.आर. ची अंमलबजावणी करायला जातात त्या वेळेला आपल्या जैन समाजाची लोक किंवा बजरंग दलची लोक बंद करायला जातात. आणि हि स्टेप घेताना तिथे टेन्शन वाढतो हे सुध्दा कंट्रोल करण्यासाठी आपल्याकडे मोठी जबाबदारी आहे. आणि मला असं वाटत घेतलच पाहिजे आणि व्यवसाय करणारी जेवढी लोक आहेत १४० दुकानाला बंद करून जर कन्फसेशन करतात ते चुकीचे आहे. कारण तिकडे भरपूर लोक आहेत स्पेसिफीकली पिन पॉईन्ट करून तिकडे जाऊ शकत नाही. त्याच्या मुळे लोकांचे नुकसान होते. दुसरा विषय असा होता की मच्छी हा वेज आहे की नानवेज आहे. मॅडम मला वाटते प्रशासनानी वेज आणि नॉनवेज ह्याच्यातले डिफरन्स सांगितले तर ह्याचे उत्तर होईल. कारण जे फ्रुट, व्हेजीटेबल आहेत त्याच्यात जीवन नाही त्याच्यात ब्लड नाही. म्हणजे रेड असला तर ब्लड आहे. व्हाईट असला तर ब्लड नाही आहे का? त्याच्यावर निर्णय घ्यावा जास्त चर्चा न करता महाराष्ट्र शासनाचे जे दोन दिवसाचे दिले आहे त्याच्यावर अंमलबजावणी करण्यांत यावी नाही जर गुजरातचे डेफिनेशन घेऊन करायचे आहे तर दारूबंदी सुध्दा झाली पाहिजे. आणि ते झाल्याशिवाय हे करण चुकीचे होईल अस मला सभागृहाला सांगायचे आहे.

**मा. महापौर :-**

मी प्रशासनाला एवढेच सांगू इच्छिते की महाराष्ट्राचा जो जी.आर. आहे त्याप्रमाणे आणि प्लस आठ दिवसाची सगळ्याची मांग आहे त्याप्रमाणे तुम्ही कारवाई करावी.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम आता भगवती शर्मा साहेबांनी विचारले की ठराव होतो की नाही होते. लियाकत शेख साहेबांनी तो विषय आणला होता. उत्तनमध्ये स्ट्रिट लावण्यासंबंधी लक्षवेधीच्या माध्यमातून आणि तो ठराव मांडला आपण स्विकारला. प्रशासनाला ते पटले नाही म्हणून ४५१ खाली प्रशासनाने सुध्दा गव्हरन्मेंला विखंडीत साठी पाठवले आहे. म्हणजे ठराव त्याच्यावर झालेला नाही. आपण त्याच्यावर निर्णय दिलेला आहे मी ठराव मांडत नाही. आपण जे आदेश दिले आहे त्याचे खरोखर आम्ही समाजातर्फे अभिनंदन करतो. आपल्याला विनंती राहील की जो शब्द प्रोसेडिंगमधून काढण्यांत यावा मी कुठल्या समाजाचा त्याचा वेगळा मेसेज जाता कामा नये. आम्ही एक सुचना देत आहोत की, जैन समाज मोठ्या प्रमाणात मिरा भाईंदर शहरात रहात आहेत. जैन समाजाच्या भावनांचा विचार करता दरवर्षी पर्युषण पर्व आठ दिवस शहरातील कत्तलखाने बंद

ठेवावेत, अशी सुचना मांडत आहे. गरज पडल्यास मटणविक्रेता दुकानदारांना माझ्या मानधनामधून त्यांचे नुकसान भरण्यांत यावे अशी सुचना मांडत आहे.

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

मानधनामधून अलाऊड आहे का?

**नरेंद्र मेहता :-**

माझे पैसे कुठेही वापरू शकतात.

**भगवती शर्मा :-**

मैं बोलता हूँ आप कायम स्वरूपी दे दिजीए लेकीन प्रश्न यह उठता है सुचना किसके उपर है।

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम आपण सभागृहात मिरा भाईंदरचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी १०० लोक जमलेलो आहेत. आपण महापौर, उपमहापौर, सभागृह नेते आहे. विरोधी पक्षनेते आहेत, सभापती आहेत. सगळे जाणते नगरसेवक आहेत. एक कळकळीची विनंती आहे हे सभागृह आहे. आपण झटकन हसत घेतो. लवकर विसरतो हि आपली पुण्याई आहे. भाईंदरमध्ये सगळ्या समाजाची लोक, सर्व धर्माची लोक, सर्व राजकीय पक्षाची लोक हातात घेऊन नाचायला लागतात आणि शांत होतात. ही जमेची बाजू आहे. अनेक राज्यामध्ये अनेक दंगली झाल्या. महाराष्ट्रात ही झाल्या. त्या मिरा भाईंदरमध्ये नाहीत, हा हलका विषय नाही. सगळ्या सभागृहात धन्यवाद तुमचे नेतृत्व झाले म्हणून तुमचे धन्यवाद. हा विषय आपल्या सन्मा.सदस्यांनी आणला तर कसा आणावा आणि धरावं तर किती धरावं जस आज धरलं आणि सोडलं. असेच व्हायला पाहिजे. ह्या धार्मिक भावना आहेत तुम्ही मगास पासून विचारतां काका काय बोलतात. कोणी सांगितले कोण आहे. तो ज्या जातीचा आहे त्याच जातीचा आहे. मी आग्री बोलाव की नाही बोलावं तुम्हाला काय अर्थ लावायचा तो लावा, कोणी काय खावं, कोणी काय प्यावं हा ज्याचा त्याचा निर्णय आहे. समाजावर आपण जेव्हा बांधीलकी करतो. त्याचे अन्य परिणाम काय त्याचा नक्की अंदाज असला पाहिजे. जैन समाजाच्या भावना आपण लक्षात घेतल्या पाहिजेत. मनपाने किंवा ह्या सभागृहाने त्यांच्यासाठी जे काही करता येईल त्याला राजकीय रंग न देता किती सहानुभूतीने करता येईल तेवढे करायचे आहे. नियम ते काही नाही. हे नियम दाखवायला लागले तर प्रत्येकाचे नियम आहेत, मुस्लिम धर्माचे, हिंदु धर्माचे, जैन धर्माचे, बौध्दाचे नियम आहेत आणि परप्रांतिक आहेत, तमिळवाले हूक लावतात मी एकदा गेलो होतो मी डोळेच बंद करून होतो. पण त्यांची श्रध्दा आहे ती अंधश्रध्दा आहे. कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे. आपल्याला पुढारी म्हणून बोलवतात आपण जातो. ते पाठीवर इकडे तिकडे खिळे टोचतात, लहान मुल, मोठी आणि बायकांचे पण हे आपल्या भाईंदरमध्ये आहे. महाराष्ट्र शासनाने दिलेले निर्देश आपल्या सभागृहाने अधिकाऱ्याने पाळावे पण हेही खरे आहे की ज्यावेळी अधिकारी अंमलबजावणी करतात मी डोळ्याने बघितले आहे. मटणाच्या दुकानावर सरळ केमीकल टाकून दिले. ते मटण त्यांनी विकतच आणले असेल ना, मच्छीच्या टोपल्या फेकून दिल्या असेही व्हायला नाही पाहिजे. कोणाच्याही प्रभागाखाली कुठेही काम करतो, असे अधिकाऱ्यांनी करायला नाही पाहिजे. आपल्या नियमाची अंमलबजावणी अशी व्हायला पाहिजे की त्या शहरातले जे नागरीक त्यांची समजूत पटवून त्यांनी विकावं हे शहर मासळीवरच उभ आहे. मिठावर शहर उभ आहे. मिठ पिकणारच इथे. सगळे शहरीकरण झाले म्हणून शेती गेली, मिठ गेले, मासळी गेली असे होणार नाही. त्यामुळे आपण सगळ्यांनी समजून घ्यायचा हा विषय आहे. मी चौपाटीवर गुलाब बगीचा उभा केला. बगीचा बघायला सगळेच जातात. साधू आले. दोन समाज उभे राहिले. एक म्हणतो ह्यांना प्रवेश द्या एक म्हणतो ह्यांना प्रवेश देऊ नका आणि दोन्ही समाजामध्ये मी अत्यंत मान्यवर दोन्ही समाजाचा लाडका इकडे बघू की तिकडे बघू. कोणाकडे बघायच. अत्यंत गंभीर विषय त्यामुळे माझी सभागृहातील सन्मा.सदस्यांना विनंती आहे की आपण लोकांचे प्रतिनिधीत्व करतो. आपला चुकीचे जरी एखादा शब्द निघाला तर त्याचा अर्थ फार वेगळा लागतो मी देवाला प्रार्थना करतो आम्ही १०० लोक भाईंदरच्या भल्यासाठी सर्व धर्माच्या सर्व समाजाच्या लोकांच्या भविष्यासाठी कार्यरत आहोत. मी काय बोललो सगळ्यांच्या लक्षात आले असेल धन्यवाद.

**गिता जैन :-**

मॅडम मला निर्णय पाहिजे.

**मा. महापौर :-**

मी निर्णय दिला ना. ८ दिवस बंद राहणार आणि २ दिवस जी.आर. प्रमाणे ते बर्नड डिमेलो साहेबांनी सांगितले. जी.आर. आहे. परंतू ते ही लक्षात घेता. आणि होत असेल तर ८ दिवस बंद ठेऊ या.

**आसिफ शेख :-**

मॅडम शासनाच्या जी.आर. प्रमाणे दोन दिवसच आहे बाकी आपण त्यांना विनंती करायची आहे.

**जुबेर इनामदार :-**

त्यांची नुकसान भरपाई करून दिल्यावर ते बंद ठेवतील. त्याची नुकसान भरपाई एकाच्या मानधनावर भागणार नाही. ज्यांना द्यायचे असेल त्यांनी उदार होऊन द्यावे.

**बर्नड डिमेलो :-**

अधिकाऱ्याबरोबर विशेष काही तरी संघनाची लोक जातात आणि तिथे केमिकल टाकून नासधूस केली जाते ते अधिकाऱ्याने तसे करू नये. मच्छीमार किंवा मटण विक्रेत्यासाठी शहरामध्ये कोणती सुविधा उपलब्ध केली नाही. मिरा भाईंदरमध्ये कुठेही कोल्ड स्टोरेज नाही. सुचना दिल्या कारणाने महाराष्ट्राचा जी.आर. असल्याकारणाने त्या व्यापाऱ्यांनी माहित असते की ह्या काळात घेतले तर आमचे नुकसान होईल हा विषय बघून ती लोक कत्तल करीत नाही. परंतू जे एक्स्ट्रा दिवस करतो जे मटण कापतात ते कापायचे थांबतील त्यांचे नुकसान थांबेल पण मासेमारीसाठी आठ-आठ दिवस जातात. बर्फ, डिझेल खर्च करून शहरामध्ये आणले जाते ते आपल्याकडे ठेवण्यासाठी सोय नाही. मच्छी मार्केट लोक जागे होण्या अगोदर बंद होतात. साफसफाई व्यवस्थीत करावे. त्याची चप्पल भिजली नाही पाहिजे. परंतू त्यांच्यातून मांसळी वगळावी. जे बंद करायला जाता त्यांनी संघटना आणि संस्थांना सोबत घेऊ नये नाहीतर ह्याच्यामध्ये वाद चिघळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**मा. महापौर :-**

मी रुलींग दिलेली आहे. आता सर्वांनी बसून घ्यावे याच्यावर आता चर्चा करायला द्यायची नाही.

**गिता जैन :-**

तुम्ही जे सांगता बजरंग दल किंवा जैन त्यांच्याबरोबर जातात. कुरळेकर साहेब ते कंट्रोल करत नाही म्हणून आम्हांला जावे लागते.

**मा. महापौर :-**

तिकडे भांडण होतात गेल्यावर्षी मारामारी झालेली मी स्वतः गेलेली......................

**गिता जैन :-**

कारण कुरळेकर साहेब किंवा आपले अधिकारी ते बंद करून घ्यायला सक्षम नाहीत.

**मा. महापौर :-**

सक्षम नाहीत आहे नाही ज्याची दुकाने आहे त्यांना तीन दिवस जी.आर. प्रमाणे बंद ठेवतात. तिकडे मासेमारी होते.

**गिता जैन :-**

नाही ठेवत. तीच कम्प्लेन्ट आम्ही कुरळेकर साहेबांना देत असतो त्यांना विचारा.

**फरीद कुरेशी :-**

जी.आर. प्रमाणे दोन दिवस.

**मा. महापौर :-**

सर्वांनी बसून घ्या. पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२, दि. ११/०२/२०१४ व दि. ०१/०३/२०१४ (दि. ११/०२/२०१४ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दि. ११/०२/२०१४ व दि. ०१/०३/२०१४ (दि. ११/०२/२०१४ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १२ :-**

प्रकरण क्र. १२, दि. ११/०२/२०१४ व दि. ०१/०३/२०१४ (दि. ११/०२/२०१४ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १४ :-**

दि. ११/०२/२०१४ व दि. ०१/०३/२०१४ (दि. ११/०२/२०१४ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील       अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३, मानधनावरील लघुलेखक / संगणक चालक यांच्या मुदतवाढी बाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यांत आलेला असून संगणक चालविणेसाठी संगणक चालक व मा. महासभा, स्थायी समिती सभा व अन्य समित्यांची इतिवृत्तांते तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने जाहिर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन उपलब्ध उमेदवारांच्या मुलाखती घेऊन दि. २८/०२/२००७ रोजीच्या आदेशान्वये एकुण ८७ संगणक चालक तथा लिपिक व ४ लघुलेखक यांची ठोक मानधनावर पाच महिन्यांकरीता नेमणूक करण्यात आली होती. सदरच्या नेमणुकीस मा. स्थायी समिती सभा दि. ०८/०३/२००७ ठराव क्र. २०१ अन्वये मंजुरी दिलेली होती. सदरचे ठोक मानधनावरील संगणक चालक व लघुलेखक यांना वेळोवेळी मा. महासभेच्या मान्यतेने एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मा. महासभा दि. २१/०९/२०१३ ठराव क्र. ३२ अन्वये दि. ३०/०८/२०१३ रोजी सदरच्या नेमणुकीची मुदत संपत असल्याने एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन एक वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे. या अनुषंगे सदरच्या नेमणुकीची मुदत दि. ३१/०८/२०१४ रोजी संपत आहे. सद्यस्थितीत मा. महासभा दि. १४/१२/२०१२ (दि. ०१/१२/२०१२ ची तहकुब सभा) ठराव क्र. २२ अन्वये संगणक चालक यांना दरमहा रु. ९,५००/- व लघुलेखक यांना रु. १०,५००/- इतके मानधन अदा करण्यात येत आहे. यापुढे संगणक चालक यांना दरमहा रू. १३,०००/- व लघुलेखक यांना रू. १४,०००/- इतके मानधन माहे सप्टेंबर २०१४ पासून अदा करण्यास ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण २०१४ मध्ये "माहिती नोंदणीकार" (Data Entry Operator) असे पद नमुद आहे. संगणक चालक व "माहिती नोंदणीकार" (Data Entry Operator) या पदांची शैक्षणिक पात्रता व कामाचे स्वरुप हे सारखेच आहे. वरील पदे मंजूर करण्याकरिता आस्थापनेच्या खर्चात जरी वाढ होत असले तरी महापालिकेचे संगणकीकरण प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीकोनातून व खास बाब म्हणून आपण स्वतः लक्ष घालून त्वरीत नविन प्रस्ताव तयार करुन शासनाकडे मंजूरी करिता पाठवावा. तसेच संगणक चालकांना दिर्घ सुटीचा लाभ देता येत नाही याकरिता महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. अरजा-२४९६/१४/सेवा-९, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. १ मार्च १९९० या शासन निर्णयाप्रमाणे दरमहा २१/२ दिवस याप्रमाणे अर्जित रजा देण्यात यावी. याबाबत प्रशासनाने महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभाग शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच ठोक मानधनावर घेण्यांत आलेल्या १० कनिष्ठ अभियंता यांची मुदत संपली असल्याने कार्यरत असणाऱ्या सर्व कनिष्ठ अभियंताना देखील एक वर्षाची मुदत वाढ देण्यांत यावी.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**आसिफ शेख :-**

ह्या ठिकाणी जो ठराव मांडलेला आहे त्याचप्रमाणे जे कनिष्ठ अभियंते ठोक मानधनावर कार्यरत आहेत त्यांची मुदत संपलेली आहे. त्यांचीही एक वर्षाची मुदत वाढ देण्यांत यावी. ते ॲड करुन घेण्यात यावे.

**शरद पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यांत आलेला असून संगणक चालविणेसाठी संगणक चालक व मा.महासभा, स्थायी समिती सभा व अन्य समित्यांची इतिवृत्तांते तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने जाहिर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन उपलब्ध उमेदवारांच्या मुलाखती घेऊन दि. २८/०२/२००७ रोजीच्या आदेशान्वये एकुण ८७ संगणक चालक तथा लिपिक व ४ लघुलेखक यांची ठोक मानधनावर पाच महिन्यांकरीता नेमणूक करण्यात आली होती. सदरच्या नेमणुकीस मा.स्थायी समिती सभा दि. ०८/०३/२००७ ठराव क्र. २०१ अन्वये मंजुरी दिलेली होती. सदरचे ठोक मानधनावरील संगणक चालक व लघुलेखक यांना वेळोवेळी मा.महासभेच्या मान्यतेने एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मा. महासभा दि. २१/०९/२०१३ ठराव क्र. ३२ अन्वये दि. ३०/०८/२०१३ रोजी सदरच्या नेमणुकीची मुदत संपत असल्याने एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन एक वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे. या अनुषंगे सदरच्या नेमणुकीची मुदत दि.३१/०८/२०१४ रोजी संपत आहे. सद्यस्थितीत मा.महासभा दि.१४/१२/२०१२ (दि.०१/१२/२०१२ ची तहकुब सभा) ठराव क्र.२२ अन्वये संगणक चालक यांना दरमहा रु.९,५००/- व लघुलेखक यांना रु.१०,५००/- इतके मानधन अदा करण्यात येत आहे. यापुढे संगणक चालक यांना दरमहा रू.११,५००/- व लघुलेखक यांना रू.१२,५००/- इतके मानधन माहे सप्टेंबर २०१४ पासून अदा करण्यास ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे. त्याचप्रमाणे संगणक चालकांना दिर्घ सुटीचा लाभ देता येत नाही याकरीता महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.अरजा-२४९६/१४/सेवा-९, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. १ मार्च १९९० या शासन निर्णयाप्रमाणे दरमहा २१/२ दिवस याप्रमाणे अर्जित रजा देण्यात यावी. याबाबत प्रशासनाने महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभाग शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ परिशिष्ट.२ अ.क्र. ३१ अन्वये श्रेणी -३ तांत्रिक सेवा, पदनाम - **"माहिती नोंदणीकार"** या पदाच्या पद निर्मितीच्या मंजुरीसाठी नविन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. महानगरपालिका आस्थापनेवर सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग, अतिक्रमण व अनधिकृत नियंत्रण विभागात ठेका पध्दतीने एकुण ०८ कनिष्ठ अभियंता कार्यरत आहेत. सदर कर्मचाऱ्यांचे मासिक ठोक वेतन रक्कम रु.२०,००० इतके आहे. सदर कार्यरत कंत्राटी पध्दतीवरील कनिष्ठ अभियंता यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | नाव | कार्यरत विभाग | नियुक्ती दिनांक | कंत्राटाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. शेळके विकास रामचंद्र | पाणी पुरवठा विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| २ | श्री. चौधरी रशिकांत दामा | पाणी पुरवठा विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ३ | श्री. महाजन संदीप प्रकाश | सार्व. बांधकाम विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ४ | श्री. पाटील कुंदन काळूराम | अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ५ | श्री. करंजकर लकेश अर्जून | सार्व. बांधकाम विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ६ | श्री. नलावडे अतिश दिनेश | सार्व. बांधकाम विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ७ | श्री. शेख इम्तीयाज फैज अहमद | अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ८ | श्री. चौधरी तुषार मोहन | सार्व. बांधकाम विभाग | दि.१६/१२/२०१३ | ११ महिने |

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध तांत्रिक विभागातील कामकाजाचे स्वरुप, कामाचा वाढता व्याप पाहता तसेच विविध योजना कार्यरत असल्याने वरील कंत्राटी पध्दतीवरील कनिष्ठ अभियंता यांना १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन ११ महिन्याची मुदत वाढ देण्यास ही सभा मंजूरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

**निलम ढवण :-**

माझे अनुमोदन आहे. मॅडम आता जो ठराव मांडला त्यामध्ये इतरही विभागामध्ये म्हणजे एलबीटी, बांधकाममध्ये जी मुले कॉम्प्युटरवर काम करतात ती ठेकेदारामार्फत अपॉइन्ट केलेली आहेत परंतू ठेकेदार पालिकेकडून ९५००/- घेतात त्यांना ७०००/- रू. दिले जातात. तर त्याही मुलांना मानधन दिले जावे किंवा ठेकेदारांशी आपण बोलून किंवा त्या २३ मुलांचा समावेश करून घेण्यांत यावा अशी मी आपणांस सुचना देत आहे. त्या मुलांना वेळेवर पगार दिला जात नाही. त्यांचा पगार वाढला व त्यांना सामावून घेतल तर त्याची काय करण्याची मानसिकता व उत्साह वाढेल हि सुचना आपण ह्यामध्ये घ्यावी.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम ध्रुवकिशोर पाटील ने ठराव वाचन किया आसिफ शेखने सुचना दी। इन्होने ठराव में एक फरक किया है हमने इनकी दरमहा १३०००/- संगणक चालक और १४०००/- रू. लघुलेखक लिखा था मेरा सन्मा.सदस्यसे निवेदन है उस पगार को उतना रखा जाए।

**जुबेर इनामदार :-**

अर्थसंकल्पामध्ये १ कोटी २० लाखाची तरतूद आहे. १ लाख ११ हजार खर्च होतो.

**भगवती शर्मा :-**

पगार कम मत करीए।

**नरेंद्र मेहता :-**

माझ अस म्हणणं आहे जी काय रक्कम तरतूद केलेली आहे कर्मचारी परहेड डिव्हायडेड केले तर किती रक्कम येते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तरतूदी प्रमाणे १३ हजार आणि १४ हजार.

**नरेंद्र मेहता :-**

१४ आणि १.२० पूर्ण होतात की कमी पडतात जास्त पडतात.

**जुबेर इनामदार :-**

पूर्ण होतात. १ कोटी ११ लाख होतात.

**भगवती शर्मा :-**

इतने टाईमसे सेवा कर रहे है। उनको परमनन्ट का कुछ चान्स नही मिल रहा। और सबसे ज्यादा मेहनत वही कर रहे है।

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम ह्या मनपामध्ये आपले असे दुर्भाग्य आहे की संगणक चालक गेल्या १० वर्षापासून मागणी करतात की आम्हाला कायम करा. पगार १००० रू. अजून कमी द्या. त्यांच्या बरोबर चर्चा करून हा ठराव मांडलेला आहे. वृक्षप्राधिकरणचे दोन महिन्या अगोदर मंजूर केले. ती पद मान्य होऊन आली आणि हे १० वर्षापासून करतो तें होत नाही. त्याच्या मागचे कारण काय ते अजून कळत नाही. त्या संगणक चालकांना खरोखर घ्यायचे नाही की त्यामागे प्रशासन मेहनत करत नाही. दोन महिन्यात इतर पद मंजुर होऊन येतात हे १० वर्षापासून अनेक ठराव झाले काही होत नाही अशी काय जादू झाली की ते दोन महिन्यात आले त्या व्यतिरीक्त ही इतर ठराव असतील आरोग्याचे पाणी पुरवठ्याचे सगळे असतील ते मंजूरच होत नाही. मग असे समजायचे का की प्रशासनाला किंवा अधिकाऱ्यांना ज्याच्यात इंटरेस्ट आहे तेच मंजूर होतील बाकी मंजूर होणार नाही. त्यांना पगार नको त्यांना परमनन्ट करा ही त्यांची मागणी आहे. मा.महापौर मॅडम सरकार आपली आहे. सत्ता आपली आहे. त्यांच्यासाठी प्रयत्न केले तर नक्कीच होऊ शकते. त्या दोन महिन्यात हे आले तर तेही यायला पाहिजे.

**आसिफ शेख :-**

पगाराची वाढ सांगितली आहे. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी ठरावात १३०००/- आणि १४०००/- आणि कनिष्ठ अभियंता जे आहेत त्यांना २० च्या ऐवजी २५०००/- करण्यांत यावे.

**जुबेर इनामदार :-**

सर्व सभागृहाची भावना त्यांना मदत करण्याचीच आहे. त्यांना सामावून घेण्याची आहे.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांना सामावून घेण्याची असेल तर १० वर्षाप्रमाणे जो त्यांचा पेस्केल निघतो त्याला आम्ही मान्य करतो.

**भगवती शर्मा :-**

करा ना. आम्हांला काही हरकत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

सेना, भाजपची आणि बहुजन विकास आघाडीची भूमिका राहील. १० वर्षा अगोदर त्यांचा जो काही बेसीक होता आज काय व्हायला पाहिजे ३०,०००/-, ३५,०००/- तो तुम्ही प्रस्ताव आणा आम्ही मान्य करतो. (सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

अभी मैने ठराव में यह अमाऊन्ट है तो कॅल्क्युलेशन कर रहे थे और अभी बोल रहे है। साहब कही तो न्याय की बात करीए जो मिल सके। वो वाली बात करीए।

**नरेंद्र मेहता :-**

उनको पैसा नही नोकरी चाहिए। १० साल से भाग रहे है।

**भगवती शर्मा :-**

मानधन के हिसाब से जो पगार है वह देने मे क्या हरकत है।

**प्रभात पाटील :-**

ह्या मनपामध्ये सर्वात काम करणारा जो वर्ग असेल तर तो संगणक चालक आहे. मा. आयुक्तांनाही ते पटते. आपल्या लिपीकांना कॉम्प्युटर हॅन्डल करता येत नाही. तरी वरिष्ठ श्रेणी प्राप्त झाल्या अशा पेपरला बातम्या आल्या. सगळीच्या सगळी कामे हे संगणक चालक करतात. आता तर अशी परिस्थिती आहे की एखाद्या अधिकाऱ्याला त्याचा संगणक चालक हलला तर चालत नाही. त्याच सगळ काम ठप्प होते. साहेब खर की खोटं. ह्याच्यावर गेले ३ महिने भानगडी चालू आहेत की माझा संगणक चालक परत येईपर्यंत मला दुसरा नको अशी प्रत्येक विभागाची परिस्थिती आहे की माझा संगणक चालक मला येऊ दे. तर माझे काय मी करेन अन्यथा सावंत साहेबासारखा माणूस स्वतः कॉम्प्युटरवर बसतात का तर त्यांचा चांगला संगणक चालक गेला हा त्यांचा आरोप आहे. असे बरेच जणांचे आहे की परिस्थिती आहे की ह्या पालिकेचा संपूर्ण कारभार संगणक चालक हाताळतो असे असताना १० वर्षात आपण त्यांना दुर्लक्षित केले आहे. मेहता साहेब बोलले त्यांच्यात काही गैर नाही. सगळ्या विभागाची पद मंजूर होऊन येतात मात्र संगणक चालकासाठी होत नाही. मागच्या स्टॅन्डींगमध्ये विषय आला तेव्हा मा.आयुक्त शितोळे साहेब बोलले शितोळे साहेबांनी त्यांच्यात स्वतः त्यांच्यामध्ये इनेशिटिव्ह घेतलेल. मला वाटते तुमच्या मान्यतेने तो प्रस्ताव मंत्रालयात गेला. तिथून परत येताना त्याच्यामध्ये काय क्युरिज काढल्या मला माहित नाही. काही जण म्हणतात त्याच्यात काहीच झालेले नाही नेमकी वस्तुस्थिती काय आहे ते सभागृहाला कळले पाहिजे की नेमकं तिथे काय झाले असा क्युरिज काढून प्रस्ताव आला तर त्या क्युरिज आपण तपासल्या पाहिजे. त्याची पूर्तता केल्या पाहिजे. आपल्याकडे अनेक जागा आहेत माहिती संगणककार म्हणून जागा, काही लिपीकाच्या जागा आहेत त्या अजून भरायच्या आहेत. इथेसुध्दा ह्या मुलांचे समायोजन होऊ शकते परंतू आपली मानसिकता नाही. प्रशासनाची मानसिकता नाही. साहेब एक हद्द असते त्या लोकांनी किती अन्याय सहन करायचा. मी म्हणते १२०००, १४००० करणे हा विषय नाही आहे. त्यांचा परमनन्ट सोल्युशन काढणे हा विषय आहे. तो लवकरात लवकर मार्गी लावावा.

**मा. आयुक्त :-**

मी आपल्याला सांगू इच्छितो की प्रशासनाला इंटरेस्ट नाही असे काही नाही. १२ नोव्हेंबरला ह्यांचा प्रस्ताव पाठवलेला आहे. त्याबाबतील मा.महापौर मॅडम एकदा जाऊन आल्या आहेत. मी पण प्रयत्न केलेला आहे. शासन स्तरावर हे प्रलंबित आहे. कुठल्या प्रकारची क्युरीज वगैरे आलेली नाही. कालच्या स्टॅडींगमध्ये हे सांगितले की एखाद्या विभागाचा प्रस्ताव मंजुर झाला तर हाही प्रलंबित आहे तर प्रयत्न चालू आहेत.

**आसिफ शेख :-**

मा.महापौर मॅडम ह्या संदर्भात सन्मा.आमदार गिल्बर्ट मेंडोन्सानी पत्र दिले आहे. आम्ही स्वतः पत्र दिले आहे. अजित दादांनी पत्र दिले आहे.

**मा.महापौर :-**

मी स्वतः आणि नोव्हेंबरमध्ये शितोळे साहेबांकडे आयुक्तांचा कारभार होता तेव्हा आम्ही दोघे जाऊन ह्याच्या विषयी प्रयत्न केले आहेत.

**आसिफ शेख :-**

माझी अशी विनंती आहे की, शितोळे साहेबांनी जबाबदारी घ्यावी. आपण मनात आणले तर ताबडतोब दोन दिवसात करू शकता. आपण स्वतः जबाबदारी घेऊन त्या संगणक चालकाचे आपण कल्याण करावे.

**जुबेर इनामदार :-**

मा.महापोर मॅडम केलेल्या ठरावाप्रमाणे त्याच्यामध्ये सेवाभरती व सेवा वर्गीकरण २०१४ मये माहिती नोंदणीकरीता डाटा एन्ट्री ऑपरेटर ही जागा नमूद आहे. ज्या काही जागा असतील तेवढ्यामध्ये त्याचे समायोजन करता येईल. ह्या संगणक चालकाचे तो प्रयत्न तरी आपल्याला करायला लागेल आणि केला पाहिजे. माझी विरोधी पक्षनेत्यांना एक विनंती आहे पूर्ण सभागृहाची एकच मनस्थिती आहे. मानधनावर काम करणाऱ्या संगणक चालकांना कामावर घ्यावे. दोघांचे ठराव आलेले आहेत. फक्त त्याच्यामध्ये जो पगारवाढीचा जो विषय आहे तर माझी विरोधी पक्षनेत्यांशी विनंती आहे आम्ही जी पगारवाढ सुचवली आहे त्याला मान्यता द्यावी. तसेच कनिष्ठ अभियंत्याचा विषयाचा उल्लेख केला. त्यांना देखील मुदत वाढ देण्यांत आली पाहिजे. उल्लेखनीय श्रीकृष्ण मोहिते त्यांना अतिक्रमण विभागाचा प्रमुख म्हणून बसवले आहे. अतिक्रमण विभाग हा आपल्या पालिकेवर हे पद मंजुर नाही त्यांचे काम असे आहे की प्रधान अधिकाऱ्यांची माहिती गोळा करायची, तारांकित प्रश्न, आर.टी.आय. मधले प्रश्न ह्याची उत्तर द्यायची. आपल्याला कनिष्ठ अभियंत्यांची गरज आहे. चांगला काम करणारा माणूस त्यांना तिकडे ऑफिसमध्ये बसवून ठेवले आहे. त्यांना सार्वजनिक बांधकामाच्या कामासाठी पाठवा. त्यांच्याकडे गेल्यावर ते बोलतात मला कोणत्याही कामाची माहिती नाही. कुठे अनधिकृत बांधकाम आहे त्याची माहिती मी देऊ शकत नाही. कधी तोडले त्याची माहिती देऊ शकत नाही. मला प्रभाग अधिकारी जशी माहिती उपलब्ध करून देतील तसेच मी उत्तर देईन. मी ह्या कामासाठी नाही हे पद मंजुर नाही मला इथे जबरदस्ती बसवण्यांत आले आहे. असे उत्तर एक अधिकारी आम्हांला देतो. त्यांना तिकडे कामच करायचे नाही तर त्यांना तिकडे का बसवले आहे. हा विषय ह्या महासभेसमोर अगोदर आला होता. आपण आयुक्तांना निर्देश द्यावे की ते अभियंता वर्गाचा माणूस आहे त्याला त्याच्या कामामध्ये लावावे.

**मदन उदित नारायण सिंग :-**

मा.महापौर मॅडम एक सुचना आहे. अभी जो विषय लाया गया। मानधनावरील संगणक चालक मुदतवाढ करने के हिसाब से होना चाहिए। काम के हिसाब से मानधन में वाढ भी होनी चाहिए। लेकिन काम की गुणवत्ता भी देखनी चाहिए। मेरा एक अनुभव बता रहा हूँ, मैं जब प्रभाग समिती का सभापती था। नोव्हेंबर २०१३ में मैंने मिटींग लिया था और आज जुलै २०१४, ९ महिने हो गए लेकिन उस मिटींग की प्रोसेडिंग अभी तक नहीं आयी। इसके तरफ भी ध्यान देना चाहिए। इसकी कम्पलेन्ट सचिव साहब से कमसे कम १० बार किया होगा। मा. आयुक्त साहब की ५-६ बार किया होगा फिर भी उसकी प्रोसेडिंग प्रभाग समिती में नहीं मिली। इसपे ध्यान दिजीए।

**निलम ढवण :-**

मॅडम सुचनेसहित घेतले ना.

**मा. महापौर :-**

हो.

**निलम ढवण :-**

मॅडम मी दुसऱ्या एका महत्वाच्या लोकांच्या संबंधित असलेला विषय घेऊ इच्छिते.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

माझी एक सुचना आहे, कमिशनर साहेब मी तुम्हाला एक डेमो दाखवू इच्छितो. तुम्ही सांगाल त्या तारखेला सर्व नगरसेवकांना घेऊन एक डेमो दाखवतो. तो असा डेमो आहे. भाईंदर स्वच्छ दिसणारा डेमो आहे. तुम्ही घरी बसून लॅपटॉपवर गटाराचे, रस्त्याचे किंवा बांधकामाचे काम चालू आहे किंवा काय ते दिसू शकते. मी चेअरमेन साहेबांना सांगितले माझे मित्र येऊन गेले परंतु डेमो ठेवायला त्यांना परमिशन दिली नाही. सगळ्यांना धरुन काम बघता येतात. तुम्हालाही कुठे जायला त्रास होणार नाही. कमिशनर लोक जात नाही. काम काय चालले आहे ते बघायला कमिशनरला बोलवल तर येत नाही. तुम्ही ऑफिसमध्ये बसून काय काम चालले आहे ते बघा. ज्यांना आपण कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे त्याच्यापेक्षा लो बजेटमध्ये ते करायला तयार आहेत. चांगले काम आहे ह्याच्यासाठी तुम्ही हा ठराव मांडावा आणि डेमोसाठी मला तारीख द्यावी त्यांना बोलवून दाखवतो.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३ करीता दोन ठराव आले आहेत पहिला ठराव सुचक श्री. ध्रुवकिशारे पाटील, अनुमोदन जुबेर इनामदार. दुसरा ठराव सुचक श्री. शरद पाटील, अनुमोदन सौ. निलम ढवण. सुचक श्री. शरद पाटील, अनुमोदन सौ. निलम ढवण ह्यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. ध्रुवकिशारे पाटील, अनुमोदन जुबेर इनामदार ह्यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक सन्मा. श्री. शरद पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४५ विरोधात ३८ तटस्थ ० इतकी मते पडली आहेत. सन्मा. श्री. शरद पाटील ह्यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३ :-**

मानधनावरील संगणक चालक/लघुलेखक यांच्या मुदतवाढी बाबत.

**ठराव क्र. १५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यांत आलेला असून संगणक चालविणेसाठी संगणक चालक व मा. महासभा, स्थायी समिती सभा व अन्य समित्यांची इतिवृत्तांते तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने जाहिर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन उपलब्ध उमेदवारांच्या मुलाखती घेऊन दि. २८/०२/२००७ रोजीच्या आदेशान्वये एकुण ८७ संगणक चालक तथा लिपिक व ४ लघुलेखक यांची ठोक मानधनावर पाच महिन्यांकरीता नेमणूक करण्यात आली होती. सदरच्या नेमणुकीस मा. स्थायी समिती सभा दि. ०८/०३/२००७ ठराव क्र. २०१ अन्वये मंजुरी दिलेली होती. सदरचे ठोक मानधनावरील संगणक चालक व लघुलेखक यांना वेळोवेळी मा. महासभेच्या मान्यतेने एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मा. महासभा दि. २१/०९/२०१३ ठराव क्र. ३२ अन्वये दि. ३०/०८/२०१३ रोजी सदरच्या नेमणुकीची मुदत संपत असल्याने एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन एक वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे. या अनुषंगे सदरच्या नेमणुकीची मुदत दि. ३१/०८/२०१४ रोजी संपत आहे. सद्यस्थितीत मा. महासभा दि. १४/१२/२०१२ (दि. ०१/१२/२०१२ ची तहकुब सभा) ठराव क्र. २२ अन्वये संगणक चालक यांना दरमहा रु. ९,५००/- व लघुलेखक यांना रु. १०,५००/- इतके मानधन अदा करण्यात येत आहे. यापुढे संगणक चालक यांना दरमहा रू. ११,५००/- व लघुलेखक यांना रू. १२,५००/- इतके मानधन माहे सप्टेंबर २०१४ पासून अदा करण्यास हीं सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

त्याचप्रमाणे संगणक चालकांना दिर्घ सुटीचा लाभ देता येत नाही याकरीता महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.अरजा-२४९६/१४/सेवा-९, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. १ मार्च १९९० या शासन निर्णयाप्रमाणे दरमहा २१/२ दिवस याप्रमाणे अर्जित रजा देण्यात यावी. याबाबत प्रशासनाने महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभाग शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी.

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ परिशिष्ट.२ अ.क्र. ३१ अन्वये श्रेणी -३ तांत्रिक सेवा, पदनाम - **"माहिती नोंदणीकार"** या पदाच्या पद निर्मितीच्या मंजुरीसाठी नविन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

महानगरपालिका आस्थापनेवर सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग, अतिक्रमण व अनधिकृत नियंत्रण विभागात ठेका पध्दतीने एकुण ०८ कनिष्ठ अभियंता कार्यरत आहेत. सदर कर्मचाऱ्यांचे मासिक ठोक वेतन रक्कम रु. २०,००० इतके आहे. सदर कार्यरत कंत्राटी पध्दतीवरील कनिष्ठ अभियंता यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | नाव | कार्यरत विभाग | नियुक्ती दिनांक | कंत्राटाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. शेळके विकास रामचंद्र | पाणी पुरवठा विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| २. | श्री. चौधरी रशिकांत दामा | पाणी पुरवठा विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ३. | श्री. महाजन संदीप प्रकाश | सार्व. बांधकाम विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ४. | श्री. पाटील कुंदन काळूराम | अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ५. | श्री. करंजकर लकेश अर्जून | सार्व. बांधकाम विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ६. | श्री. नलावडे अतिश दिनेश | सार्व. बांधकाम विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ७. | श्री. शेख इम्तीयाज फैज अहमद | अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग | दि.१०/०७/२०१३ | ११ महिने |
| ८. | श्री. चौधरी तुषार मोहन | सार्व. बांधकाम विभाग | दि.१६/१२/२०१३ | ११ महिने |

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध तांत्रिक विभागातील कामकाजाचे स्वरुप, कामाचा वाढता व्याप पाहता तसेच विविध योजना कार्यरत असल्याने वरील कंत्राटी पध्दतीवरील कनिष्ठ अभियंता यांना १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन ११ महिन्याची मुदत वाढ देण्यास ही सभा मंजूरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदक :- सौ. निलम ढवण**

**सदर ठरावात सन्मा. सदस्या सौ. निलम ढवण यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली आहे.**

मानधनावरील संगणक चालक व लघुलेखक यांच्या मुदतवाढी व पगारवाढीप्रमाणेच ठेकेदारामार्फत इतरही एल.बी.टी., बांधकाम विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या २३ मुलांना ठोक मानधनाप्रमाणे पालिकेमध्ये सामावून घेणे व पगारवाढ देणे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | निरंक |
| २ | कांगणे यशवंत ठकाजी | २ | अशोक तिवारी | |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | पाटील वंदना विकास | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | पाटील वंदना मंगेश | |
| ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ९ | केळुसकर प्रशांत नारायण | ९ | डॉ. आसिफ गुलाब शेख | |
| १० | भानुशाली वर्षा गिरीधर | १० | डिमेलो बर्नट अल्बर्ट | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | लियाकत ग. शेख | |
| १२ | शाह राकेश रतिशचंद्र | १२ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | |
| १३ | शरद केशव पाटील | १३ | खण्डेलवाल सुरेश | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | नरेश तुकाराम पाटील | |
| १५ | जैन गिता भरत | १५ | शबनम लियाकत शेख | |
| १६ | जैन रमेश धरमचंद | १६ | अनिता जयवंत पाटील | |
| १७ | डॉ. राजेंद्र जैन | १७ | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | |
| १८ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १८ | भावसार शिल्पा कमलेश | |
| १९ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | १९ | वंदना रामदास चक्रे | |
| २० | सुजाता रविकांत शिंदे | २० | भोईर कमलेश यशवंत | |
| २१ | मेहता नरेंद्र लालचंद | २१ | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | |
| २२ | शाह सिमा कमलेश | २२ | रविंद्र भिमदेव माळी | |
| २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २३ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| २४ | डॉ. नयना मनोज वसानी | २४ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| २५ | जैन दिनेश तेजराज | २५ | पाटील सुनिता कैलास | |
| २६ | अरोरा दिपीका पंकज | २६ | प्रभात प्रकाश पाटील | |
| २७ | मीरादेवी रामलाल यादव | २७ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २८ | अनिल बाबुराव भोसले | २८ | रकवी सुहास माधवराव | |
| २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | २९ | झिनत रऊफ कुरेशी | |
| ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३० | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | |
| ३१ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | ३१ | पुजारी कांचना शेखर | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३२ | काझी रशीदा जमील | |
| ३३ | तारा विनायक घरक | ३३ | इनामदार जुबेर | |
| ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ३५ | शुभांगी महिन कोटियन | ३५ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| ३६ | जयमाला किशोर पाटील | ३६ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ३७ | परमार अनिता भरत | ३७ | सामंत प्रमोद जयराम | |
| ३८ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४० | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ४१ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ४२ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ४३ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४४ | भोईर भावना राजू | | | |
| ४५ | भोईर राजू यशवंत | | | |

**ठराव सुचनेसह बहुमताने मंजुर**

**सही /-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४, मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे घोडबंदर, स.क्र.८/१ब,१क या जागेपैकी १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राचे भूसंपादन करणेस प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.

**निलम ढवण :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेल्या भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. सदरच्या विकास योजनेमध्ये एकूण १९ महसूली गावांचा समावेश आहे. सदरच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे घोडबंदर, स.क्र. ६/६, ७/६, ८/१अ, १०/१, २०४/१० या जागेसाठी महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/२५८८/२०१२-१३, दि.०६/१०/२०१२ अन्वये रेखांकन नकाशा मंजूरीसह भूखंड प्रकार बी च्या मर्यादित बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. सदर मंजूर रेखांकनामधील १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता, स.क्र. २०४/११, ८/१ब व ८/१क या जागेमधून जात असून स.क्र. २०४/११ या जागेमधील विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले आहे. तथापी स.क्र. ८/१ब व ८/१क या जागेतील विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले नाही. स.क्र.८/१ब व ८/१क या जागेमधील विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेले नसल्यामुळे स.क्र. ६/६, ७/६, ८/१अ, १०/१ व २०४/१० या जागेसाठी जाणेकरिता रस्ता उपलब्ध होत नसल्यामुळे सदर जागेचे विकासक श्री. धर्मेंद्र जयंतीलाल शहा यांनी महानगरपालिकेने केलेल्या नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे विकास योजना रस्त्याचे बांधकाम करणेस महानगरपालिकेस आदेशित करावे म्हणून मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ७४१९/२०१३ दाखल केलेली आहे. सदर याचिकेमधील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशामधील परिशिष्ठ क्र. ८ व ९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे (१) परस्पर वाटाघाटी, (२) विकास हक्क प्रमाणपत्राद्वारे जागा हस्तांतरित करणेबाबत संबंधित जागा मालकास सुनावणीसाठी वारंवार बोलावण्यात आले असता, संबंधित जागा मालक सुनावणीसाठी / वाटाघाटीसाठी समक्ष हजर राहिलेले नाहीत. तसेच त्यांनी सदरच्या जागेसाठी विकास हक्क प्रमाणपत्र मिळणेसाठीचाही प्रस्ताव महानगरपालिकेकडे सादर केलेला नाही. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे विहीत मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक असल्यामुळे व जागामालकांनी परस्पर वाटाघाटीस व विकास हक्क प्रमाणपत्रान्वये जागा हस्तांतरीत करणेस प्रतिसाद दिलेला नसल्यामुळे मौजे घोडबंदर, स.क्र.८/१ब व ८/१क या जागेपैकी १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत अंदाजित क्षेत्र ६८०.०० चौ.मी. साठी भूसंपादन करणेसाठीचा आगाऊ प्रस्ताव महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/७९३/२०१४-१५, दि.२१/०६/२०१४ अन्वये मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करणेत आलेला आहे. सबब मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे घोडबंदर, स.क्र. ८/१ब व ८/१ क या जागेपैकी १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत जागा ताब्यात घेण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार व मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत भूसंपादन कायदा १९४८ चे कलम ६ नुसार भूसंपादन करण्याकरिता व सदर भूसंपादन करणेकामी येणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्याबाबत शिफारससह प्रस्ताव मा. महासभेसमोर सादर करण्यात आलेला आहे. मौजे घोडबंदर स.क्र.८/१ब, १क ही जागा स्पेशल इंडस्ट्रीयल झोन येत आहे. मौजे घोडबंदर, स.क्र. ६/६, ७/६, ८/१अ, १०/१, २०४/१० या जागेसाठी महानगरपालिकेचे पत्र क्र.मनपा/नर/ २५८८/२०१२-१३, दि.६/१०/२०१२ अन्वये रेखांकन नकाशा मंजूरीसह भूखंड प्रकार बी च्या मर्यादित बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. महानगरपालिकेने बांधकाम परवानगी देण्याअगोदर पोच रस्ता आहे किंवा नाही याबाबत चौकशी करणे गरजेचे होते. परंतु तसे न करता नियमाचे उल्लंघन करून परवानगी देण्यात आलेली आहे. तरी अशी अवैध्यरित्या देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात यावी. तसेच सदर दिलेली परवानगी दि.०६/१०/२०१२ रोजी दिली असून नियमानुसार दि.०५/१०/२०१३ रोजी परवानगी कालबाह्य झालेली असल्याने अशीच रद्द होत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेतील हद्दीतील इतर रस्ते विकसित करताना मोठ्या प्रमाणात रस्त्यात असलेले दुकाने,गाळे,इंडस्ट्रीयल इस्टेट तुटणार आहेत. त्यामुळे सदर लोकांचे पुर्नवर्सन करणे गरजेचे आहे. **(सदर मौजे घोडबंदर स.क्र.८/१ब, १क ही जागा स्पेशल इंडस्ट्रीयल झोन असल्याने सदर जागा मिरा भाईंदर महानगरपालिकेने विकसीत करण्याचा नियमानुसार सर्वप्रथम अधिकार महानगरपालिकेचा आहे. व तद्नंतर नकारल्यास विकासकाने करावयाचा आहे.)** परंतु महानगरपालिकेला पुर्नवर्सनाची अत्यंत निकड असल्याने सदर आरक्षणात आरक्षण विकसीत केल्यास पुर्नवर्सन करणे सोपे जाईल. तसेच रिअकॉमेडिशन करण्यासाठी भविष्यात गाळे, इंडस्ट्रीयल गाळे महानगरपालिकेला लागणार आहेत. सदर आरक्षणातील जागेचे भुसंपादन त्वरीत करण्यात यावे व आरक्षणातील जागेचा भुसंपादनासाठी लागणाऱ्या आर्थिक व प्रशासकिय खर्चास मान्यता देण्यात येत आहे. व सदर जागेत दिलेली परवानगी रद्द करण्यात यावी व सदर आरक्षण महानगरपालिकेने विकसीत करावे असा ठराव मांडण्यात येत आहे.

**अश्विन कासोदरीया :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मंजूर विकास योजनेमधील मौजे घोडबंदर, स.क्र. ६/६, ७/६, ८/१अ, १०/१, २०४/१० या जागेसाठी महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/२५८८/२०१२-१३, दि.०६/१०/२०१२ अन्वये रेखांकन नकाशा मंजूरीसह भूखंड प्रकार बी च्या मर्यादित बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. स.क्र.८/१ब व ८/१क या जागेमधील विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेले नसल्यामुळे स.क्र. ६/६, ७/६, ८/१अ, १०/१ व २०४/१० या जागेसाठी जाणेकरिता रस्ता उपलब्ध होत नसल्यामुळे सदर जागेचे विकासक श्री. धर्मेंद्र जयंतीलाल शहा यांनी महानगरपालिकेने केलेल्या नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे विकास योजना रस्त्याचे बांधकाम करणेस महानगरपालिकेस आदेशित करावे म्हणून मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ७४१९/२०१३ दाखल केलेली आहे. त्यामध्ये काय आदेश आहे त्याची प्रत जोडली नाही. तसेच सी.सी. देताना रस्त्याची बाब का पाहिली नाही. गोषवारा सोबत सी.सी. ची प्रत जोडली नाही. तरी भूसंपादन हा विषय ह्या शहरात प्रलंबित आहे. ह्याची माहिती पूरवावी तसेच या कामासाठी भूसंपादन अधिकारी मानधनावर नेमणे कामाची कारवाई करावी. त्यानंतर हा विषय मा. महासभेमध्ये सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे. मा. महापौर मॅडम माझी एक शंका आहे. असा देता येतो का पोहोच रस्ता नसताना निवेदन करा. पोहोच रस्ता नसताना बांधकाम परवानगी देता येते का?

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, आता आपण जो पोहोच रस्त्याच्या बाबतीत उल्लेख केला आहे त्या प्लॉटला लागून १८ मीटर डी.पी. रोड आहे. त्या भूखंडापर्यंतचा पोहोच रस्ता मनपाच्या ताब्यात आहे. त्या प्लॉटला जाण्यासाठी रस्ता नाही. सगळ्याच डी.पी. रोडला परवानगी देतो. दिलेली परवानगी नियमानुसार आहे चुकीची नाही.

**जुबेर इनामदार :-**

प्लॉटपर्यंत जायला रस्ता नाही. त्याच्यासाठी आपण .............

**सत्यवान धनेगावे :-**

महानगरपालिका क्षेत्रात कुठेही रस्ता डेव्हलप झाल्यानंतर परवानगी दिली असे होत नाही.

**जुबेर इनामदार :-**

देता येतो की नाही देता येत.

**सत्यवान धनेगावे :-**

येतो साहेब.

**जुबेर इनामदार :-**

नसला तरी देता येतो. पुऱ्या शहरामध्ये रस्ते नसले तरी ..............

**सत्यवान धनेगावे :-**

पाहोच रस्ता उपलब्ध करुन देण्याचे महानगरपालिकेचे कामच आहे.

**जुबेर इनामदार :-**

पोहोच रस्ता नसला तरी भूखंडापर्यंत ........

**सत्यवान धनेगावे :-**

डी.सी. रुल प्रमाणे पोहोच रस्ता उपलब्ध करुन देण्याचे मा. आयुक्ताचे काम आहे.

**जुबेर इनामदार :-**

जे मान्य आहे इक्वीझेशन झालेले नाही. इक्वीझेशनचा विषय तुम्ही आमच्यासमोर आता आणला.

**सत्यवान धनेगावे :-**

तोच पोहोच रस्ता उपलब्ध करुन देण्यासाठी आम्ही प्रयत्न करतो त्यासाठी महासभेपूढे आलेलो आहोत.

**जुबेर इनामदार :-**

ह्याच्या अगोदर महासभेत विरोधी पक्षनेत्यांनी प्रश्न मांडला होता. रवि ग्रुप संदर्भात विषय राज्य शासनाकडे प्रलंबित आहे. सी.सी. रस्ता करुन त्यातून टी.डी.आर उपलब्ध करुन देणे. अजून तो विषय आला नाही. त्याच्याआधी रवि ग्रुपला बांधण्यासाठी मोघम परवानगी आणि त्यांना त्याचे संरक्षण मा. धनेगावे साहेबांनी त्यांची बाजू ह्या सभागृहामध्ये मांडली होती तेही ...............

**सत्यवान धनेगावे :-**

संरक्षण दिलेले नाही.

**जुबेर इनामदार :-**

जुम्ही बाजू मांडली होती की त्याला हटवल म्हणून ते बांधले.

**सत्यवान धनेगावे :-**

हो. ह्याच सभागृहाने तो नियम बदलण्याचा ठराव केला होता तो मंजूरीसाठी शासनाकडे आहे. त्याला टी.डी.आर दिलेला नाही. अनधिकृत बांधकामाला आपण संरक्षण दिलेले नाही.

**जुबेर इनामदार :-**

मंजूरी आली नव्हती.

**सत्यवान धनेगावे :-**

आजही आली नाही. ८ ते १० प्रस्ताव शासनाकडे आहेत. १० पैकी एकही प्रस्तावाला मंजूरी नाही.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही ही भाषा वापरली. त्या अनुषंगाने त्यांनी ते बांधकाम केलेले आहे. हटवले म्हणून केले आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

त्याच्यावर महानगरपालिकेने कारवाई केलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

तो परत स्टे घ्यायला गेला ..........

**सत्यवान धनेगावे :-**

सर्वच घेतात रवि ग्रुप नाही सगळेच घेतात.

**जुबेर इनामदार :-**

काय गरज नाही त्या विषयावर चर्चा करायची. तुमचे म्हणणे स्पष्ट आहे की पोहोच रस्ता नसला तरी बांधकाम परवानगी देता येईल.

**सत्यवान धनेगावे :-**

देता येते. पोहोच रस्ता उपलब्ध करुन देण्याचे महानगरपालिकेचे काम आहे ते काम आम्ही करत आहोत. आपली मंजूरी अपेक्षित आहे.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्या आधी परवानगी दिली ना.

**सत्यवान धनेगावे :-**

कंडीशन आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रस्ताव पोहोचायच्य आधी त्याला परवानगी दिली आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

दिलेली आहे. जागेवर बांधकाम सुरु झाले नाही.

**जुबेर इनामदार :-**

हा एकच नाही दुसऱ्या बाकीच्या लोकांना देता येईल.

**सत्यवान धनेगावे :-**

असे कोणीच सोडत नाही तुम्हाला माहित आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर करत आहे.

**प्रकरण क्र. १४ :-**

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे घोडबंदर, स.क्र.८/१ब,१क या जागेपैकी १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राचे भूसंपादन करणेस प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १६ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेल्या भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. सदरच्या विकास योजनेमध्ये एकूण १९ महसूली गावांचा समावेश आहे.

सदरच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे घोडबंदर, स.क्र. ६/६, ७/६, ८/१अ, १०/१, २०४/१० या जागेसाठी महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/२५८८/२०१२-१३, दि.०६/१०/२०१२ अन्वये रेखांकन नकाशा मंजूरीसह भूखंड प्रकार बी च्या मर्यादित बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर मंजूर रेखांकनामधील १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता, स.क्र. २०४/११, ८/१ब व ८/१क या जागेमधून जात असून स.क्र. २०४/११ या जागेमधील विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले आहे. तथापी स.क्र. ८/१ब व ८/१क या जागेतील विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले नाही.

स.क्र.८/१ब व ८/१क या जागेमधील विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेले नसल्यामुळे स.क्र. ६/६, ७/६, ८/१अ, १०/1 व २०४/१० या जागेसाठी जाणेकरिता रस्ता उपलब्ध होत नसल्यामुळे सदर जागेचे विकासक श्री. धर्मेंद्र जयंतीलाल शहा यांनी महानगरपालिकेने केलेल्या नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे विकास योजना रस्त्याचे बांधकाम करणेस महानगरपालिकेस आदेशित करावे म्हणून मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ७४१९/२०१३ दाखल केलेली आहे.

सदर याचिकेमधील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशामधील परिशिष्ठ क्र. ८ व ९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे (१) परस्पर वाटाघाटी, (२) विकास हक्क प्रमाणपत्राद्वारे जागा हस्तांतरित करणेबाबत संबंधित जागा मालकास सुनावणीसाठी वारंवार बोलावण्यात आले असता, संबंधित जागा मालक सुनावणीसाठी / वाटाघाटीसाठी समक्ष हजर राहिलेले नाहीत. तसेच त्यांनी सदरच्या जागेसाठी विकास हक्क प्रमाणपत्र मिळणेसाठीचाही प्रस्ताव महानगरपालिकेकडे सादर केलेला नाही.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे विहीत मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक असल्यामुळे व जागामालकांनी परस्पर वाटाघाटीस व विकास हक्क प्रमाणपत्रान्वये जागा हस्तांतरीत करणेस प्रतिसाद दिलेला नसल्यामुळे मौजे घोडबंदर, स.क्र.८/१ब व ८/१क या जागेपैकी १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत अंदाजित क्षेत्र ६८०.०० चौ.मी. साठी भूसंपादन करणेसाठीचा आगाऊ प्रस्ताव महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/७९३/२०१४-१५, दि.२१/०६/२०१४ अन्वये मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करणेत आलेला आहे.

सबब मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे घोडबंदर, स.क्र. ८/१ब व ८/१ क या जागेपैकी १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत जागा ताब्यात घेण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार व मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत भूसंपादन कायदा १९४८ चे कलम ६ नुसार भूसंपादन करण्याकरिता व सदर भूसंपादन करणेकामी येणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्याबाबत शिफारससह प्रस्ताव मा. महासभेसमोर सादर करण्यात आलेला आहे.

मौजे घोडबंदर स.क्र.८/१ब, १क ही जागा स्पेशल इंडस्ट्रीयल झोन येत आहे. मौजे घोडबंदर, स.क्र. ६/६, ७/६, ८/१अ, १०/१, २०४/१० या जागेसाठी महानगरपालिकेचे पत्र क्र.मनपा/नर/२५८८/२०१२-१३, दि.६/१०/२०१२ अन्वये रेखांकन नकाशा मंजूरीसह भूखंड प्रकार बी च्या मर्यादित बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. महानगरपालिकेने बांधकाम परवानगी देण्याअगोदर पोच रस्ता आहे किंवा नाही याबाबत चौकशी करणे गरजेचे होते. परंतु तसे न करता नियमाचे उल्लंघन करून परवानगी देण्यात आलेली आहे. तरी अशी अवैध्यरित्या देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात यावी. तसेच सदर दिलेली परवानगी दि.०६/१०/२०१२ रोजी दिली असून नियमानुसार दि.०५/१०/२०१३ रोजी परवानगी कालबाह्य झालेली असल्याने अशीच रद्द होत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील हद्दीतील इतर रस्ते विकसित करताना मोठ्या प्रमाणात रस्त्यात असलेले दुकाने,गाळे,इंडस्ट्रीयल इस्टेट तुटणार आहेत. त्यामुळे सदर लोकांचे पुर्नवर्सन करणे गरजेचे आहे. **(सदर मौजे घोडबंदर स.क्र.८/१ब, १क ही जागा स्पेशल इंडस्ट्रीयल झोन असल्याने सदर जागा मिरा भाईंदर महानगरपालिकेने विकसीत करण्याचा नियमानुसार सर्वप्रथम अधिकार महानगरपालिकेचा आहे. व तद्नंतर नकारल्यास विकासकाने करावयाचा आहे.)** परंतु महानगरपालिकेला पुर्नवर्सनाची अत्यंत निकड असल्याने सदर आरक्षणात आरक्षण विकसीत केल्यास पुर्नवर्सन करणे सोपे जाईल. तसेच रिअकॉमेडिशन करण्यासाठी भविष्यात गाळे, इंडस्ट्रीयल गाळे महानगरपालिकेला लागणार आहेत.
सदर आरक्षणातील जागेचे भुसंपादन त्वरीत करण्यांत यावे व आरक्षणातील जागेचा भुसंपादनासाठी लागणाऱ्या आर्थिक व प्रशासकिय खर्चास मान्यता देण्यात येत आहे. व सदर जागेत दिलेली परवानगी रद्द करण्यात यावी व सदर आरक्षण महानगरपालिकेने विकसीत करावे असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- सौ. निलम ढवण अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरिया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १५, मौजे गोडदेव स.क्र.९७(५२)/२,३ या जागेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. आ.क्र. १२२ (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) या आरक्षणाचे विकास योजनेप्रमाणे एकूण क्षेत्र ४६७०० चौ.मी. असून यापैकी महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र ३०५३३.६० चौ.मी. आहे. सदरच्या मंजूर विकास योजनेप्रमाणे मौजे गोडदेव, स.क्र. ५२ (जुना), ९७ (नविन), हि.क्र. २ व ३ मे. ओम साई इंडस्ट्रीयल इस्टेट असलेली जागा आ.क्र. १२२ (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) या आरक्षणाने बाधीत होत आहे. सदरच्या आरक्षणामधून २ एक्कर (८००० चौ.मी.) जागा आगरी समाज उन्नती संस्था यांना भाडेतत्वावर देणेसाठी विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करणेस मा. महासभेने मंजूरी

दिलेली असून यासाठी अंतिम मंजूरी मिळणेसाठीचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेत आला होता. सदरचा प्रस्ताव शासनाने दि.३०/०१/२०१४ चे निर्णयानुसार नामंजूर केलेला आहे. सदरच्या विषयांकित जागेमध्ये श्री. भिमराव चव्हाण यांनी औदयोगिक गाळयाचे अनधिकृत बांधकाम केल्यामुळे त्यांना दि.१२/११/२००१ व दि.१९/०१/०२ रोजी नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. सदरच्या नोटीसी विरुद्ध मा.न्यायालयात दावा क्र.१५६५/२००१ दाखल करुन स्थगिती आदेश प्राप्त केले होते. त्यानंतर मा.न्यायालयाने सदरचा दावा दि.२४/०९/२००७ रोजी फेटाळलेला आहे. त्यानंतरही विकासकाने सदरच्या गाळयाचे बांधकाम तोडुन न टाकता त्याचा वापर सुरु ठेवलेला असल्यामुळे संबंधित गाळेधारकास व विकासकास दि.११/०३/२०१३ रोजी गाळयामधील सामान काढुन गाळे रिकामे करणेबाबत नोटीस देण्यात येवुन तोंडी सुचनाही देण्यात आलेल्या होत्या. त्यानंतर पोलिस बंदोबस्त घेवुन दि.१२/०३/२०१३ रोजी सदरच्या अनधिकृत गाळयावर महानगरपालिकेमार्फत तोडक कारवाई सुरु करित असतांना त्याठिकाणच्या जमावाने महानगरपालिकेच्या अनधिकृत बांधकाम नियत्रंण विभागाच्या पथकावर दगडफेक करण्यात आली आहे. मे. ओम साई इंडस्ट्रीयल इस्टेट गाळेधारक यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. २६५९/२०१३ दाखल केली होती. सदर याचिका गाळेधारकांनी दि.०८/०५/२०१३ रोजी स्वतःहून मागे घेतली आहे. सदर गाळ्याचे बांधकाम तोडण्यासाठी मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश नाहीत. ओम साई इंडस्ट्रीयलमधील गाळेधारकाने शासनाने डिसेंबर २०१३ मध्ये विनंती अर्ज सादर केला होता. या अनुषंगाने दि.०२/०१/२०१४ रोजी मा. राज्यमंत्री, नगरविकास विभाग यांचेकडे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या अनुषंगाने इतिवृत्त प्राप्त असून शासनाने खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत. "सदरचा अर्ज मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे पाठविण्यात यावा. तदनंतर मिरा-भाईंदर महानगरपालिकेने अर्जदाराच्या विनंतीच्या योग्ययोग्यतेची तपासणी करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ चा प्रस्ताव सादर केल्यास शासन त्याविषयी गुणवत्तेनुसार उचित निर्णय घेईल". मंजूर विकास योजनेत खेळाचे मैदानासाठी आरक्षण असल्यास, अशा आरक्षणाच्या जागेतील फेरबदलाचे प्रारुप सादर करु नयेत, असे शासनाचे निर्देश आहेत. सदरचे गाळेधारक बऱ्याच प्रमाणात शहराचे रहिवासी आहेत. त्यांचा व्यवसाय शहराच्या नागरिकांकरिता रोजगाराचे स्त्रोत आहे. तरी वस्तुस्थिती पाहता व शासनाकडिल प्राप्त इतिवृत्तांताच्या अनुषंगाने प्रशासनाने सदरचे प्रकरण सहानुभुतिपूर्वक निर्णयासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये तांत्रिक बाबी तपासून आवश्यक असलेल्या फेरबदलाच्या वैधानिक कार्यवाहीस प्रस्ताव शासनास सादर करणेस मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका ह्यांना योग्य निर्णयाकरिता प्राधिकृत करत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. आ.क्र. १२२ (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) या आरक्षणाचे विकास योजनेप्रमाणे एकूण क्षेत्र ४६७०० चौ.मी. असून यापैकी महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र ३०५३३.६० चौ.मी. आहे. सदरच्या मंजूर विकास योजनेप्रमाणे मौजे गोडदेव, स.क्र. ५२ (जुना), ९७ (नविन), हि.क्र. २ व ३ मे. ओम साई इंडस्ट्रीयल इस्टेट असलेली जागा आ.क्र. १२२ (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) या आरक्षणाने बाधीत होत आहे. प्रशासनाने या विषयाबाबत आपली स्पष्ट भूमिका मांडलेली नाही. तसेच या शहरातील विकास आराखड्यातील आरक्षणांमध्ये कोणकोणती अतिक्रमणे झालेली आहेत याची यादी प्रशासनाने द्यावी. व त्यावर निर्णय घेणे योग्य होईल. त्याची संपूर्ण माहीती संबंधीत विभागाने सादर करावी. व यानंतर संपूर्ण माहितीस्तह सदर विषय निर्णयाकरिता फेरसादर करण्यात यावा असा ठराव मांडण्यात येत आहे.

**निलम ढवण :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**सुजाता शिंदे :-**

आझाद नगर हा सर्व्हे क्र. ९७ पुरताच मर्यादित नसून यात अनेक सर्व्हे नं. येतात. महानगरपालिकेने दि. १६/११/२००५ रोजी स्वर्हेअर श्री. राणे यांना सर्व्हेक्षण केले असता आरक्षण क्र. १२२ मध्ये ४६,७०० चौ. मीटर पैकी २३२१० चौ. मीटर क्षेत्रावर झोपड्या, घरे, गॅरेज, औद्योगिक गाळे यांनी व्याप्त झाले आहे. महानगरपालिकेने दि. १९/०६/२००७ रोजी जा.क्र.मनपा/नर/१०१३ या पत्रात स्पष्ट केले आहे. सदरचे अतिक्रमण सन १९९५ पूर्वीचे असलेले प्रथम दर्शनिय मान्य केले आहे. तसेच कोकण विभाग नगररचना आणि मुल्य निर्धारण विभागाने आरक्षण क्रमांक १२२ बगीचा व सामाजिक वनीकरण क्षेत्रफळ कमी करणेबाबत कलम ३७ ची कार्यवाही करण्यासाठी शासनाने मार्गदर्शन अपेक्षिलेले आहे. याबाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेने कोणतेही ठोस पाऊल उचलले नाही किंवा सदर झोपडपट्टी पुर्नवसन योजनेअंतर्गत पात्रता ठरवून फोटोपास योजना घेतली नाही. माझे मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब यांना तसेच पूर्ण सभागृहाला पक्षपात न करता

आरक्षण क्र. १२२ ह्याच्या व्याप्ती कमी करावी किंवा झोपडपट्टी पुर्नवसन योजनेचा शासन निर्णय झो.पू.यो. १०९७ प्रकरण क्र. ४५१५/झो.पु.सु. अंमलात आणावित.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम यह विषय पिछली बार भी चर्चा हुआ था। उस समय भी मैने कहा था शासन के द्वारा आपके पास ३७ के लिए प्रस्ताव धनेगावे साहब फाईल आया हुआ है। १२२ के लिए मॅडमने जो लिखा है वह सेक्टर के लिए। वहाँ पे झोपडपट्टी बसी हुई है, जो गॅरेज वगैरा है उस क्षेत्र के लिए।

**सत्यवान धनेगावे :-**

ऐसे कोई प्रस्ताव आया नहीं।

**भगवती शर्मा :-**

मेरे पास कॉपी भी है।

**सत्यवान धनेगावे :-**

ओम साई इंडस्ट्रीज इस्टेट के बारे में जो आया वो लिखा है।

**भगवती शर्मा :-**

उसके अलावा बाकी के आझाद नगर के।

**सत्यवान धनेगावे :-**

वो बारे में रेफरन्स गर्व्हमेंट को दिया है। गर्व्हमेंटसे क्लेरिफिकेशन आया नहीं।

**भगवती शर्मा :-**

गर्व्हमेंटसे आदेश हुआ है।

**सत्यवान धनेगावे :-**

नही हुआ है।

**भगवती शर्मा :-**

इस विषय के अंदर में हुआ था।

**सत्यवान धनेगावे :-**

आदेश अपने पास आता तो मॅडम के पास होता था।

**भगवती शर्मा :-**

जरुरी नही मॅडम के पास है।

**सत्यवान धनेगावे :-**

ऐसा कैसा जो फॉलोअप रहता है हमारे पास रहता है।

**निलम ढवण :-**

साहेब गेल्या महासभेत हा विषय होता १२२ चे आरक्षण खाली करुन सर्व्हे करुन देण्यात येईल. जो आपल्या ताब्यात आहे तो पूर्ण खाली केला जाईल. त्याच्यावर महिन्याभरात काय कारवाई केली.

**सत्यवान धनेगावे :-**

महानगरपालिकेने मार्चमध्ये कारवाई केली.

**निलम ढवण :-**

मार्चचे नाही मागच्या महिन्याचे सांगते. मागच्या महासभेला १२२ वर विषय झालेला आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

अतिक्रमण विभागाकडून कारवाई केलेली आहे.

**निलम ढवण :-**

मागच्या वेळी जो विषय झाला त्यानंतर १२२ वर काय कार्यवाही झाली.

**सत्यवान धनेगावे :-**

मागच्या महासभेच्या नंतरच अतिक्रमण विभागाने कार्यवाही केलेली..................

**निलम ढवण :-**

मागची महासभा कधी झाली.

**सत्यवान धनेगावे :-**

त्याचे डिटेल्स अतिक्रमण विभाग देईल माझ्याकडे डिटेल्स नाही.

**निलम ढवण :-**

तुम्हाला माहित आहे तुम्ही उत्तर दिले. महिन्याभरात त्याच्यावर आम्ही कारवाई करतो.

**सत्यवान धनेगावे :-**

अतिक्रमण विभागामार्फत कारवाई झालेली आहे असे मी म्हटले.

**निलम ढवण :-**

१२२ आरक्षणावर प्रशासनाची काय कारवाई झाली ते सांगा.

**सत्यवान धनेगावे :-**

प्रशासनाची कारवाईचे उत्तर अतिक्रमण विभागाकडून मिळेल.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

तसेच बांधकाम पूर्ण झालेले आहे.

**निलम ढवण :-**

एकमेकांच्या डिपार्टमेंटवर टाकले जाते. तुमच्याकडे विषय आला तुम्ही अतिक्रमणवर टाकणार. अतिक्रमणवाले तुमच्याकडे टाकणार.

**सत्यवान धनेगावे :-**

माझ्याकडे ३७ च्या बाबतीत विषय दिला आहे. ओम साई इंडस्ट्रीजच्या बाबतीत.

**निलम ढवण :-**

हे विषय प्रत्येक महासभेत असेच जाणार का?

**सत्यवान धनेगावे :-**

हे गव्हरमेन्टकडे गेलें होते मा. राज्यमंत्री महोदयाकडे बैठक झाली होती त्या बैठकीचे इतिवृन्तांत आले आहें. त्याचा महासभेत निर्णय घ्या असे म्हटले आहे त्याप्रमाणे मी विषय दिलेला आहे.

**निलम ढवण:-**

प्रत्येक महासभेत हे विषय चर्चीले जाणार का? एका महिन्याची मूदत देतात त्या एका महिन्यात त्याच्यावर काय इम्पलीमेन्टेशन झाले ते सांगा म्हणले आम्हाला समाधान मानता येईल व परत असे विषय घेणार नाहीत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आगरी समाज उन्नतीसाठी १२२ मध्ये २ एकर दिले नाही त्याचे ३७ ब मध्ये डायवर्ट करण्यासाठी दिले होते त्याची सविस्तर माहिती दिली तर बरे होईल.

**सत्यवान धनेगावे :-**

त्याच्या बाबतीत प्रस्ताव आपण शासनाकडे सादर केला होता शासनाने तो नामंजूर केला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

कारण काय ?

**सत्यवान धनेगावे :-**

शासन कारण देत नाही टिप्पणीमध्ये लिहिले आहे टिप्पणी दिली आहे.

**जुबेर ईनामदार :-**

मा. आयुक्त महोदय, १२२ आरक्षण एका बाजूला पालिका आरक्षण रिकामी करण्यासाठी पाठपुरावा करत असते. आरक्षण रिकामी करून घेतले पाहिजे. २९.११.२०१२ ला एका केसवर स्टे होता तो व्हेकेट झाला दावा दाखल केला होता त्याचे विधी विभागाकडून २३.११.२०१३ प्रभागाला पत्र जे पाठवण्यात आले. आज २०१४ चालू आहे. अतिक्रमण हटवण्यात आले नाही. म्हणजे आम्ही वाट बघत बसतो १०वर्ष उलटल्यानंतर ज्याची जागा आहे तोपर्यत..................

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, १५ नंबरचा गोषवारा काही लोकांना दिला व काही लोकांना दिलेला नाही.

**निलम ढवण :-**

उरली त्या जागेवर कोणाला तरी ताबा येउू दे मग सांगणार त्याचे पुर्नःवसन त्याच्यासाठी जागा दयायची त्याची वाट बघत असतील.

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला मिळालाच नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब तुम्हाला मागे सांगितले होते की सगळयांना टॅब दिले आहेत. सर्व गोषवारा मेलवर दया. तुम्ही का देत नाही?

**नगरसचिव :-**

मेल आयडी देत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तुमची चूकी आहे. तुम्ही सगळयांना टॅब दिले होते मनपाने एवढा खर्च केला.

**नगरसचिव :-**

ज्यानी ई मेल आयडी दिले नाही त्याचे काय करायचे सगळयांनी ई मेल आयडी दिले नाहीत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब ज्याचे ई मेल आयडी नाहीत तुम्ही ते क्रिएट करा. तुमचे सॉप्टवेयर डिपार्टमेन्ट काय करते.

**नगरसचिव :-**

४० लोकाचे आलेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

मेलवर पाठवले तरी दयावे लागेल. टॅबवर मूल खेळतात आणि फोटो काढायला उपयोगी पडतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब हयापूढची मिटींग ई मेल आयडी वर दयायला लागेल.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय एक वर्ष कारवाई करत नसेल रामबहादूर रंगबहादूर मौजे गोडदेव ३५४ जूना जागेवरील अनधिकृत बांधकामाबाबत रामबहादूर विरूध्द मिरा भाईदर मनपा ॲड. सुजाता कांबळे ह्याचे २९/११/१२ रोजीचे पत्र आहे. विधी विभागाने प्रभाग अधिकाऱ्याला २३/११/१३ रोजी एका वर्षानंतर कळवले. आज २०१४ चालू आहे. अतिक्रमण तिथेच उभे आहे.

**सुजाता शिंदे :-**

धनेगावेसाहेब कधी खाली करणार ते सांगा.

**मा. महापौर :-**

दोन्ही ठराव क्लब करून मंजूर करत आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम १२२ बद्दल तीन वर्षापूर्वी आगरी समाज उन्नती संस्थेने जागा मागितली ह्याच सभागृहाने एक मताचा ठराव देऊन शासनाकडे पाठवले की, खेळाचे मैदान आणि सामाजिक असलेला १० एकर जागेपैकी दोन एकर जागा त्या समाजाला सामाजिक काम करण्यासाठी अटीशर्ती घालून तो ठराव मंजुर करून पाठवला. मनपाकडून प्रस्ताव गेल्यानंतर शासन दरबारी ४-६ मिटींग झाल्या त्यांना अधिकृत जागा देण्यासाठी मनपाच्या वतीने धनेगावे साहेब त्यामध्ये दरवेळी हजर असतील. हा ठराव लोकांना सभागृहाला असे वाटत होते की आगरी समाजाला सामाजिक काम करण्याच्या दृष्टिने वेगवेगळ्या समाजाची अनेक समाज मंदिर आहेत. आगरी समाजाचे पण असावे आणि आगरी समाज दोन पैसे खर्च करू शकतो. स्वतःच्या ताकदीवर स्वतः निधी उभा करून त्यांच्या परिने सुसज्ज अशी इमारत बांधू शकतो आणि त्याठिकाणी समाज प्रबोधन मग मे कोणत्याही समाजाचे असले तरी त्यांना संधी देऊन ते काम करू शकतो. अशी सभागगृहाला खात्री पटल्यानंतर तो एक मताचा ठराव दिला होता. तीन वर्ष मंत्रालयात कामकाज चालल्यानंतर शेवटी एक पत्र आत मॉडिफिकेशन नॉट ॲक्सेपटेड ठरावाचे काय झाले ते माहित पडले नाही, ठराव बाधीत आहे की अबाधित आहे. तीन वर्ष ती जागा आगरी समाजाच्या ताब्यात आहे. त्याच्या अवतीभोवती असलेली अतिक्रमण काढा. मनपामध्ये ह्या सभागृहात शितोळे साहेब तुम्ही होते, महापौर तुम्ही होते आणि धनेगावे साहेब तिकडे होते. मनपाचा एकच कार्यक्रम की त्या मोकळ्या जागेमध्ये असलेले कचऱ्याचे जे डम्पींग आहे ते काढून मुलांना खेळण्यासाठी सुरू होईल, समाज कार्यक्रम करू शकेल. इनामदारांनी आणि ढवण मॅडमनी सांगितले ती पोझीशन जशीच्या तशी आहे. आपण किती दिवस निवेदन करणार की पुढे कारवाई करण्यांत येणार असे. मा.महापौर मॅडम आदेश देऊ शकता का त्या ठिकाणी साफसफाई तरी करा. कशातून काही तरी उत्पन्न होते. मी ह्या सभागृहाला धन्यवाद देऊ इच्छितो. इच्छा असेल तर होऊ शकते. उद. सांगतो माझ्या कॉलेजमध्ये १० विद्यार्थ्यांनी सांगितले समर्थ मैदान विकसीत करायचे. आपण तिकडे सामने घेऊ या. साहेब तुम्ही आले, मा.आयुक्त साहेब आले. आज मोठे मैदान विकसीत झाले. कोणाला द्यायचे हा विषय नंतरचा आहे. कायद्यानुसार होईल ते पण मिरा भाईदरच्या एकदमहृदयासारख्या ठिकाणी असलेला मैदान मनपामध्ये सक्षम अधिकारी असताना मा.महापौर पण सक्षम असताना साफसफाई सुध्दा होऊ शकत नाही. संपूर्ण १० एकर जागेची बॉन्ड्री साफ सफाई करायची की नाही करायची हा विषय वेगळा कोणत्या समाजाला जागा द्यायची त्याचा शासन निर्णय होईल तो विषय वेगळा पण जे तुमच्या ताब्यात आहे ते स्वच्छ ठेवा तिथे मुलांना खेळायला मिळेल. तिकडे कोणतरी सामाजिक कार्यक्रम करतील. तिकडे भागवत सप्ताह होतील. जर नवघरचे मैदान आठ दिवसात होऊ शकते तर हे का नाही होऊ शकते. कशामध्ये तरतूद नाही, कशामध्ये अधिकार नाहीत. मा. आयुक्तांना अधिकार नाहीत, मा. महापौरांना अधिकार नाहीत. मा.महापौर मॅडम ह्याचे शांतपणे उत्तर द्या. हे रेकॉर्डवरती राहील.

**मा. महापौर :-**

मी गेल्यावेळीच धनेगावे साहेबांना सांगितलेले की ती जागा साफ करा. प्ले ग्राऊन्ड बनवा.

**रोहिदास पाटील :-**

शितोळे साहेब तुम्ही सक्षम अधिकारी आहात ते काम का करत नाही?

**मा. महापौर :-**

नोव्हेंबरमध्ये पाहणी पण केलेली.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

आझाद नगरमध्ये ३१ मे रोजी आपण कारवाई केली होती. त्यामध्ये ८४ झोपड्या काढल्या आहेत.

**रोहिदास पाटील :-**

कारवाई बद्दल मी बोलत नाही. कारवाई करायला कोणाचे छप्पर उचलायचे तो विषय वेगळा आहे. जे आहे ते का स्वच्छ होत नाही. जे आपल्या ताब्यात आहे.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

जे ताब्यात आले त्याच्यावरच कारवाई केली.

**रोहिदास पाटील :-**

२-४ एकरचे ताब्यात आहे. त्याच्यात कचऱ्याचे ढिगारे पडले आहेत ते का निघत नाही.

**निलम ढवण :-**

कारवाई पूर्ण झाली आहे का?

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

मोहिते साहेब कारवाई पूर्ण झाली का? भुईसपाट झाली का?

**श्रीकृष्ण मोहिते :-**

ताब्यात आलेल्या जागेवर कारवाई पुर्ण केली होती.

**निलम ढवण :-**

तोडक कारवाई नको. वरच्यावर कारवाई करता. आणि तुम्ही पाठ फिरवल्यानंतर ते दोन विटा लावणार. चार विटा लावणार आणि ते जसेच्या तसे राहते.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

तिथे पक्के बांधकाम झालेले नाही. प्लास्टिकची शेड टाकलेली आहे.

**निलम ढवण :-**

अतिक्रमणने तोडणे म्हणजे ते भुईसपाट झाली होती का?

**श्रीकृष्ण मोहिते :-**

पोकलन मशिन आणि जेसीबीने कारवाई केली आहे आणि त्या ठिकाणी पक्के बांधकाम झालेले नाही.

**निलम ढवण :-**

त्या वॉर्डातले नगरसेवक सांगतात.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

ज्या ठिकाणी कारवाई केली तिथे प्लास्टिकचे शेड टाकलेले आहेत. त्याठिकाणी तारेचे कंपाऊंड करण्यांत येईल.

**निलम ढवण :-**

माझी प्रशासनाला विनंती आहे की जे जे आरक्षित भुखंड आहेत ते ताबडतोब ताब्यात घेऊन त्यामध्ये अनधिकृत बांधकाम होणारच नाही याची काळजी का घेतली जात नाही. प्रत्येक वेळेला हेच होत ताब्यात घेतले आहे. रिपोर्ट पुढच्या महिन्यात देतों. त्याच्यावर अजुनही काही होत नाही. अतिक्रमण होण्याची वाट बघतात का? मा.महापौरांनी सांगून देखील अधिकारी सिरियस घेत नाहीत. मॅडम तुम्ही विचार करा.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. महापौर मॅडमनी सांगितल्यावर कारवाई झालेली आहे.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

साहेब कारवाई झाली नाही. ज्या दिवशी कारवाई होत होती. जिथे कारवाई केली त्याचे म्हणणे आहे जागा ताब्यात आलेली आहे. कारवाई करताना ही बाजू त्याच्या मागे आहे त्याला लागूनच होती.

**निलम ढवण :-**

साहेब स्थानिक नगरसेवक सांगतात कारवाई झाली नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

ठीक आहे, मी पाहतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब दोन विषय आहेत. एक जे सपाटीकरण आहे. आपल्या ताब्यात आहे. त्याच्यावर लाल माती टाकली. मुलं खेळतात असे झाले पाहिजे. आणि आपल्या ज्या-ज्या जागा क्लियर झाल्या आहेत आपल्या नावांवर झाल्या आहेत. जिथे केसं नाही ते निघायला पाहिजे. १२२ करीता किती वर्ष बोलायचे.

**मा. महापौर :-**

काका ह्याच्यावर सोमवारी कारवाई करण्यांत येईल.

**निलम ढवण :-**

महासभेत जे विषय होतील ते रिपीट होऊ नये ह्याची काळजी घेण्यांत यावी.

**प्रकरण क्र. १५ :-**

मौजे गोडदेव स.क्र.९७(५२)/२,३ या जागेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेबाबत.

**ठराव क्र. १७ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

आ.क्र. १२२ (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) या आरक्षणाचे विकास योजनेप्रमाणे एकूण क्षेत्र ४६७०० चौ.मीं. असून यापैकी महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र ३०५३३.६० चौ.मी. आहे.

सदरच्या मंजूर विकास योजनेप्रमाणे मौजे गोडदेव, स.क्र. ५२ (जुना), ९७ (नविन), हि.क्र. २ व ३ मे. ओम साई इंडस्ट्रीयल इस्टेट असलेली जागा आ.क्र. १२२ (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) या आरक्षणाने बाधीत होत आहे.

सदरच्या आरक्षणामधून २ एक्कर (८००० चौ.मी.) जागा आगरी समाज उन्नती संस्था यांना भाडेतत्वावर देणेसाठी विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करणेस मा. महासभेने मंजूरी दिलेली असून यासाठी अंतिम मंजूरी मिळणेसाठीचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेत आला होता. सदरचा प्रस्ताव शासनाने दि.३०/०१/२०१४ चे निर्णयानुसार नामंजूर केलेला आहे.

सदरच्या विषयांकित जागेमध्ये श्री. भिमराव चव्हाण यांनी औदयोगिक गाळयाचे अनधिकृत बांधकाम केल्यामुळे त्यांना दि.१२/११/२००१ व दि.१९/०१/०२ रोजी नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. सदरच्या नोटीसी विरुद्ध मा.न्यायालयात दावा क्र.१५६५/२००१ दाखल करुन स्थगिती आदेश प्राप्त केले होते. त्यानंतर मा.न्यायालयाने सदरचा दावा दि.२४/०९/२००७ रोजी फेटाळलेला आहे.

त्यानंतरही विकासकाने सदरच्या गाळयाचे बांधकाम तोडुन न टाकता त्याचा वापर सुरु ठेवलेला असल्यामुळे संबंधित गाळेधारकास व विकासकास दि.११/०३/२०१३ रोजी गाळयामधील सामान काढुन गाळे रिकामे करणेबाबत नोटीस देण्यात येवुन तोंडी सुचनाही देण्यात आलेल्या होत्या.

त्यानंतर पोलिस बंदोबस्त घेवुन दि.१२/०३/२०१३ रोजी सदरच्या अनधिकृत गाळयावर महानगरपालिकेमार्फत तोडक कारवाई सुरु करित असतांना त्याठिकाणच्या जमावाने महानगरपालिकेच्या अनधिकृत बांधकाम नियत्रंण विभागाच्या पथकावर दगडफेक करण्यात आली आहे.

मे. ओम साई इंडस्ट्रीयल इस्टेट गाळेधारक यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. २६५९/२०१३ दाखल केली होती. सदर याचिका गाळेधारकांनी दि.०८/०५/२०१३ रोजी स्वतःहून मागे घेतली आहे. सदर गाळ्याचे बांधकाम तोडण्यासाठी मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश नाहीत.

ओम साई इंडस्ट्रीयलमधील गाळेधारकाने शासनाने डिसेंबर २०१३ मध्ये विनंती अर्ज सादर केला होता. या अनुषंगाने दि.०२/०१/२०१४ रोजी मा. राज्यमंत्री, नगरविकास विभाग यांचेकडे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या अनुषंगाने इतिवृत्त प्राप्त असून शासनाने खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

"सदरचा अर्ज मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे पाठविण्यात यावा. तद्नंतर मिरा-भाईंदर महानगरपालिकेने अर्जदाराच्या विनंतीच्या योग्ययोग्यतेची तपासणी करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ चा प्रस्ताव सादर केल्यास शासन त्याविषयी गुणवत्तेनुसार उचित निर्णय घेईल".

मंजूर विकास योजनेत खेळाचे मैदानासाठी आरक्षण असल्यास, अशा आरक्षणाच्या जागेतील फेरबदलाचे प्रारुप सादर करु नयेत, असे शासनाचे निर्देश आहेत.

सदरचे गाळेधारक बऱ्याच प्रमाणात शहराचे रहिवासी आहेत. त्यांचा व्यवसाय शहराच्या नागरिकांकरिता रोजगाराचे स्त्रोत आहे. तरी वस्तुस्थिती पाहता व शासनाकडिल प्राप्त इतिवृत्तांताच्या अनुषंगाने प्रशासनाने सदरचे प्रकरण सहानुभुतिपूर्वक निर्णयासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये तांत्रिक बाबी तपासून आवश्यक असलेल्या फेरबदलाच्या वैधानिक कार्यवाहीस प्रस्ताव शासनास सादर करणेस मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका ह्यांना योग्य निर्णयाकरिता प्राधिकृत करत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**सदर ठरावात सन्मा. सदस्या श्रीम. सुजाता रविकांत शिंदे यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली आहे.**

आझाद नगर हा सर्व्हे क्र. ९७ पुरताच मर्यादित नसून यात अनेक सर्व्हे नं. येतात. महानगरपालिकेने दि. १६/११/२००५ रोजी स्वर्हेअर श्री. राणे यांना सर्व्हेक्षण केले असता आरक्षण क्र. १२२ मध्ये ४६,७०० चौ. मीटर पैकी २३२१० चौ. मीटर क्षेत्रावर झोपड्या, घरे, गॅरेज, औद्योगिक गाळे यांनी व्याप्त झाले आहे. महानगरपालिकेने दि. १९/०६/२००७ रोजी जा.क्र.मनपा/नर/१०१३ या पत्रात स्पष्ट केले आहे. सदरचे अतिक्रमण सन १९९५ पूर्वीचे असलेले प्रथम दर्शनिय मान्य केले आहे. तसेच कोकण विभाग नगररचना आणि मुल्य निर्धारण विभागाने आरक्षण क्रमांक १२२ बगीचा व सामाजिक वनीकरण क्षेत्रफळ कमी करणेबाबत कलम ३७ ची कार्यवाही करण्यासाठी शासनाने मार्गदर्शन अपेक्षिलेले आहे. याबाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेने कोणतेही ठोस पाऊल उचलले नाही किंवा सदर झोपडपट्टी पुर्नवसन योजनेअंतर्गत पात्रता ठरवून फोटोपास योजना घेतली नाही.

माझे मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब यांना तसेच पूर्ण सभागृहाला पक्षपात न करता आरक्षण क्र. १२२ ह्याच्या व्याप्ती कमी करावी किंवा झोपडपट्टी पुर्नवसन योजनेचा शासन निर्णय झो.पू.यो. १०९७ प्रकरण क्र. ४५१५/झो.पु.सु. अंमलात आणावित.

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर

**सही /-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.१६, भाईंदर (प.) डोंगरी येथे उत्तन भाईंदर मुख्य रस्त्यापासून कोपरकडे जाणारा रस्ता तयार करणेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र. २५ येथे उत्तन भाईंदर मुख्य रस्त्यापासून डोंगरी दत्त मंदिराकडे कोपरपाडा येथे छोटी वसाहत असून सदर वसाहतीकडे जाण्यासाठी रहदारीस अत्यंत अडचणींचे व जिकरीचे होत आहे. सदरचा रस्ता विकास आराखड्यात १८.०० मी. रूंदीचा दर्शविण्यात आलेला आहे. परंतु सद्यस्थितीत सदर रस्त्याचे ३.०० मी. रूंदी. पर्यंत डांबरीकरणासह बांधकाम केल्यास कोपरा येथे राहणाऱ्या नागरीकांना रहदारीस सोयीचे होऊन रस्त्याचा प्रश्न मार्गी लागू शकतो. या कामाकरिता खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (प.) उत्तन भाईंदर मुख्य रस्त्यापासून कोपरकडे जाणाऱ्या रस्त्याचे बांधकाम करणे. | रु. १,५०,९७,१००/- |

वरील कामे सन २०१४-१५ च्या आर्थिक वर्षात "नविन रस्ते बांधकाम" या लेखाशिर्षात तरतुद उपलब्ध आहे. तरी सदर कामांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र. २ येथे उत्तन भाईंदर मुख्य रस्त्यापासून डोंगरी दत्त मंदिराकडे कोपरपाडा येथे छोटी वसाहत असून सदर वसाहतीकडे जाण्यासाठी रहदारीस अत्यंत अडचणींचे व जिकरीचे होत आहे. सदरचा रस्ता विकास आराखड्यात १८.०० मी. रूंदीचा दर्शविण्यात आलेला आहे. परंतु सद्यस्थितीत सदर रस्त्याचे ३.०० मी. रूंदी. पर्यंत डांबरीकरणासह बांधकाम केल्यास कोपरा येथे राहणाऱ्या नागरीकांना रहदारीस सोयीचे होऊन रस्त्याचा प्रश्न मार्गी लागू शकतो. या कामाकरीता बांधकाम विभागाने रू.१,५०,९७,१००/- रकमेच्या अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्याकरीता विषय सादर केलेले आहे. येथे नमूद करण्यात येते की, उत्तन विभागातील रहिवाश्यांवर महानगरपालिका शास्ती कराची आकारणी, मलप्रवाह सुविधा लाभ कराची आकारणी करत आहे. सदर दोनही कराबाबत ठराव करूनही प्रशासनाकडून अंतिम निर्णय घेतला जात नाही. त्याचप्रमाणे उत्तन विभागात असलेला घनकचरा प्रकल्पापासून या विभागातील नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे. अशा परिस्थितीत सदर रस्त्याचे काम पूर्ण करणेकरीता पुढील कार्यवाही करावी. सदर रस्त्यामधील जागा ही सी.आर.झेड. बाधीत आहे. सदर जागेचा पूर्ण ताबा महानगरपालिकेकडे आलेला नाही. यामुळे महानगरपालिकेस या रस्त्याचे काम पूर्ण करण्यास अडचण निर्माण होणार आहे. याकरीता प्रशासनाने त्वरीत या रस्त्याची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घ्यावी व सी.आर.झेड.बाबत शासनाची मंजुरी घेवून उपरोक्त रस्त्याचे काम हाती घ्यावे. जेणेकरून तेथील नागरीकांची फसवणूक होणार नाही. तरी प्रशासनाने उपरोक्त कामाच्या मंजुऱ्या घेवून सदर विषय फेरसादर करण्यास ही सभा मंजूरी देत आहे. नमुद पुर्तता करुन निविदा मागविण्यात यावी तोपर्यंत निविदा काढू नये किंवा अर्थसंकल्पातून तरतुद कमी करु नये.

**अनिल भोसले :-**

माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

प्रशासनांनी खुलासा करावा.

**दिपक खांबित :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतो. सदरचा रस्ता सी.आर.झेडने. बाधित होतो. परंतु महासभेने मंजुरी दिली तर लगेच सी.आर.झेड. प्राधिकरणाकडे अर्ज करून मंजुरी घेणार आहोत.

**भगवती शर्मा :-**

ठराव मंजुर केल्यानंतर किती दिवसात परवानगी आणणार.

**दिपक खांबित :-**

प्रपोजल रेडी आहे. तिकडे पाठवणार.

**भगवती शर्मा :-**

साधारण किती दिवसात येणार.

**दिपक खांबित :-**

आठ दिवसात येईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतो खांबित साहेब आपण जो जेसल पार्क वरून घोडबंदरला जाणार तो सी.आर.झेड. बाधित आहे त्याची परवानगी आणली का?

**दिपक खांबित :-**

त्याची स्टेट गव्हरमेंटची परमीशन दिली होती पुन्हा तो सेंट्रल गव्हरमेंटकडे गेला. सेंट्रल गव्हरमेंटनी सांगितले अधिकार स्टेट गव्हरमेंटचे आहेत आणि आजच्या बैठकिमध्ये तो विषय आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

हा विषय त्याला लागू होत नाही का?

**शरद पाटील :-**

आता तुम्ही सांगितले ८ दिवसात परवानगी आणू. मग त्याची ८ दिवसात आणायला कुठे प्रॉब्लेम आहे.

**दिपक खांबित :-**

प्रस्ताव पाठवू असे म्हणालो.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम मी धन्यवाद देण्यासाठी उभा आहे. सरळ काम केल इच्छा असली तर यश येते. घोडबंदरचा पुल तुटला. तुम्ही ते सगळं निस्तरलय आम्ही ही भोगलय. ह्या विषयाचा पाठपुरावा केला. सभागृहात मला धन्यवाद द्यायला आनंद होतो. नितीनजी गडकरीकडे आम्ही पाठपूरावा करीत होतो. काल नितीनजीची भेट घेतली म्हणून सांगायला आनंद होतो की वर्सोवा ब्रिजचा नविन विकसीत आवश्यक असलेला क्षमतेचा पूलाच्या प्रस्तावाला नितीनजीनी काल मान्यता दिली आहे. आपल्या भाईंदर पश्चिमेला मुर्ध्यापासून ते उत्तनपर्यंत असलेल्या शाळा जसे सी.आर.झेड.च्या बाधितमुळे काम करते कोण कसे लिहीते. कोण कस लिहीते. नगरसेवकाचे मनोबल खचते त्या गावकऱ्यांचे ही खचते. कधी कधी अधिकाऱ्याचेही खचते. त्यासाठी शाळांची परवानगी जी आहे ती परवानगी मिळावी म्हणून आपण प्रकाश जावडेकरांची भेट घेऊन त्यांच्याकडे निवेदन दिलेले आहे. मी असे म्हणत नाही की उद्या होणार. पण आपण अशा भेटीगाठी केल्या तर काम होईल, सांगायला आनंद होतो की सत्ता आपली आहे. जे चांगले काही काम करायचे असेल तर आमच्यावर विश्वास ठेवून सांगा. आम्ही तुम्हांला मान देतो तुम्ही आमच्याबरोबर या.

**भगवती शर्मा :-**

काका आपकी जैसी मान्यता होगी वैसा हम करेंगे लेकीन मेरा कहना है इस शहर में बहोत से काम हुए है। मा.महापौर मॅडम मैं सभागृह में कहना चाहता हूँ की आज वहाँ की बस्ती बहोत समय से तकलीफ सहन कर रही है। वहाँ पे लोक वस्ती है। आज वह लोग बहोत प्रॉब्लेम मे है। आज उस उत्तन शहर के लिए हम लोग सिव्हरेज टॅक्स से क्या क्या नही लेते। हम सुविधा के नाम पे कुछ नही देते। पुरा विकास काम इस साईड मे हो रहा है। आज कितने दिन से उन लोगो ने अपेक्षित किया है की रस्ता मिलेगा। मै यह नही कह रहा हूँ सी.आर.झेड. से बाधित हो रहा है। इसमे यह प्रॉब्लेम है। लेकिन ऐसे बहोत प्रस्ताव है जिसको सभागृह ने मान्यता दी गई है। और मा. आयुक्त साहब के माध्यमसे भी मान्यता दी है। मिरारोड का प्यॅरलल रोड था उसको भी मान्यता दी थी। ठीक है आप इसे मान्यता दे दिजीए और उसमे आप अट डालिए की सी.आर.झेड. की मान्यता मिलने के बाद रस्ता विकसीत करे। लेकिन आप उसमे नेगेटिव्ह क्यू जा रहे है। एक प्रस्ताव लाया। हम उसके नेगेटिव्ह मे जाते है उस बस्ती में गरीब लोग है उनको भी न्याय मिलना चाहिए। उसमे आप डाल अट डाल दिजिए की सी.आर.झेड. की मान्यता के बाद उसको जो भी निविदा प्रक्रिया सुरू कि जाए।

**नरेंद्र मेहता :-**

मा.महापौर मॅडम सुचना चांगली आहे. नया नगरचा विषय काढला दोन कोटी रुपये २०१२-१३ ला तरतूद केली होती. सी.आर.झेड. ची परवानगी भेटली नाही. पेन्डीग राहीले. मग आपण सी.आर.झेड. ची परवानगी आणून २०१३-१४ तो रस्ता केला. अशा अनेक रस्त्यांची आपण निविदा काढतो. नवघरवरून जेसल पार्कला त्या रस्त्याची पाचदा निविदा काढली. दरवेळी निविदा काढतो. त्याची डिपॉझीट जाते. आपण काही करत नाही. ठेकेदारांनी निविदा भरल्यानंतर एखाद्या रस्त्याला नंतर परवानगी आली तर ते १२ करोडचे १८ करोड झाले ते मला द्या. म्हणजे सबवे चा विषय आहे. ह्या प्रकारच्या घटना घडत असतात. ठेकेदार म्हणतो मागच डि.एस.आर. रेट होता आता नविन डि.एस.आर. आता आपण त्या परवानगीसाठी इमेजिएटली बैठक लावा मी तर म्हणेन एका दिवसात स्थायी समितीत बैठक लावून तुम्हाला निर्णय देईन, त्याच्यात विरोध करायचे काही कारण नाही. फक्त दाखवण्यापुरते आहे. ठेकेदार आपला फायदा घेऊन जातो. आणि लोकांची काम होत नाही.

**भगवती शर्मा :-**

तुम्ही ती अट त्याच्यामध्ये टाका की निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर करा.

**नरेंद्र मेहता :-**

मा.महापौर मॅडम ह्या शहरात असे बरेच विषय आहेत. सी.आर.झेड. मध्ये करता येत नाही म्हणून प्रस्ताव देत नाही. त्याचे इस्टीमेट होत नाही असे अनेक रस्ते आम्ही खांबित साहेबांना दाखवले ते बोलले सी.आर.झेड. ची परवानगी घ्यायला लागेल. आपण सर्वच रस्ते एकत्र आणा काही हरकत नाही.

**बर्नड डिमेलो :-**

मा.महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब गाव सडक योजना सगळ्या योजना आल्या गावातल्या गल्ली बोळ्यात रस्ते गेले आज ६०-६५ वर्षापासून तिथे रोड पोहोचू शकत नाही. बरेच प्रयत्न केले. बऱ्याच लोकांच्या अडचणी आल्या. अजून पर्यंत २-४ कि.मी. लोकांनी चालायला लागते. पावसाळ्यात त्या लोकांचे कुत्रा हाल खात नाही. मुला बाळांना खांद्यावर पकडून त्यांना चालायला लागते. अशा प्रकारची दयनीय अवस्था आहे. ह्याच्यामध्ये कुठल्या न कुठल्या अटी घालून मला वाटते त्या लोकांना वेठीस धरण्यापेक्षा आपण लवकरात लवकर मार्ग काढून तो रस्ता होईल ह्याच्यावर विचार करायला पाहिजे. कोणीतरी त्या कामामध्ये खो घालून ते काम पुढे ढकलायचे आणि लोकांना वेठीस धरायचे अशी सभागृहाने भूमिका घेऊ नये. लवकरात लवकर त्यांना कोणत्या प्रकारे रस्ता मंजुर करता येईल. मला वाटते सी.आर.झेड. नी बरीच काम केली आहेत. आपण ज्या कार्यालयात बसले आहेत ते सी.आर.झेड. मध्ये आहे. बरेच प्रकार केले आहेत. तेव्हा नियम कुठे होते. सभागृहाने ह्याला लवकरात लवकर मंजुरी द्यावी. तुम्ही जर गेले नसाल तर एकदा जाऊन बघा. त्या लोकांची परिस्थिती. शुभांगी कोटीयन मॅडमना विचारा. मॅडम मला स्वतः भेटून सांगितले की ते करायला पाहिजे. मुंबईला लागून असलेला शहर आणि तिकडच्या नागरीकांना रस्ता देऊ शकत नाही. मोठ मोठे प्रकल्प आणि प्रोजेक्ट करून ठेके मिरवतो तर ते शोभत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

गावकऱ्यांची जमिन आहे त्या जमिनीतून रस्ता चालू करताना अनेक प्रॉब्लेम येतील. गावकरी अशीच जमिन देणार नाही. तर ती जमिन ताब्यात घ्या आणि करा. सॉल्ट डिपार्टमेंट शौचालयाच्या अनेकदा निविदा काढतो पण पूर्णच होत नाही. कारण ते सॉल्ट डिपार्टमेंट वाले येऊन उभे होतात.

**भगवती शर्मा :-**

ती अट घालून करा ना. सी.आर.झेड की परमिशन मिलने के बाद मे ही निविदा प्रक्रिया शुरू की जाए। ताकि प्रशासन के पास निवेदन जाए की महासभा ने इस टम्स कन्डीशन के आधार पर मंजुरी दि है। हम यह नही कहते की कल की कल निविदा प्रक्रिया शुरू करीए। आपकी मानसिकता है की उस शहर के लिए उस गाव के लोगो के लिए यह सुविधा उपलब्ध नही होना चाहिए तो हमको हरकत नही है।

**शरद पाटील :-**

मी माझ्या ठरावामध्ये बोलतो सी.आर.झेड. ची परवानगी घेऊन स्पेशल मिटींग लावून त्याचा निर्णय घ्यायचा आहे.

**भगवती शर्मा :-**

आप यह शब्द क्यू डाल रहे है। आप अंट डालीए ना की सी.आर.झेड. की प्रोसेस पुरी करने के बाद आगे का प्रोसेस शुरू करे।

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

आज एक साईड के अंदर में आज एक साई में आप कर रहे हो कुछ प्रस्ताव आए। आगे शहर में आचारसंहिता लगेगी विकास काम रूकेगा इस प्रस्ताव के लिए आप बोल रहे हो।

**शरद पाटील :-**

आप स्पेशल मिटींग लगाईए और सी.आर.झेड. की परवानगी लाईए। उसमे एक ही दिन का फरक आता है। ज्यादा फरक नही आता है।

**भगवती शर्मा :-**

क्या फरक नही आता ठीक है कोई बात नही। हमने हमारा ठराव किया है आज जो सुविधा उनको नही मिलती उसके लिए भी पैसे दे रहे है। घन कचरा प्रकल्प किया है तो भी वह लोग सहन कर रहे है। हमने ठराव दिया है जो निर्णय करना है किजिए।

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६ करीता दोन ठराव आले आहेत. पहिला ठराव सुचक बर्नड डिमेलो, अनुमोदक जुबेर इनामदार. दुसरा ठराव सुचक शरद पाटील, अनुमोदक अनिल भोसले. दुसरा ठराव मतदानास टाकतो.

**शुभांगी कोटीयन :-**

मा.महापौर मॅडम आमच्या आगरी लोक खूप वर्षापासून राहतात आणि खरोखर रस्त्याची गरज आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम मी परत सांगतो आमच्या सदस्याची भावना आहे आणि आमची पण भावना आहे व्हाव. आपल्याकडे प्रोसेस काय एकदा ह्याला मान्यता दिल्यानंतर अधिकारी, कमिश्नर काय करणार तो फंड रिझर्व्ह करणार मग दुसरे पण नाही आणि हे पण काम करणार नाही. परवानगी यायला उशीर झाला की दुसरी पण

काम होत नाही हे काम होत नाही. अधिकाऱ्यांनी ठामपणे सांगावे किती दिवसात आणतो आम्ही देतो. त्यांच्याकडे उत्तर नाही.

**भगवती शर्मा :-**

तुमची जी टम्स कंन्डीशन आहे ना त्याच्यानंतर कारवाई त्याच्या अगोदर फंड रिझव्ह करणार का आजपर्यंत कोणी आहे का?

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम मी स्वतः त्याठिकाणी दोनदा जाऊन आलो आहे. मलाही वाटते कराव. पण होणार नाही परवानगी घेऊन करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम जशी ह्यांची सुचना आहे ना आपण काय करून जोपर्यंत सी.आर.झेड. ची ॲड येत नाही तो पर्यंत बजेटमध्ये टाकायची नाही परवानगी आणा मग टेंडर काढा.

**नरेंद्र मेहता :-**

परवानगी घेऊन निविदा काढायची.

**नगरसचिव :-**

नमूद पूर्तता करून निविदा मागवण्यांत यावी तोपर्यंत निविदा काढू नये. किंवा अर्थसंकल्पात तरतूद कमी करू नये. अशी सुचना आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सुचनेसह मंजुर करत आहे.

**प्रकरण क्र. १६ :-**

भाईंदर (प.) डोंगरी येथे उत्तन भाईंदर मुख्य रस्त्यापासून कोपरकडे जाणारा रस्ता तयार करणेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. १८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र. २ येथे उत्तन भाईंदर मुख्य रस्त्यापासून डोंगरी दत्त मंदिराकडे कोपरपाडा येथे छोटी वसाहत असून सदर वसाहतीकडे जाण्यासाठी रहदारीस अत्यंत अडचणींचे व जिकरीचे होत आहे.

सदरचा रस्ता विकास आराखड्यात १८.०० मी. रूंदीचा दर्शविण्यात आलेला आहे. परंतु सद्यस्थितीत सदर रस्त्याचे ३.०० मी. रूंदी. पर्यंत डांबरीकरणासह बांधकाम केल्यास कोपरा येथे राहणाऱ्या नागरीकांना रहदारीस सोयीचे होऊन रस्त्याचा प्रश्न मार्गी लागू शकतो. या कामाकरीता बांधकाम विभागाने रू.१,५०,९७,१००/- रकमेच्या अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्याकरीता विषय सादर केलेले आहे.

सन २०१४-१५ च्या आर्थिक वर्षात "नविन रस्ते बांधकाम" या लेखाशिर्षात तरतुद उपलब्ध आहे.

येथे नमूद करण्यात येते की, उत्तन विभागातील रहिवाश्यांवर महानगरपालिका शास्ती कराची आकारणी, मंलप्रवाह सुविधा लाभ कराची आकारणी करत आहे. सदर दोनही कराबाबत ठराव करूनही प्रशासनाकडून अंतिम निर्णय घेतला जात नाही. त्याचप्रमाणे उत्तन विभागात असलेला घनकचरा प्रकल्पापासून या विभागातील नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे. अशा परिस्थितीत सदर रस्त्याचे काम पूर्ण करणेकरीता पुढील कार्यवाही करावी.

सदर रस्त्यामधील जागा ही सी.आर.झेड. बाधीत आहे. सदर जागेचा पूर्ण ताबा महानगरपालिकेकडे आलेला नाही. यामुळे महानगरपालिकेस या रस्त्याचे काम पूर्ण करण्यास अडचण निर्माण होणार आहे. याकरीता प्रशासनाने त्वरीत या रस्त्याची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घ्यावी व सी.आर.झेड.बाबत शासनाची मंजुरी घेवून उपरोक्त रस्त्याचे काम हाती घ्यावे. जेणेकरून तेथील नागरीकांची फसवणूक होणार नाही.

नमुद पुर्तता करुन निविदा मागविण्यात यावी तोपर्यंत निविदा काढू नये किंवा अर्थसंकल्पातून तरतुद कमी करु नये. तरी सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**सही /-**
**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७, भाईंदर (पश्चिम) स्पॅन हाईटस् ते मिरा हॉस्पीटल पर्यंतचा रस्ता तयार करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**प्रशांत दळवी :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पश्चिम) भागात उन्नत मार्गा लगत स्पॅन हाईट्स ते मिरा हॉस्पीटल पर्यंतचा १८.०० मीटर रूंदीचा विकास योजनेतील रस्ता विकसीत करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाने रू. ७१,५७,१००/- खर्च अपेक्षित धरून सदर खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेबाबत शिफरस केलेली आहे. येथे नमूद करण्यात येते की, सदर रस्ता ज्या ठिकाणी करावयाचा आहे तेथे नविन इमारतींची कामे सुरू असून या रस्त्यावर रिलायन्स कंपनीचे व एम.टी.एन.एल. कंपनीचे नविन केबल टाकणे, केबल शिफ्ट करणे, पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे इ. कामाकरीता रस्ता खोदाई करावी लागणार आहे. तसेच विकासकांच्या नविन घरसंकुलनाची कामे चालू असल्याने येणाऱ्या जड वाहनांची वाहतुक चालू राहणार आहे. या ठिकाणी रस्ता करणे संयुक्तीत होणार नाही. त्यामुळे तेथील रस्त्यांचे काम विकसकांकडून करून घेण्यात यावे व सदर रस्ता बांधकामाचा विषय फेटाळण्यात येत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे.

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पश्चिम) भागात उन्नत मार्गा लगत स्पॅन हाईट्स ते मिरा हॉस्पीटल पर्यंतचा १८.०० मीटर रूंदीचा विकास योजनेतील रस्ता आहे. सदर भागातील रहिवाशी रस्ता तातडीने करावा यासाठी पाठपूरावा करीत आहेत. तसेच तेथे हॉस्पीटल असल्यामुळे सदर रस्ता तयार करणे करिता रु. रू. ७१,५७,१००/- एवढा खर्च अपेक्षित असून सन २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रस्ते नविन बांधकाम या लेखाशिर्षाखाली सदर कामासाठी तरतूद उपलब्ध आहे. तरी सदर कामाच्या खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण १७ करीता दोन ठराव आले आहेत. पहिलं ठराव सुचक प्रशांत दळवी, अनुमोदन दिनेश जैन, दुसरा ठराव ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदन जुबेर इनामदार अनुक्रमे दुसरा ठराव मतदानास टाकतो. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. सुचक प्रशांत दळवी ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. प्रशांत दळवी ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४५, विरोधात ३६, तटस्थ ० इतकी मत पडलेली आहे. प्रशांत दळवी ह्यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १७ :-**

भाईंदर (पश्चिम) स्पॅन हाईटस् ते मिरा हॉस्पीटल पर्यंतचा रस्ता तयार करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. १९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पश्चिम) भागात उन्नत मार्गा लगत स्पॅन हाईट्स ते मिरा हॉस्पीटल पर्यंतचा १८.०० मीटर रूंदीचा विकास योजनेतील रस्ता विकसीत करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाने रू. ७१,५७,१००/- खर्च अपेक्षित धरून सदर खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेबाबत शिफरस केलेली आहे. येथे नमूद करण्यात येते की, सदर रस्ता ज्या ठिकाणी करावयाचा आहे तेथे नविन इमारतींची कामे सुरू असून या रस्त्यावर रिलायन्स कंपनीचे व एम.टी.एन.एल. कंपनीचे नविन केबल टाकणे, केबल शिफ्ट करणे, पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे इ. कामाकरीता रस्ता खोदाई करावी लागणार आहे. तसेच विकासकांच्या नविन घरसंकुलनाची कामे चालू असल्याने येणाऱ्या जड वाहनांची वाहतुक चालू राहणार आहे. या ठिकाणी रस्ता करणे संयुक्तीत होणार नाही. त्यामुळे तेथील रस्त्यांचे काम विकसकांकडून करून घेण्यात यावे व सदर रस्ता बांधकामाचा विषय फेटाळण्यात येत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदक :- श्री. दिनेश जैन**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | निरंक |
| २ | कांगणे यशवंत ठकाजी | २ | अशोक तिवारी | |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | पाटील वंदना विकास | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | पाटील वंदना मंगेश | |
| ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ९ | केळुसकर प्रशांत नारायण | ९ | डॉ. आसिफ गुलाब शेख | |
| १० | भानुशाली वर्षा गिरीधर | १० | डिमेलो बर्नट अल्बर्ट | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | |
| १२ | शाह राकेश रतिशचंद्र | १२ | खण्डेलवाल सुरेश | |
| १३ | शरद केशव पाटील | १३ | नरेश तुकाराम पाटील | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | शबनम लियाकत शेख | |
| १५ | जैन गिता भरत | १५ | अनिता जयवंत पाटील | |
| १६ | जैन रमेश धरमचंद | १६ | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | |
| १७ | डॉ. राजेंद्र जैन | १७ | भावसार शिल्पा कमलेश | |
| १८ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १८ | वंदना रामदास चक्रे | |
| १९ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | १९ | भोईर कमलेश यशवंत | |
| २० | सुजाता रविकांत शिंदे | २० | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | |
| २१ | मेहता नरेंद्र लालचंद | २१ | रविंद्र भिमदेव माळी | |
| २२ | शाह सिमा कमलेश | २२ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २३ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| २४ | डॉ. नयना मनोज वसानी | २४ | पाटील सुनिता कैलास | |
| २५ | जैन दिनेश तेजराज | २५ | वेतासकर राजेश शंकर | |
| २६ | अरोरा दिपीका पंकज | २६ | प्रभात प्रकाश पाटील | |
| २७ | मीरादेवी रामलाल यादव | २७ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २८ | अनिल बाबुराव भोसले | २८ | रकवी सुहास माधवराव | |
| २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | २९ | झिनत रऊफ कुरेशी | |
| ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३० | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | |
| ३१ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | ३१ | पुजारी कांचना शेखर | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३२ | काझी रशीदा जमील | |
| ३३ | तारा विनायक घरक | ३३ | इनामदार जुबेर | |
| ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ३५ | शुभांगी महिन कोटियन | ३५ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| ३६ | जयमाला किशोर पाटील | ३६ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ३७ | परमार अनिता भरत | ३७ | सामंत प्रमोद जयराम | |
| ३८ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४० | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ४१ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ४२ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ४३ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४४ | भोईर भावना राजू | | | |
| ४५ | भोईर राजू यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजुर.**

**सही /-**
**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १८, वैद्यकीय विभागाकरिता आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल खरेदी करणेकरिता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाकरिता सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पिय अंदाज पत्रकानुसार खालील बाबींसाठी ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

१) औषध खरेदासाठी रू. १,००,००,०००/-
२) लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरीअल, खरेदी/वार्षिक देखभाल करार यासाठी रू. १,००,००,०००/-
३) विविध लस खरेदीसाठी रू. ५०,००,०००/-

उपरोक्त कामी ठरावाची वाट न पाहता त्वरित अंमलबजावणी करण्यास व निविदा काढण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना व कंत्राटी तत्वावरील कामगारांना महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्र व रूग्णालयामध्ये सर्व तपासण्या व उपचार मोफत देण्यात यावे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**राजेंद्र जैन :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाकरिता सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पिय अंदाज पत्रकानुसार खालील बाबींसाठी ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

४) औषध खरेदासाठी रू. १,००,००,०००/-

५) लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरीअल, खरेदी/वार्षिक देखभाल करार यासाठी रू. १,००,००,०००/-

६) विविध लस खरेदीसाठी रू. ५०,००,०००/-

वरील अ. क्र. १,२,३ मधील औषधे, लस व साहीत्य खरेदीचे निविदा मागविण्यापूर्वी खालील अटीशर्तीचे पालन करून मा. स्थायी समिती समोर सदर साहीत्याची यादी ठेवण्यात यावी.

१. औषधे खरेदी करताना कंपनीचे नाव व Quantity यादी सादर करावी.

२. लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरीअल खरेदी करताना Product Specification व Quantity द्यावी.

३. विविध लस खरेदी करताना कंपनीचे नावे व आवश्यक Quantity द्यावी.

४. Quantity नमूद करावी व इतर माहीती नमूद करावी.

याप्रमाणे अटीशर्तीची अंमलबजावणी करून साहीत्य खरेदी करण्यास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यात येत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे. तसेच मिरां भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना व कंत्राटी तत्वावरील कामगारांना महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्र व रूग्णालयामध्ये सर्व तपासण्या व उपचार मोफत देण्यात यावे.

**अनिल भोसले :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रशासनाने खुलासा करावा. डॉ.साहेबांनी म्हटले आहे तुम्ही जे औषध मागवता त्या कंपनीचे नांव, कॉन्टेटी तुम्ही नमूद करता की नाही.

**डॉ.पडवळ :-**

हो.

**नरेंद्र मेहता :-**

मा.महापौर मॅडम आम्ही निविदेला आर्थिक प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. पण आपल्याकडे ती यादी तयार नव्हती. त्यामुळे ते प्रलंबित राहू नये म्हणून सांगितले सादर करावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विषय असा आहे की हा आपण ठराव मांडतो शेवटी स्थायी समिती मंजुरीसाठी येतेच.

**नरेंद्र मेहता :-**

टाईम जाऊ नये पुन्हा रिकॉल करा. आता मी सांगितले काय घ्यायचे तर त्यांच्याकडे नसेल. प्रॉब्लेम असा आहे ॲनसिन आणि सेरीडॉन हे दोन्ही डोक्याचे औषध असतील. एकामध्ये ४० टक्के मार्जीन असते. एकामध्ये ६० टक्के असते. नक्की कुठली घेतो आणि काय डिस्काऊन्ट ते माहित नसते की आपण कोणती टॅबलेट घेतो तर ती माहिती दिल्यावर सुचना मांडता येईल. चांगल करता येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

औषध खरेदी करताना कंपनीचे नांव, कॉन्टेटी सादर करावी तसेच लॅब मटेरियल, सर्जरी मटेरीयल खरेदी करताना प्रॉडक्ट स्पेसिफीकेशन कॉन्टेटी विविध लस खरेदी करताना कंपनीचे नांव, आवश्यक कॉन्टेटी अशी ही सगळी माहिती टेंडर घेताना करतो.

**राजेंद्र जैन :-**

ऐसा होता नही कोई भी आपको बडा इस्ट्रमेन्ट खरिदना रहता है उसका स्पेसिफीकेशन आता नही है। और आप अलग अलग तरीकेसे खरीदते है इसके लिए पहले हमने बोंला कन्सलटन्ट जो खरीदने को बोलना है। उसको डिस्कस करेगे बादमे खरीदा जाए।

**मा. महापौर :-**

ठराव सुचनेसह मंजुर करत आहे.

**प्रकरण क्र. :- १८**

वैद्यकीय विभागाकरिता आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल खरेदी करणेकरिता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. :- २०**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाकरिता सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पिय अंदाज पत्रकानुसार खालील बाबींसाठी ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

७) औषध खरेदासाठी रू. १,००,००,०००/-

८) लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरीअल, खरेदी/वार्षिक देखभाल करार यासाठी रू. १,००,००,०००/-

९) विविध लस खरेदीसाठी रू. ५०,००,०००/-

वरील अ. क्र. १,२,३ मधील औषधे, लस व साहीत्य खरेदीचे निविदा मागविण्यापूर्वी खालील अटीशर्तीचे पालन करून मा. स्थायी समिती समोर सदर साहीत्याची यादी ठेवण्यात यावी.

५. औषधे खरेदी करताना कंपनीचे नाव व Quantity यादी सादर करावी.

६. लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरीअल खरेदी करताना Product Specification व Quantity द्यावी.

७. विविध लस खरेदी करताना कंपनीचे नावे व आवश्यक Quantity द्यावी.

८. Quantity नमूद करावी व इतर माहीती नमूद करावी.

याप्रमाणे अटीशर्तीची अंमलबजावणी करून साहीत्य खरेदी करण्यास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यात येत आहे. तसेच उपरोक्त कामी ठरावाची वाट न पाहता त्वरीत अंमलबजावणी करण्यास व निविदा काढण्यास ही सभा मंजुरी देत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना व कंत्राटी तत्वावरील कामगारांना महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्र व रूग्णालयामध्ये सर्व तपासण्या व उपचार मोफत देण्यात यावे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील    अनुमोदक :- डॉ. राजेंद्र जैन**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**सही /-**
**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १९, भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वे खालील सबवे बांधणे कामाच्या सुधारीत खर्चास व पोहच रस्त्याच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वे खालील सबवे बांधणे कामी दिलेला गोषवारा पहाता सदर सबवेचे काम पूर्ण होऊन वाहनांना सदर सबवे सुरु होणे हे गरजेचे आहे. तरी सदर सबवे बांधणे कामी सुधारीत अंदाजपत्रक रु. ५८,०८,५५,५९१/- खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर काम हे सबवेच्या मुळ कामाचे ठेकेदार मे. घई कंन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडून करुन घेण्यात यावे. भाईंदर पूर्व व पश्चिम दोन्ही बाजूस सबवेचे पोहच रस्ते व त्या अनुषंगिक सर्व कामे करणे करिता मे. राईट्स लि. यांना सल्लागार नेमून त्यांच्यामार्फत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून गोषवाऱ्यात नमूद इतर आवश्यक अडथळे हटविणे इ. कामे करण्यास येणाऱ्या खर्चास, रेल्वे प्रशासनाचे आवश्यक चार्जेस व फी भरण्यास तसेच पोहच रस्त्याचे रु. २३,११,९६,८७७/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर काम हे मे. राईट्स लि. यांच्या देखरेखीखाली करण्यात यावे व पोहच रस्त्याच्या कामाची निविदा मागविण्यात यावी.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**सुमन कोठारी :-**

भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वे खालील सबवे बांधणे कामी दिलेला गोषवारा पहाता सदर सबवेचे काम पूर्ण होऊन वाहनांना सदर सबवे सुरु होणे हे गरजेचे आहे. तरी सदर सबवे बांधणे कामी सुधारीत अंदाजपत्रक रु. ५८,०८,५५,५९१/- खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर काम हे सबवेच्या मुळ कामाचे ठेकेदार मे. घई कंन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडून करुन घेण्यात यावे. भाईंदर पूर्व व पश्चिम दोन्ही बाजूस सबवेचे पोहच रस्ते व त्या अनुषंगिक सर्व कामे करणे करिता मे. राईट्स लि. यांना सल्लागार नेमून त्यांच्यामार्फत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून गोषवाऱ्यात नमूद इतर आवश्यक अडथळे हटविणे इ. कामे करण्यास येणाऱ्या खर्चास, रेल्वे प्रशासनाचे आवश्यक चार्जेस व फी भरण्यास तसेच पोहच रस्त्याचे रु. २३,११,९६,८७७/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर काम हे मे. राईट्स लि. यांच्या देखरेखीखाली करण्यात यावे व पोहच रस्त्याच्या कामाची निविदा मागविण्यात यावी.

**अश्विन कसोदरिया :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

ठराव आम्ही मांडतो अनुमोदन तुम्ही द्या.

**मा. महापौर :-**

दोन्ही क्लब करून ठराव मंजुर करत आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा.महापौर मॅडम आपण ह्या शहराची एक एक योजना साकारतो. सगळे प्रयत्न करतो. जेसल पार्क सब वे हा काही वर्षापासूनचा विषय आहे. प्रशासनाकडून अस कधीच काम होत नाही की आपण काय काम करतो. लोकांना किती उपयोगी पडणार आहे. त्याच्यातून नक्की काय जाणार आहे. गाय, बकरी, टेम्पो, रिक्षा की माणसं जाणार. त्याची नक्की जाणीव देत नाही. आपण पहिल्यांदा त्याला मंजुरी दिली. सब वे पाहिजेच आहे. नाहीतर गैरसोय आहे. इतकी वर्ष काम चालू आहे त्या कामाची प्रगती काय ॲडव्हान्स टेक्नोलॉजी आलेली आहे. आजपर्यंत कंपनीने किंवा प्रशासनाने कधी प्रात्यक्षिक दाखवले नाही. हा सुसज्ज सभागृह आहे. आपल्याकडे एल.सी.डी. प्रोजेक्टर सगळे काही आहे. आपण २०-३० कोटींची मंजुरी देतो. तर त्या कंपनीने किंवा कोणी काय बनवले आहे. मी त्या कंपनीशी काही वर्षापासून संबंधीत आहे. त्यांच्याकडे कोणतेही डिजाईन नव्हते की सब वे वरून कोण कुठे येणार आणि कोण कुठे जाणार. आता जर त्यांनी बसवल बसवणे गरजेचे आहे. सब वे बनवतो त्याला रस्ता देणे गरजेचे आहे. बसवले ते कोणते बसवले. लिफ्ट प्रोव्हिजन केली आहे का? त्याच्यामध्ये काय आहे. सब वेच्या वर आता नविन कायदे आलेले आहेत. त्या कायद्याच्या सगळ्या तरतूदीनुसार आहे की काल जसे अंधेरीत पेटल्यानंतर सगळेच अधिकारी त्याच्यावर भाषण करायला लागले ह्याची तरतूद आहे का? पाहणी करण्यांत येईल नंतर अहवाल देण्यांत येईल. त्याच्यावर आपली काय तयारी आहे. त्याचा खुलासा करा.

**दिपक खांबित :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतो. काका तुमच्या बरोबर सगळे डिस्कस झाले. नकाशे १० वेळा उघडून दाखवले.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मा.महापौर मॅडम मला हेच म्हणायचे आहे की मला एकट्याला माहिती करायची नाही हे सन्मा. सभागृह आहे. ह्या सभागृहातील सगळ्यांना माहिती मिळायला पाहिजे. मला प्रशासनाने नाह दाखवले तर माहिती पडते. खांबित साहेब सांगा.

**दिपक खांबित :-**

काका प्रश्न मोठा आहे. प्रेझेन्टेशननेच दाखवायला पाहिजे. कुठून रस्ता जाणार कुठे निघणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पुढच्या मिटींगमध्ये व्यवस्थीत प्रेझेन्टेशन दाखवा.

**दिपक खांबित :-**

काका ह्याकरीता चार पानाची टिप्पणी दिलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

ह्याच्यात चुक काही नाही. मला ७० ते ८० टक्के माहिती आहे. हे खरे आहे. परंतु सभागृहाला माहित व्हावे म्हणून मी सांगतो. मा.महापौर मॅडम तुम्ही त्यांना परवानगी द्या. त्यांनी यावं, डेमो दाखवावा अशी आपली अगोदर पण प्रथा होती. सगळ्यांना माहित पडते.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

नेते वगैरे मंडळीना जशी माहिती देतात तसे प्रेझेन्टेशन करू.

**प्रकरण क्र. १९ :-**

भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वे खालील सबवे बांधणे कामाच्या सुधारीत खर्चास व पोहच रस्त्याच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**ठराव क्र. २१ :-**

भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वे खालील सबवे बांधणे कामी दिलेला गोषवारा पहाता सदर सबवेचे काम पूर्ण होऊन वाहनांना सदर सबवे सुरु होणे हे गरजेचे आहे. तरी सदर सबवे बांधणे कामी सुधारीत अंदाजपत्रक रु. ५८,०८,५५,५९१/- खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर काम हे सबवेच्या मुळ कामाचे ठेकेदार मे. घई कंन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडून करुन घेण्यात यावे.

भाईंदर पूर्व व पश्चिम दोन्ही बाजूस सबवेचे पोहच रस्ते व त्या अनुषंगिक सर्व कामे करणे करिता मे. राईट्स लि. यांना सल्लागार नेमून त्यांच्यामार्फत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून गोषवाऱ्यात नमूद इतर आवश्यक अडथळे हटविणे इ. कामे करण्यास येणाऱ्या खर्चास, रेल्वे प्रशासनाचे आवश्यक चार्जेस व फी भरण्यास तसेच पोहच रस्त्याचे रु. २३,११,९६,८७७/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर काम हे मे. राईट्स लि. यांच्या देखरेखीखाली करण्यात यावे व पोहच रस्त्याच्या कामाची निविदा मागविण्यात यावी.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील          अनुमोदक :- श्रीम. सुमन कोठारी**

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर
मिरा-भाईदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २०, मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ते कार्पोरेशन बँक पर्यंत तसेच एन.एच. स्कुल ते टाऊन पार्क रत्याचे डाव्या बाजूस नाला बांधणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**नरेंद्र मेहता :-**

मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ते कार्पोरेशन बँक पर्यंतचे गटार अरुंद असून त्यामधून नयानगर परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही. त्यामुळे सदर ठिकाणी पावसाचे पाणी साचते. तसेच मिरारोड (पूर्व) एन.एच. स्कूल रस्त्यावरील ओत्सवाल पॅराडाईज ते अस्मिता आर्चिड पर्यंतचे गटार अरुंद असून योग्य तो उतार नाही. तसेच त्यावरील स्लॅब बऱ्याच ठिकाणी तुटलेला आहे. त्यामुळे या गटारामधून पार्श्वनगर परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले आहे.

| अ.क्र. | कामाचे नावव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ज्युपिटर इमारत ते कॉर्पोरेशन बँकपर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे तसेच मिरारोड (पूर्व) एन.एच. स्कूल रस्त्यावरील ओत्सवाल पॅराडाईज ते अस्मिता आर्चिड २ पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. ८७,६९,४००/- |

वरील कामाच्या अंदाजपत्रकाना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**दिनेश जैन :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ते कार्पोरेशन बँक पर्यंतचे गटार अरुंद असून त्यामधून नयानगर परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही. त्यामुळे सदर ठिकाणी पावसाचे पाणी साचते. तसेच मिरारोड (पूर्व) एन.एच. स्कूल रस्त्यावरील ओत्सवाल पॅराडाईज ते अस्मिता आर्चिड पर्यंतचे गटार अरुंद असून योग्य तो उतार नाही. तसेच त्यावरील स्लॅब बऱ्याच ठिकाणी तुटलेला आहे. त्यामुळे या गटारामधून पार्श्वनगर परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले आहे.

| अ.क्र. | कामाचे नावव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ज्युपिटर इमारत ते कॉर्पोरेशन बँकपर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे तसेच मिरारोड (पूर्व) एन.एच. स्कूल रस्त्यावरील ओत्सवाल पॅराडाईज ते अस्मिता आर्चिड २ पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. ८७,६९,४००/- |

वरील कामाच्या अंदाजपत्रकाना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**अशरफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम दोन्ही ठराव एक सारखेच आहेत क्लब करून घ्या.

**मा. महापौर :-**

दोन्ही ठराव क्लब करून मंजुर करत आहे.

**प्रकरण क्र. २० :-**

मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ते कार्पोरेशन बँक पर्यंत तसेच एन.एच. स्कुल ते टाऊन पार्क रत्याचे डाव्या बाजूस नाला बांधणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**ठराव क्र. २२ :-**

मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ते कार्पोरेशन बँक पर्यंतचे गटार अरुंद असून त्यामधून नयानगर परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही. त्यामुळे सदर ठिकाणी पावसाचे पाणी साचते. तसेच मिरारोड (पूर्व) एन.एच. स्कूल रस्त्यावरील ओत्सवाल पॅराडाईज ते अस्मिता आर्चिड पर्यंतचे गटार अरुंद असून योग्य तो उतार नाही. तसेच त्यावरील स्लॅब बऱ्याच ठिकाणी तुटलेला आहे. त्यामुळे या गटारामधून पार्श्वनगर परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले आहे.

| अ.क्र. | कामाचे नावव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ज्युपिटर इमारत ते कॉर्पोरेशन बँकपर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे तसेच मिरारोड (पूर्व) एन.एच. स्कूल रस्त्यावरील ओत्सवाल पॅराडाईज ते अस्मिता आर्चिड २ पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. ८७,६९,४००/- |

वरील कामाच्या अंदाजपत्रकाना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार                अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**सही /-**

**महापौर**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २१, महानगरपालिकेच्या सन्मा. सदस्यांकरीता अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानरगपालिका क्षेत्र मुंबई महानगरालगत असुन शहराची लोकसंख्या वेगाने वाढत असुन विकास झपाट्याने होत आहे. शहरात मुलभूत नागरी सोयी सुविधा पुरविणे, शहराचा सर्वांगीण विकास करणे, शहराच्या हिताच्या दृष्टीने शहरात नवनविन योजना, प्रकल्प राबविणे याबाबत इतर शहरात जावून तेथील विकास कामांबाबत व योजनांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका सदस्य, अधिकारी / कर्मचारी यांचा अभ्यास दौरा आयोजित करण्याचे निश्चित करण्यात येत आहे. महानगरपालिका अंदाजपत्रक २०१४-१५ मध्ये मा. नगरसेवक प्रशिक्षण / प्रवासभत्ता या लेखाशिर्षाखाली रक्कम रु. ४० लक्ष इतकी तरतुद आहे. तरी उपरोक्त लेखाशिर्षामधुन या दौऱ्याकरीता अंदाजे अपेक्षित रक्कम रु. २५,००,०००/- इतक्या खर्चास हि सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे. महानगरपालिकेच्या जाहिराती ई टेंडरींगद्वारे देण्यात येतात. तथापी ई टेंडरींग करीता Digital Signature असावी लागते. अशाप्रकारे सन्मा. सदस्यांकरिता दौरा आयोजित करण्याचे काम कधीतरी होत असल्याने संबंधित ट्रॅव्हल एजन्सीकडे *Digital Signature* नसतात. *करिता या दौऱ्याकरिता वृत्तपत्रात जाहिरात देऊन निवीदा* मागविण्यात याव्यात. दौऱ्याकरीता नगरसचिव विभागाने आवश्यक मंजूऱ्या प्राप्त करुन घ्याव्यात. तसेच या दौऱ्याकरिता ट्रॅव्हल्स एजन्सी नेमणेस व आवश्यक बाबींची पुर्तता करणेस, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण ५(२)(२) अन्वये प्राप्त अधिकारात मा. आयुक्त यांना ही सभा प्राधिकृत करीत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर करत आहे.

**राजेंद्र जैन :-**

प्रशिक्षण दिया जाएगा। दौरा चालु होने के पहले मनपा किन विषय संबंधीत प्रशिक्षण दिया जाएगा। और दो करोड के उपर जो काम है उसके उपर तांत्रिक माहिती है वह दि जाएगी यह दौरा शुरू होने के पहले सब सदस्य को मिलना चाहिए ऐसी मेरी सुचना है।

**प्रकरण क्र. २१ :-**

महानगरपालिकेच्या सन्मा. सदस्यांकरीता अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत.

**ठराव क्र. २३ :-**

मिरा भाईंदर महानरगपालिका क्षेत्र मुंबई महानगरालगत असुन शहराची लोकसंख्या वेगाने वाढत असुन विकास झपाट्याने होत आहे. शहरात मुलभूत नागरी सोयी सुविधा पुरविणे, शहराचा सर्वांगीण विकास करणे, शहराच्या हिताच्या दृष्टीने शहरात नवनविन योजना, प्रकल्प राबविणे याबाबत इतर शहरात जावून तेथील विकास कामांबाबत व योजनांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका सदस्य, अधिकारी / कर्मचारी यांचा अभ्यास दौरा आयोजित करण्याचे निश्चित करण्यात येत आहे.

महानगरपालिका अंदाजपत्रक २०१४-१५ मध्ये मा. नगरसेवक प्रशिक्षण / प्रवासभत्ता या लेखाशिर्षाखाली रक्कम रु. ४० लक्ष इतकी तरतुद आहे. तरी उपरोक्त लेखाशिर्षामधुन या दौऱ्याकरीता अंदाजे अपेक्षित रक्कम रु. २५,००,०००/- इतक्या खर्चास हि सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

महानगरपालिकेच्या जाहिराती ई टेंडरींगद्वारे देण्यात येतात. तथापी ई टेंडरींग करीता Digital Signature असावी लागते. अशाप्रकारे सन्मा. सदस्यांकरिता दौरा आयोजित करण्याचे काम कधीतरी होत असल्याने संबंधित ट्रॅव्हल एजन्सीकडे Digital Signature नसतात. करिता या दौऱ्याकरिता वृत्तपत्रात जाहिरात देऊन निवीदा मागविण्यात याव्यात. दौऱ्याकरीता नगरसचिव विभागाने आवश्यक मंजूऱ्या प्राप्त करुन घ्याव्यात. तसेच या दौऱ्याकरिता ट्रॅव्हल्स एजन्सी नेमणेस व आवश्यक बाबींची पुर्तता करणेस, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण ५(२)(२) अन्वये प्राप्त अधिकारात मा. आयुक्त यांना ही सभा प्राधिकृत करीत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील                अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**सही /-**
**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २२ सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख यांचा दिनांक ११/०७/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- भाईंदर (प.) टेम्बा हॉस्पीटलास "हजरत ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती रेहमतुल्लाह अलैही (ख्वाजा गरीब नवाज) हॉस्पीटल" असे नामकरण करणेबाबत.

**आसिफ शेख :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे भाईंदर (प.) येथे टेंबा हॉस्पीटलचे काम प्रगतीपथावर सुरु आहे. सदर हॉस्पीटलमध्ये मिरा भाईंदर शहरातील गोर गरीब मध्यमवर्गीय रुग्णांना फार मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळणार आहे. भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान असलेले जगविख्यात म्हणून ज्याचा नावलौकिक व गौरव आहे व ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य गोर गरिबांच्या कल्याणासाठीच वाहिले आहे व ज्यांना "सुलतान-ए-हिंद" म्हणून देखील खिताब मिळालेला आहे असे थोर सूफीसंत "हजरत ख्वाजा मोईनूद्दिन चिस्ती रेहमतुल्लाह अलैही (ख्वाजा गरीब नवाज)" यांचे नाव भाईंदर (प.) येथील मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या टेंबा हॉस्पीटलास दिल्यास एक चांगला संदेश जगातील त्यांच्या लाखो करोडो सर्वधर्मिय भक्तांमध्ये जाईल व आपल्या शहरासदेखील एक वैभव प्राप्त होऊन शहराचे नावलौकिक होईल. तरी "हजरत ख्वाजा मोईनूद्दिन चिस्ती रेहमतुल्लाह अलैही (ख्वाजा गरीब नवाज)" यांचे नाव मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भाईंदर (प.) येथील टेंबा हॉस्पीटलास देण्यात यावे, असा ठराव मी मांडत आहे. सदर ठरावाची प्रशासनाने तातडीने अंमलबजावणी करावी.

**अशरफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम सदर रूग्णालयाचे ऑलरेडी आपल्याकडे नामकरण झालेले आहे. तुळशीदास म्हात्रे साहेब महापौर होते. भगवती शर्माजी अनुमोदक किंवा सुचक होते. त्या ठरावामध्ये आणि आता भारतरत्न भीमसेन जोशी ह्यांचे नांव दिले गेले आहे जे वगळणं योग्य होईल का? आम्ही वेगळा ठराव करून वेगळा मेसेज जाता कामा नये. आम्ही आसिफ शेखना विनंती करणार की आपण जे नांव दिलेले आहे ते इतर वास्तूसाठी परत विषय द्यावा आणि हा प्रस्ताव मागे घ्यावा. जेणेकरुन घ्या सभागृहाने आपल्याच सत्तेत नांव दिलेलं आहे.

**आसिफ शेख :-**

तुम्हाला त्याचा विरोध आहे का?

**नरेंद्र मेहता :-**

विरोधाचा प्रश्न नाही.

(सभागृहात गोंधळ)

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एकाच वास्तूला दोन दोन नांव देता येतात का?

**निलम ढवण :-**

एवढ्या मोठ्या व्यक्तीचे नांव बदलण्यामागे कारण काय?

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम सभागृहाची विनंती राहील आसिफ शेख ह्यांनी दुसरी जागा सुचवावी.

**मा. महापौर :-**

सर्वांनी बसून घ्या.

**आसिफ शेख :-**

ह्या संदर्भात प्रशासनानी खुलासा करावा. हजरत ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती ह्यांचे नांव ह्यापुर्वी ह्याच हॉस्पीटलला देण्यांत आले होते की नाही. मग बदलले कसे त्याचा खुलासा प्रशासनाने करावा.

**दिपक खांबित :-**

मा. महासभा दिनांक १९/११/२००८ ठराव क्र. ६३ मध्ये भारत रत्न पंडित भीमसेन जोशी असे नांव झालेले आहे.

**आसिफ शेख :-**

हा ठराव होण्याच्या अगोदर.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम हे नामकरण करण्यापेक्षा हॉस्पीटल कधी चालू करणार तो प्रयत्न करा.

**मा. महापौर :-**

हॉस्पीटल लवकरच चालू करण्यांत येत आहे. त्यामुळे नावाची तयारी चालू आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

असू द्या. ऑलरेडी नांव देण्यांत आलेले आहे.

**आसिफ शेख :-**

प्रशासन प्रत्येक वेळी दिशाभूल करते. ऑलरेडी त्याचे नाव दिले होते. शिफारस केली होती. मध्यंतरी प्रस्ताव आणून मंजूर करून घेतला.

**प्रशांत दळवी :-**

प्रशासनाने स्पष्ट करावे.

**नरेंद्र मेहता :-**

भारतरत्न भीमसेन जोशी ह्यांचे नाव देतो. आपण एखाद्या वास्तूला देतो आणि नंतर कमी करण हे कितपर्यंत योग्य आहे. हा गंभीर प्रश्न आहे. ह्या प्रस्तावाचा आम्ही निषेध करतो. ते सन्मा. नाव इतर इमारतीना द्यावे. सगळ्या समाजाचे हित त्याच्यामध्ये राहील. एका ठरावात दुसरा ठराव करणे. आणि हा ठराव आम्ही केला नाही तो आपल्या सत्तेत झाला आहे. भाईंदर (प.) टेंबा येथे हॉस्पीटल इमारतीचे बांधकाम बंद झालेले आहे. तसेच सदर हॉस्पीटल इमारतीस यापुर्वीच मा. महासभा दि. १९/११/२००८ ठराव क्र. ६३ अन्वये "भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी हॉस्पीटल" असे नामकरण झालेले असल्याने "भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी हॉस्पीटल" हे नाव कायम ठेवण्यात यावे असा ठराव मांडीत आहे. तसेच भाईंदर पश्चिमेकडील महापालिका शाळेच्यासमोर सौ. प्रेमा शंकर चित्राव शिक्षण संकुल हे नाव द्यावे.

**प्रशांत दळवी :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

रसाजच्या बाजूला जे प्रभाग कार्यालय आहे त्या अगोदरच नाव देण्यात आलेले आहे. दुसरी वास्तू कुठली?

**प्रशांत दळवी :-**

रात्र निवारा केंद्र जे आहे. त्या ठिकाणी आपले हॉस्पीटल शिफ्ट केले आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम प्रस्ताव माझा आहे. मी ठराव दिलेला आहे. त्या ठरावाला विरोध असेल तर सांगा पुन्हा त्या ठरावामध्ये माझ्या प्रस्तावामध्ये इतर ठिकाणचे नामकरण. तुम्ही वेगळा प्रस्ताव आणा. हा माझा प्रस्ताव आहे. माझ्या प्रस्तावामध्ये ते विरोध करू शकत नाही. सचिव साहेब त्यांना नियम सांगा.

**मा. महापौर :-**

ते नाव वगळून घ्या. जे त्यांनी नाव दिलेले आहे. ते नाव तुम्ही हॉस्पीटलला नका देऊ.

**आसिफ शेख :-**

जे आहे ते तुम्ही नियमानुसार करून घ्या. माझ्या प्रस्तावामध्ये तुम्ही दुसरा प्रस्ताव ॲड करू शकत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही तोच ठराव कायम ठेवला आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम असे करता येणार नाही. सचिव साहेब तुम्ही नियम सांगा.

**जुबेर इनामदार :-**

त्याच इमारतीचा ॲनेक्सचर तो आहे. प्रभाग कार्यालयाचा ॲनेक्सचर आहे. एक माळा आहे. फक्त त्याला कस काय नाव देता येईल. एवढ्या मोठया संताचे नाव एका माळ्याला द्यायचे आहे का. तुम्ही विरोध करा.

(सभागृहात गोंधळ )

**फरिद कुरेशी :-**

मा. महापौर मॅडम संतांचा अपमान होणार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे, ते नाव वगळून आम्ही महाराणा प्रताप नाव देत आहोत.

(सभागृहात गोंधळ)

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण हॉस्पीटलचे काम ठेकेदाराला कधी दिलेले आहे. कुठच्या साली.

**फरीद कुरेशी :-**

कधीही नाव दिले तरी ते चेंज करता येत नाही का? मा. महापौर मॅडम हि चुकीची पध्दत चालू आहे.

**अशरफ शेख :-**

त्या नावाचा वापर करू नका ही स्पेशल विनंती.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम तुमच्याकडे ठराव दिलेला आहे. ज्यांना विरोध करायचा आहे. त्यांना करू द्या. तुम्ही निर्णय द्या.

**मा. महापौर :-**

जो विषय आहे तोच करा. दुसरे नामकरण आपण नंतर करू या.

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे. आपल्या शब्दाचा आम्ही मान ठेवत आहोत.

**फरीद कुरेशी :-**

तो पर्यंत स्टेट मेन्टेन ठेवा. कोणाचेच नाव ठेऊ नका.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम एक विषयावर बोलते जनरली अशी नाव दिली जाता की ती त्या व्यक्तिशी विषयाशी संबंधीत आहेत. पंडित भिमसेन जोशी विषयी आदर आहे. भारतरत्न आहे. मराठी माणूस आहे. महाराष्ट्र भूषण आहे. सगळ मान्य आहे. परंतु त्याचे नाते कलाक्षेत्र संगीताशी होते. आपण तिथे नाव दिल माझा विरोध नाही. ते जर नाव चेंज करायचे असेल तर तुम्ही असे अनेक वैद्यकीय क्षेत्रामध्ये अनेक मान्यवर आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**मॉरस रॉड्रीक्स :-**

२००२ साली हे हॉस्पीटल पास करून घेतले जे टेंबा आहे ते टेंबाच ठेवाच असे मी सांगतो.

**ग्रिटा फॅरो :-**

मी त्यांच्या मताशी सहमत आहे. टेंबा हॉस्पीटलच नाव ठेवण्यात यावे. नावावर वादविवाद नसावा जून नाव आहे तेच योग्य आहे. ते टेंबा ह्या नावानेच ओळखले जाणार आहे. दुसऱ्या रस्त्याला पण नविन नाव दिली आहे. पण ते जुन्या नावानेच ओळखले जाते.

**भगवती शर्मा :-**

जो भी प्रस्ताव है प्रशासन के माध्यमसे लाए जाए।

**वंदना चक्रे :-**

महापौर मॅडम जुने टेंबा नाव हेच चांगल नाव आहे अशी माझी सुचना आणि विनंती आहे.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम माझी एक विनंती आहे. एवढी चर्चा झाल्यानंतर टेंबा हॉस्पीटलला आदरणीय भारतरत्न जोशी साहेबाचे जे नाव दिलेले आहे ते कायम कराव त्यानंतर मनपाच्या माध्यमातून बऱ्याच मोठमोठ्या इमारती चालू आहेत. मी सन्मा. शेख साहेबाना विनंती करते त्यांनी सुचवलेल्या नावाचा आम्ही आदर करतो. ह्यानंतर असलेल्या इमारतीला त्या सन्मा. व्यक्तिचे नाव द्यावे. व हा वाद मिटवावा आणि भिमसेन जोशीचा प्रस्ताव आहे तो कायम ठेवावा अशी मी सर्व सदस्यांच्या वतीने विनंती करते.

**फरीद कुरेशी :-**

मॅडम आपल्या परवानगीने बोलतो. सन्मा. सदस्या आसिफ शेख ह्यांनी जो प्रस्ताव आणला आहे तर तो मनपामध्ये पध्दतशीर आला आहे. माझी आपल्याला विनंती आहे. त्याच्यावर योग्य तो निर्णय घ्या.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम......................

**फरीद कुरेशी :-**

साहेब मला बोलू द्या. तुम्ही बोलताना मी मध्ये बोलतो का?

**प्रशांत दळवी :-**

मी महापौराना विचारले.

**फरीद कुरेशी :-**

तुमच्या प्रस्तावाला मी कधी मध्ये बोलतो का, जेव्हा शिवाजी महाराजांसाठी मी नाव दिल त्या वेळेला सपोट करायला तुम्ही कोणी आले नाहीत.

**प्रशांत दळवी :-**

तुम्हाला हे कळत नाही तुम्ही ज्या विषयावर बोलता तो "ज" चा प्रस्ताव चुकीचाच आलेला आहे.

**फरीद कुरेशी :-**

तुम्ही निर्णय घ्यायचा आहे का? सभा कोण चालवते. मा. महापौर मॅडम त्याच्यावर निर्णय घेतील. धार्मिक विषयावर राजनिती करायची असेर तर बोला, हा सेक्यूलर विषय आहे. ह्याच्यावर राजनिती झाली नाही पाहीजे म्हणून मी बोलतो. माझे स्पष्ट मत आहे की, आसिफ शेख ह्यांचा जो प्रस्ताव आहे त्याच्या वर योग्य तो निर्णय घ्या. नविन नाव सुचवले ते देण्यात यावे अन्यथा हा प्रस्ताव स्थगिती मध्ये आणा. त्याचा स्टेटस किंवा मेन्टेन करा आणि जुन जे नाव होत टेंबा हॉस्पीटल तेच ठेवाव ही विनंती आहे. ह्या कारणामुळे कोणत्याही समाजाच्या मनाला किंवा समाजाला जो त्रास आहे किंवा दुःख होणार आहे ते होणार नाही.

सेक्यूलर यान जो ह्या मिरा भाईंदर शहराचा आहे तो कायम राहावा अशी माझी विनंती आहे. त्याच्यावर रूलिंग देताना आपण दक्षता घ्यावी.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम आपण ह्या सभागृहामध्ये विषय आणला होतो आणि सभागृहाने मान्यता दिली होती. भारतरत्न पंडित भीमसेन जोशीच्या नावाची त्यानुसार बांधकाम विभागामार्फत पाटी लावण्यात आलेली आहे. आपण त्या हॉस्पीटलला टेंबा हॉस्पीटलच संबोधतो. परंतु ह्या सभागृहाने त्या हॉस्पीटलच पंडीत भीमसेन जोशी असे नामकरण केले त्यानुसार प्रशासनाने कारवाई करून फलक लावण्यात आलेले आहे असे असताना "ज" च्या प्रस्तावाखाली असे विषय आणावे. हा चुकीचा प्रकार आहे किंवा नाही आणि त्याच्यामध्ये वाद घालून देणे उद्या इंदिरा गांधी हॉस्पीटल मिरारोड मध्ये आहे. पुढच्या वेळेला आम्ही टाकतो. त्या ठिकाणी मा.बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात यावे चालेल का आहे, हे सत्य आहे का. प्रशासनाने स्पष्ट केलेले आहे. खांबीत साहेबांनी ते नाव ऑलरेडी दिलेले आहे. सन्मा. सदस्य शेख यांनी सुचवलेले नाव जे आहे ते त्यांचे म्हणणे आहे की त्यांनी अगोदर दिल होत म्हणून. तर प्रशासनाने स्पष्ट कराव की अगोदर दिल होत की नंतर चेंज केल. तसं पण नाही आहे. आणि अस नसताना उगाच वाद का निर्माण करता. आम्हाला कुठल्याही धार्मिक याच्यामध्ये जायच नाही आहे. आम्हाला वाद घडवून आणायचा नाही. परंतु जे नाव ऑलरेडी आहे, दिलेले आहे प्रशासन मंजूर करते आणि जी सभागृहाची मान्यता दिलेली आहे. आणि परत याच्यामध्ये वाद निर्माण करण हे बरोबर नाही. आमचा विरोध नाही या नावाला. परंतु जे होत तेच कायम रहाव अशी माझी इच्छा आहे आणि मी तुम्हाला विनंती करतो.

**भगवती शर्मा :-**

जैसे आसिफ शेख साहब ने जो मुद्दा बोला, उनकी भावना अच्छी थी। पहले भी नाम बदले गए है, लेकिन इसमे कोई वाद न हो इसके लिए नाम बदलने में समस्या होती है। तो सभी नाम छोडकर जो मॉरस शेठने बोला है टेंबा हॉस्पीटल सबकी भावना यही है। यह वाद का विषय न बने सुखद वातावरण के अंदर विषय खतम होगे।

**अशरफ शेख :-**

मॅडम आपकी परवानगीसे अभी शर्मा जी ने कहॉ उनकी बात से मै सहमत हूँ। हमारा जो ठराव था उस ठराव को इन्होने विरोध करना या तो उसका नाम टेंबा हॉस्पीटल ही रखा जाए।

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम सन्मा. सदस्य भगवती शर्मा व फरीद कुरेशी ह्यांनी जी सुचना दिलेली आहे. त्या प्रमाणे रूलिंग देण्यात यावे.

**भगवती शर्मा :-**

आसिफ शेखजीने प्रस्ताव दिया था। ठराव किया था। अभी उन्होने कहॉ मैने जो बोला, अशरफ जी ने बोला है, मॉरस शेठने बोला है। वही हमारी भावना है। उसी हिसाबसे उसको मंजूर किया जाए।

**राजेंद्र जैन :-**

वरीलप्रमाणे तक्त्यात दर्शविलेल्या जाहिरात फी चे दरास या ठरावाच्या दिनांकानंतर भविष्यात सर्व प्रकारच्या जाहिरात माध्यमांना परवानगी (मनपाच्या अथवा खाजगी जागा इमारती फिरत्या जाहिराती इ. देण्यात येत असताना सदर ठरावातील दराप्रमाणे जाहिरात फी आकारण्यात यावी अशी मान्यता ही सभा देत आहे. नविन दर १/०८/२०१४ पासुन आकारण्यात यावे असा ठराव मांडत आहे.

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये आपण दोन जाहिरात करतो. एक प्रायव्हेट आणि एक निविदा द्वारे आपण तेच रेट ठरवले होते. १० रु. प्रायव्हेटला द्यायचे आणि निविदाचे पण १० रु. ठरवले होते. पण निविदा मागवताना तो रेट १०० रु. आले. १० वर्षापासून ते रेट आता २०० रु. पर्यंत पोहोचले. आपण निविदा मागवतो तर बेस प्राइज २०० रु. प्रमाणे सुरु करावे लागते. एक एक्झाम्पल म्हणून अमाऊंट देतो. पण जो डायरेक्ट येतो की मला एकच होर्डिंग्ज लावायचे आहे. त्याला १० रु. फुट मग हे २०० रु. ज्याला आपण देतो तो कसा देणार हा १२ विकून टाकतो. तो २०० ला घेतो. जुन्या आपण जाहिराती बघितल्या तर स्वखुशीने आता कोणी

गेल आणि उदा. नगरसेवक गेले आणि त्यांना सांगितले जाहिरात लावायची आहे. २०x१० ची तर तो बोलेल चार हजार रु. आणि जो निविदा घेईल त्याला बोलतील अटिशर्ती कर करारनामा कर एक करोड रु. डिपॉझीट भर आणि तूला आठ हजार भरायला लागतील. हा जो डायरेक्ट येतो तो प्राईम लोकेशनवर होर्डिंग्ज लावतो बाकी गल्लीत लावत नाही. आपण ज्या निविदा काढतो, इंद्रलोक रोड, बांग्लादेश रोडवर, बांग्लादेश शब्द मागे घेतो उत्तन रोडवर अशा ठिकाणी जाहिराती दिल्या जातात. निविदा काढताना आपल्याला रेट व्हॅल्यू जास्त आला पण जुन्या रेटवर कोणी लक्ष दिले नाही म्हणून १० रु. चे आहे त्याप्रमाणे हे सगळ चालत होत रिलायन्स बरोबर मी महापौर असताना चर्चा झाली आपल्याला ऑप्शन दिल की ५०-५० टक्के घेऊ या. रिलायन्सला आपण करारनामा केला होता की तुम्ही करा आणि आम्हाला अर्धे पैसे द्या असे ठरले होते पण नंतर ठरावात काय झाल मला माहित नाही. आता रिलायन्स पाहिजे तसे होर्डिंग्ज लावतो. आम्ही करारनामा केला आहे. तुला जेवढे पाहिजे तेवढे लावून मोकळे करा व पैसे भरा तो आपल्या मनमानी प्रमाणे कधी १०० आणि तेही नाही त्याचे विकले तर पैसे देणार एखादा होर्डिंग्ज ब्लँक आहे तर आम्हाला पैसेच देत नाही. आता अधिकारी साहेब बोलतात मार्चमध्ये किती झाले तर आम्हाला माहित नाही आणि पैसे किती देतो फक्त ३०० रु. ॲन्ड हीज सेलिंग फॉर ७०००/- मी माझ्या स्कूलसाठी घेतल तेव्हा ७०००/- भरले. आपल्या करारनाम्याप्रमाणे त्यांनी भरायला पाहिजे. एका बाजूला ३० फुट एका बाजूला २० फुट ४० म्हणजे रेट काय झाला. २०१४ ला मुदत संपली आहे. त्यापेक्षा मनपा दोन पोलच्या मध्ये सेंटरला परवानगी दिली तर १० टाईम रेव्हेन्यू इन्क्रीज होईल. ७००० कुठे आणि ३०० कुठे इट व्हिल गो अप टू २० टाईम इन्क्रीज हा मोठा फरक होता. आता मार्केटमध्ये तोच प्रॉब्लेम झालेला आहे. निविदाप्रमाणे प्रोसेस केली अटीशर्ती तीन वर्षाचा अनुभव पाहिजे हे पाहिजे ते पाहिजे त्याला ८०००/- आणि एखाद्याने सांगितले मला दहा होर्डिंग्ज लावायचे आहेत तर चार हजार प्रमाणे घेऊन लावून टाका. म्हणजे एका शहरात दोन रेट कसे होऊ शकतात. त्यासाठी बदल केला आहे. ह्या शहरात ५० होर्डिंग्ज असे दिले आहेत जे फक्त पर्यावरणाचे डिस्क्रीप्शन असेल सगळीकडे वेगळेवेगळे आता पाऊस आला तरी तेच उन्हात पण तेच आणि थंडीत पण तेच असेल आणि अर्धे होर्डिंग्जवर लावलेलेच नाही. त्यांना आपण सबसीडी रेटवर दिलेले आहे ज्या होर्डिंग्जचा रेट ३००००/- रु. असायला पाहिजे त्या होर्डिंग्जला फक्त ५०००/- रु. दिले आहे. २५०००/- रु. सबसीडी त्यावेळचे २००८ ला किंवा २००७ ला दिले गेले ह्या १० वर्षात अनेक तफावत आली ना. आपण कधी बघितलक नसेल आता अधिकाऱ्यांनी बघायला जाऊन सगळीकडे वेगळेवेगळे भेटणार. एकच ठेकेदार एक ठिकाणी वेगळ एक ठिकाणी वेगळ पावसात पण तेच उन्हात पण तेच म्हणजे ही परिस्थिती आहे. हे कुठेतरी एक इनफॉर्मिटी व्हाव मनपाचे आर्थिक नुकसान होऊ नये. ज्या लोकांनी निविदा प्रक्रिया प्रोसेस करुन निविदा प्रमाणे टेंडर घेतले आहे. त्यांनी पण मनपात टिकाव. ब्राईट एडव्हटायझींगवाला भाईंदरमध्ये येतच नाही तो निघूनच गेला तो बोलतो एका ठिकाणी चार हजार दुसरीकडे ८०००/- इनफॉर्मीटी व्हाव ह्यासाठी प्रस्ताव आणला आहे. आता आपण निविदा मागवली होती बिफोर थ्री मन्थ त्यामध्ये जे रेट आले ज्याने आता निविदा घेतली तो पुढे येईल त्याच्यापेक्षा एक रु. जास्त झाला पाहिजे कमी येऊन कसे चालेल.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो महासभेने २००८ मध्ये जाहिरातीच्या दराबाबत ठराव केला होता. त्याप्रमाणे प्रशासन २००८ पासून दर आकारुन विविध होर्डींग किंवा जाहिरातीचे जेवढी काही माध्यम आहेत त्यानुसार दर आकारुन मनपा महसूलात त्यांचा भरणा करण्यात येतो. ह्यामध्ये २-३ वर्षांनी निविदा येत असतात. त्याची मुल्याधीक रक्कम ही ठरवली जाते. आणि जी दरवर्षी त्यात १० टक्के वाढ होते. त्या अनुषंगाने २००८ पासून २०१३ पर्यंत समजा १० टक्के वाढ केल्यामुळे जाहिरातीच्या दरामध्ये फरक पडलेला आहे. तथापि आपण खाजगी संस्था किंवा इमारती त्यावर २००८ चे दर आकारण्यात येतात. कारण ठरावामध्ये कुठेही नमूद नव्हत की, त्यांना १० टक्के वाढ करायला हवी. आपण त्याला ऑफसीट व्हॅल्यू म्हणतो. ती ऑफसीट व्हॅल्यू त्याच्यात कन्सीडर केली गेली नाही. २००८ च्या दरानुसार त्यांना परवानगी देण्यात येते. दराबाबत थोड कॅल्क्युलेशन करायला लागेल त्यानंतर सांगू शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठरावामध्ये असे नमूद केले आहे की, जे रेट वाढवले आणि जुने कॉन्ट्रॅक्टर कोर्टामध्ये गेले आणि त्यांनी स्टे आणला तर परत हा वाद कोर्टात जाईल.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

ज्यांच्या सोबत करारनामे करण्यात आले त्या बरोबरच हा वाद निर्माण होऊ शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याच्यानी काय होईल.

**नरेंद्र मेहता :-**

त्यामध्ये आम्ही सांगितले ज्यांनी निविदा प्रक्रिया करुन पूर्ण करुन त्यांनी २००० ला का घेतले नाही त्याचा करारनामा आपण रद्द करु नका परंतु ज्याची कधी निविदाच मागवली नाही परस्पर आपण कोणाला १५ वर्ष कोणाला ८ वर्ष, कोणाला १० वर्ष, कोणाला ३० वर्ष दिले आहे. आम्ही त्याला एक्सेप्ट करणार नाही. काही तरी मर्यादा आहे. कारण त्याचा बेसरेट काय, आता १० टक्के वाढ झाली नाही ज्यावेळी तुम्ही नवीन जाहिरात मागवली बेसरेट ठरवल होते १० रु. फुट तुम्ही आता मागवले किती ३० रु. फुटनी मग २० रु. फुट का

वाढवले. १०.१० टक्के केले असते तर १२० पर्यंत आल असत. परंतु तुम्ही डायरेक्ट वाढवले. कारण मागचा रेट आला त्याप्रमाणे धरल. आता जे काही खाजगी होर्डिग्जमध्ये रेट प्राप्त होतात ते तर तुम्हाला मान्य आहे ना की ते निविदापेक्षा कमी आहेत. निविदावाला ह्या शहरात जगू शकत नाही. मॅडम त्यांनी एक्सपिरीयन्स आणायच, ३ करोडचे टर्न ओव्हर आणायची, १ करोडची बँक गॅरेन्टी द्यायची आणि निविदा प्रोसेस फॉलो करायची त्याला ८ हजार रुपये आणि प्रायव्हेट व्यक्ति त्याला ४ हजार रू. हे कसे एकाच पालिकेत चालेल. करारनाम्यावाला राहिला तर निविदावाला कोर्टात जाईल किंवा हा म्हणेल मला नकोच आहे. ह्या शहरात बाहेरची लोक आली पाहिजेत त्यांनी कॉम्पीटेशन केल पाहिजे शहराच उत्पन्न वाढल पाहिजे. एक ४ ला घेई, एक ८ ला घेईल. तो बोलेल मला प्रायव्हेट द्या हे मनपाचे ठेवा असे होईल.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर करत आहे.

**प्रकरण क्र. :- २५**

सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र एल. मेहता यांचा दिनांक १०/०७/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये लावण्यात येणाऱ्या जाहीरातींचे सुधारीत दर ठरविणेबाबत.

**ठराव क्र. :- २७**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४, २४५, ३८६ आणि ३९२ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम-२००३ अन्वये जाहिराती व आकाशचिन्ह इत्यादीवर नियंत्रण करण्याची तरतुद आहे. त्या अनुषंगे मिरा भाईंदर क्षेत्रातील जाहिरातीच्या (विविध भागात होर्डिग्ज (आकाशचिन्ह), कमानी, व्यापारी आस्थापनेवरील जाहिराती, दुकानांवरील जाहिरात फलक व अन्य प्रकारच्या जाहिराती) वाढ होण्याच्या दृष्टीने मा. स्थायी समिती ठराव क्र. ४३, दि. २९/०२/२००८ व मा. महासभा ठराव क्र. ३५, दि. १९/०३/२००८ अन्वये जाहिरात फी चे दरपत्रकास मंजुरी देण्यात आली होती. यानंतर जाहिरातीचे दर वाढविण्यात आलेले नाहीत. याकरीता मा. स्थायी समिती सभा दि. ११/०७/२०१४ प्र.क्र. २८ ठराव क्र. २८ जाहिरात प्रकरण मध्ये दरवाढीस मंजूरी दिलेली आहे. ती पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | जाहिरातीचे प्रकार | प्रस्तावित दर |
|---|---|---|
| | | प्रति चौ. फुट प्रति महिना |
| १ | दिव्याचे खांबावरील फलक (किऑस्क) प्रदर्शित दर्शनी आकार | रु. ६०/- |
| २ | आकाशचिन्ह (होर्डिग्ज) मनपा जागेत निविदा प्रक्रियाद्वारे | रु. ४०/- |
| ३ | आकाशचिन्ह (होर्डिग्ज) व्यक्तिगत / खाजगी संस्था यांना मनपा जागेत किंवा सार्वजनिक रस्तालगत | रु. ६०/- |
| ४ | खाजगी जागा / इमारत जाहिरात इ. ठिकाणावरील आकाशचिन्ह (होर्डिग्ज) | रु. ३०/- |
| ५ | कमानी (कायम स्वरुपी मनपाच्या जागेत) दिशादर्शक बंधनकारक आहे. | रु. ६०/- |
| ६ | कॅन्टीलिव्हर पोल (प्रकाशित होर्डिग्ज) मनपाच्या जागेत किंवा रस्तालगत | रु. ६०/- |
| ७ | प्रदुषण व वातावरण नियंत्रण दर्शक फलक व जाहिरात फलक (होर्डिग्ज) | रु. ४०/- |

१. वरील जाहिरात फी दर हे फक्त अप्रकाशित जाहिरात फलकासाठी असून प्रकाशित जाहिरात फलकासाठी एकूण फी च्या २० % जादा फी आकारण्यात येईल.

२. फक्त खाजगी जागेतील होर्डिग्ज यांना जाहिरात फी च्या २० % कमी दराने जाहिरात फी आकारण्यात येईल.

३. महानगरपालिकेने निविदा न मागवता ज्या होर्डीग्जला परवानगी दिलेली आहे. त्या सर्व होर्डिग्जची परवानगी रद्द करुन विभागाने त्याबाबतच्या नविन निविदा प्रसिध्द कराव्यात किंवा नविन दरा प्रमाणे पैसे आकारावे.

४. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमामधील सर्व बस तसेच बस थांबे याबाबतच्या निविदा जाहिरात विभागामार्फत मागविण्यात याव्यात.

५. जाहिरात ठेकेदारांबरोबर होणारे सर्व करारनामे मा. स्थायी समिती समोर सादर करावेत. या करारनाम्यांनी मा. स्थायी समितीची मंजूरी घेतल्यानंतर संबंधित विभागाने करारनामे अंतिम करावे.

६. मिरा भाईंदर महानगरपालिका व मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे बरोबर विद्युत पोलवरील किऑस्क याबाबत केलेला करारनामा रद्द करण्यात यावा व दोन विद्युत पोलच्या मधील जागेत नव्याने जाहिरात पोल उभारुन त्यावर जाहिरात करण्याच्या निविदा मागविण्यात याव्यात. या पोलच्या उभारणी करिता येणारा खर्च निविदाधारक / ठेकेदार यांनी करावयाचा आहे.

७. ज्या होर्डिग्ज कॅन्टीलिव्हर / कमानी यांचा प्रथम कालावधी संपला / संपत असेल अशा सर्व जाहिरात माध्यमांना मुदतवाढ न देता त्याबाबतच्या नविन निविदा प्रसिध्द करण्यात याव्यात.

८. पर्यावन दिशा दर्शवता जाहिरात होर्डिग्ज करारनामा रद्द करावे.

वरीलप्रमाणे तक्त्यात दर्शविलेल्या जाहिरात फी चे दरास या ठरावाच्या दिनांकानंतर भविष्यात सर्व प्रकारच्या जाहिरात माध्यमांना परवानगी (मनपाच्या अथवा खाजगी जागा इमारती फिरत्या जाहिराती इ. देण्यात येत असताना सदर ठरावातील दराप्रमाणे जाहिरात फी आकारण्यात यावी अशी मान्यता ही सभा देत आहे. नविन दर १/०८/२०१४ पासुन आकारण्यात यावे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदन :- श्री. दिनेश जैन**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**सही /-**
**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २६, सन्मा. सदस्या श्रीम. गिता भरत जैन यांचा दिनांक १४/०७/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमधील झोपडपट्टीमधील नागरिकांना मुलभुत सेवा / सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.

**गिता जैन :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टया, चाळीमध्ये राहणा-या रहिवाश्यांना पालिका प्रशासनाकडून मुलभूत सेवा दिल्या जात नसून, प्रशासनाकडून अशा वस्त्यांकडे मुलभुत सेवेबाबत दुर्लक्षित व निष्काळजीपणा होत आहे. या नागरिकांना मुलभुत सेवा देणेकरीता पुढीलप्रमाणे ठराव सर्वानुमते मांडण्यात येत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये जे अनधिकृत बांधकाम केली जात आहे. अशा बांधकामांवर महानगरपालिका शास्तीसह कर आकारणी करीत आहे. त्याचप्रमाणे ज्या नागरीकांनी झोपड्या/ चाळी यांचे अनाधिकृत बांधकाम केलेले आहे अशा घरांना मालमत्ता कराची आकारणी करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अंतर्गत अनधिकृत बांधकामांवर आकारण्यात येणारी शास्ती कराची आकारणी झोपडपट्टीधारकांवर करावी. झोपडपट्टी/चाळ अशा वस्त्यांमध्ये प्रत्येक नागरिकाला नळ कनेक्शन महानगरपालिकेस देणे शक्य होणार नाही. याकरिता पाणीपुरवठा विभागाने ज्या ठिकाणी अशा वस्त्या आहेत त्यांचे सर्व्हेक्षण करून त्यांना कमीत कमी पिण्याच्या पाण्याकरीता ग्रुप कनेक्शन किंवा सार्वजनिक नळ कनेक्शन (Stand Post) मंजुर करावे. महानगरपालिका क्षेत्रामध्ये ज्या ठिकाणी झोपडपट्या व चाळींचे बांधकाम झालेले आहे अशा ठिकाणच्या मालमत्तांचे हस्तांतरण करणे करीता त्यांच्यामध्ये झालेले खरेदी विक्रिचे करारनामे/प्रतिज्ञापत्रे ग्राह्य धरून मालमत्तांचे हस्तांतरण करण्यात यावे. व महानगरपालिकेने नियमानुसार ठरविलेली फी घ्यावी. झोपडपट्टया व चाळीमध्ये वीज कनेक्शन देणेकरीता बांधकाम विभागाने त्यांना नाहरकत प्रमाणपत्र द्यावे. झोपडपट्टया व चाळीमधील नागरीकांकरीता महानगरपालिकेने प्राथमिक आरोग्य केंद्र/रूग्णालय सुरू करून वैद्यकिय सेवा सुविधा उपलब्ध करून दयाव्यात. झोपडपट्टया व चाळीमधील नागरीकांकरीता ज्या ठिकाणी शौचालयाची व्यवस्था नाही अशा ठिकाणी सुलभ शौचालयाची व्यवस्था करावी. याकरीता बांधकाम विभागाने सुलभ शौचालय बांधण्याकरीता प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर करावेत. तसेच ज्या ठिकाणी सुलभ शौचालये नादुरूस्त आहेत अशा ठिकाणाची सुलभ शौचालयांची तातडीने दुरूस्ती करून घ्यावी. महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध झोपडपट्टी वसाहती मध्ये तेथील नागरीकांना रस्ते व स्ट्रीट लाईटची व्यवस्था करीत आलेले आहेत. याकामी महानगरपालिकेने मोठ्या प्रमाणात निधी खर्च करीत असते. उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने त्यांच्या मुळ समस्या सोडविण्यास मदत होत असल्याने या ठरावात सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे

**अनिल भोसले :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम ह्या शहरात आपण शहरी भागात पाण्याचे कनेक्शन बंद केले आहेत आणि स्लममध्ये पण बंद केले आहेत. पाणी आपल्याकडे नाही म्हणून बंद केले आहेत. शहरामध्ये लोक टॅकरनी पाणी मागवतात स्लममध्ये राहणाऱ्या लोकाकडे काय ऑप्शनच नाही. त्यांना मनपाकडून ग्रुप कनेक्शन बंद आहे. लिगल झोपड्या असू द्या ९५ पूर्वीच्या असू द्या किंवा इत्तर असू द्या. कोणालाही कनेक्शन दिले नाही. पाणी ही मुलभूत सुविधा आहे. जास्तीत जास्त रोग पाण्यामुळेच पसरतात आपण त्या स्लममध्ये मलेरीया, कधी ब्लड चेक अप, कधी डेंग्यू टेस्टला जातो. पोलिओला जातो त्यासाठी लाखो रु. खर्च करतो. प्यायला पाणी मागवता तर ते आमच्याकडे नाही. त्याचा वेगळा पध्दतीने विचार करा आपले १३० टॅंकर डेली इकडन सर्व सोसायटीमध्ये जातात. तर ३ टॅंकर ह्या स्लमसाठी देऊ शकतो. माझी सभागृहाला विनंती आहे की त्यांना कनेक्शन द्यायचा निर्णय होत असेल तर उत्तम ते होत नसेल तर कमीत कमी टाईम बिईंग आय ॲम नॉट सेईंग परमनन्ट स्टॅंड पोस्ट लावा. जेणेकरुन गरिब गरजू लोक पिण्याचे पाणी एक कळशी, एक हंडा तरी घेऊन जाऊ शकतील आणि रोग कमी होतील. ह्यामध्ये मा. आयुक्तांनी स्वतः अधिकारात निर्णय घेतलेला कनेक्शन बंद करायच. आपल्या महासभेचे किंवा सभागृहाचे धोरण ठरल नव्हत. जेवढी लोकसंख्या आहे त्याप्रमाणे आपल्याकडे शौचालयासाठी जागा उपलब्ध नाही. काही ठिकाणी सॉल्टवाल्यांचा प्रॉब्लेम आहे.

कस्टमवाले आपल्याला करु देत नाही. आज परिस्थिती बघा आम्ही मा. आयुक्तांना फोटो दिले. ५० टक्के शौचालयाचे दरवाजे तुटले आहेत. काही एवढी घाण असते की, पावसाळ्याच्या दिवसात कोणी जाऊ शकत नाही. आपल्यासारखे कोणी गेले तर तिकडे दोन मिनटे उभे राहू शकत नाही ही परिस्थिती आहे. ३८ करोडचे आपले साफसफाईचे टेंडर आहे त्याच्यावर कोणी लक्ष देत नाही. स्लम काय दुसऱ्यांनी साफ करायचे नाही आहे. पण त्यांना साफसफाई पण नाही त्यामुळे सगळे रोग पसरतात. आपण ओपीडी चालू करतो. आजही आपण हॉस्पीटलचा निर्णय घेतो. गरिबांसाठी श्रीमंत लोक त्याच्यात कमी येणार म्हणजे रोगही आम्ही द्यायचे आणि उपचारही आम्ही द्यायचे अशी प्रथा चालू आहे. जेवढी लोकसंख्या आहे त्याप्रमाणे शौचालय करा. संस्था बांधायला तयार आहे म्हणजे तिकडे मनपाला खर्च करायचा नाही यू टेक ओन्ली प्रायोरिटी. कुठेतरी भांडून त्यांना बांधून द्या. ५० टक्के दरवाजे तुटले आहेत. पाणी नाही, दरवाजा आहे. तर पाणी आहे तर दरवाजा नाही. साफसफाई तर तिकडे तुम्ही जाऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. सेफ्टी टँक तर ओव्हर फ्लो होऊनच बाहेर आहे. त्या परिस्थितीत ते जगतात आणि सर्व टॅक्स पण भरतात. मॅडम हाऊस टॅक्सवर मा. आयुक्तांनी निर्णय द्यावा, नविन कर आकारणी करावी ही आमची मागणी आहे. त्यावर टेक्नीकली बाबी तपासून घ्या पण जुन्या लोकांनी एखादा लोन घेतो घर विकून येतो, शेती करतो किंवा त्या भागात झोपडी विकत घेतो त्याचे नाव आपण ट्रान्सफर करत नाही. नाव ट्रान्सफर करायला काय प्रॉब्लेम आहे. मॅडम जो विकून जातो तो १० वर्षांनी ह्या व्यक्तीला झोपडी बहाल करणार सही करणार. आपण बी.एस.यू.पी. योजना बोला, राजीव गांधी आवास योजना बोला त्यावेळी हे सह्या करतील का? कोणी सह्या करणार नाही मग सांगतील ५ लाख द्या, १० लाख, २० लाख द्या. आपण त्या लोकांना घर देणार नाही आणि मूळ मालकांना घर देणार टॅक्स ट्रान्सफर करायला काय ऑब्जेक्शन आहे. ऑलरेडी कर आकारणी केलेली आहे. शहरी भागात कोणी फ्लॅट बांधला त्याला शास्ती लावून कर लावतो. उत्तन भागात कर लावून तुम्ही शास्ती लावता ना. मा. महापौर मॅडम बिल्डींगमध्ये एखादा फ्लॅट लावला इनलिगल आपण शास्ती लावून त्याला कर आकारतो आणि ह्याला १०० कायदे झोपडीवाल्यांना तुम्ही बांधतानाच कारवाई करा. बांधल्यानंतर सुविधा तर द्या. फ्लॅट बांधल्यावर तीनपट शास्ती लावून मोकळा. झोपड्यांनी बांधल तर त्याला कोणतीही शास्ती, टॅक्स नाही त्यांनी मनपात चक्रा मारत रहायच. कमीत कमी टॅक्स ट्रान्सफर हा कुठल्याही प्रकारे इनलिगल नाही. एकानी विकल दुसऱ्यांनी घेतल दोघ तुम्हाला हमी पत्र देतात. तर तुम्हाला बदल करायची काय प्रॉब्लेम आहे. नावात तर बदल करा. त्यांना तेवढी रात्री झोप येईल की माझ घर माझ्या नावावर आहे. उद्या माझ झोपड तुटल तरी मला घर भेटणार आहे. त्याच्या नावावर नसेल तर तो किती चिंतीत असतो तुम्हाला जास्त माहित आहे. मा. आयुक्त महोदय पाणी कनेक्शन, नावात टॅक्स ट्रान्सफर, शौचालय या तीन कामामध्ये मला वाटत नाही मनपाला कुठे अडचण निर्माण व्हायला पाहिजे. नविन कर आकारणीबाबत आपण निर्णय घ्या, विज कनेक्शनमध्ये काय करता येईल त्याचा मार्ग सोडवा अशी सभागृहाला विनंती राहील. मा. महापौर मॅडम, ह्याच्यावर आज रुलिंग द्या.

**मिरादेवी यादव :-**

मा. महापौर मॅडम गिता जैनने विषय जो लिए यह विषय मिरा भाईंदर का पूरे स्लम एरिया का विषय है। मिरा भाईंदर में लिगल बिल्डींग है, उसमें और इनलिगल है उसमें भी सारी सुविधा दि जाती है। झोपडपट्टी के लिए कोई सुविधा नहीं है। उनको टॅक्स लगाया जाए। उनको लाईट पानी की सुविधा दी जाए। टॅक्स लगाया तो मिरा भाईंदर महानगरपालिका को फायदा होगा। उसपे ध्यान दो ऐसी विनंती है।

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चाळी, वस्ती व झोपडपट्टी मध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांना पालिका शासनाकडून मुलभूत सेवा पूर्णपणे दिल्या जात नाहीत. प्रशासनाकडून नेहमीच अशा वस्त्यांकडे मुलभुत सेवेबाबत दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. या नागरिकांना मुलभुत सेवा देणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे.

या रहिवाश्यांना द्यावयाच्या मुलभुत सेवा-सुविधा खालीलप्रमाणे आहेत.

१) सर्व झोपडपट्ट्यांमध्ये पाण्याची बिडाची जलवाहिनी टाकणे.

२) झोपडपट्टीमध्ये / चाळी व वस्त्यांमध्ये ग्रुप पाणी कनेक्शन देणे तसेच जोपर्यंत ग्रुप कनेक्शन देत नाही तोपर्यंत महानगरपालिकेमार्फत टँकरने पाणी पुरवठा करणे.

३) ना दुरुस्त झालेल्या झोपडपट्टी वासियांना मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर १४ फुट उंची करणेबाबत परवानगी देणे.

४) झोपडपट्टीवासीयांना शासन नियमानुसार कराची आकारणी करणे.

५) मालमत्ता कराचे हस्तांतरण करणे.

६) केंद्र शासनाच्या नियमानुसार जो नागरिक विज कनेक्शन करिता अर्ज करील त्यांना ३० दिवसाच्या आत विज कनेक्शन देणे.

७) झोपडपट्ट्या, वस्ती आणि चाळीमध्ये आरोग्य केंद्र उभारणे, उत्तम वैद्यकिय सेवा पुरविणे व दारिद्र्य रेषेखालील रहिवाश्यांना मुफ्त वैद्यकिय सेवा पुरविणे.

८) सुलभ शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देणे. तसेच शौचालयाच्या नियमित साफसफाई करिता सफाई कामगार ठेवणे व नादुरुस्त असलेल्या शौचालयाची तातडीने दुरुस्ती करुन घेणे.

९) सी.सी. रस्ते, दिवाबत्ती व गटारांची सुविधा उपलब्ध करुन देणे.

१०) झोपडपट्टी वासी तसेच गावठण मध्ये असलेल्या घरांना दुरुस्ती परवानगी देणबाबतच्या अटीशर्ती शिथिल करणे.

११) समाज मंदिर उभारुन देणे.

१२) झोपडपट्टी धारकांना फोटोपास देणे.

उपरोक्त सेवा-सुविधा झोपडपट्टी वासियांना पुरविण्याचा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही जे तीन मुद्दे माडले की, कर आकारणीला आपल्याला काय प्रॉब्लेम नसला पाहिजे. शौचालय बांधायला काय प्रॉब्लेम नसला पाहिजे. ग्रुप कनेक्शन किंवा स्टँन्ड पूल तस करता आल तर चांगल आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सिटी इंजिनिअरला ऑलरेडी सांगितले आहे की, परवा जो मोर्चा आला होता त्याबद्दल ८-१० दिवसात सर्वेक्षण करुन दुरुस्ती कामास सुरुवात करा. पाण्याच्या बाबतीत नव्याने मुद्दा मांडला. टँकर देण्याचे ती बाब तपासतो २०१२ नंतर नळ कनेक्शनचा विषय तुम्हाला माहित आहे. १३० टँकर दिले जात असतील तर निश्चित पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी आपली आहे. त्या भागात लोक झोपडपट्टीत राहतात तिकडे पाणी पुरवठा केला जातच असेल. त्याशिवाय ती लोक तिथे राहत नाही. मिळकत हस्तांतराबाबत तुमच्या म्हणण्याप्रमाणे ज्या झोपडीला टॅक्स आहे ह्यांचे म्हणणे आहे सेलडीड शिवाय ट्रान्सफर करता येत नाही. त्याच्यासाठी रजिस्टर डॉक्यूमेंट पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

जसे फ्लॅटला करायला रजिस्टर्ड मागतो. ज्यावेळी लावले न रजिस्टर्ड मागितले नाही. आता देणारा तुमच्या समोर येतो. हमीपत्र देतो, फोटो पास देतो. रजिस्टर्ड होत नाही. करायचे कसे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

ज्यावेळी झोपडीला टॅक्स लागलेला आहे. तर ते ट्रान्सफर करण्याच्या दृष्टीने काय स्कोप आहे का? ती गर्व्हमेंट प्रॉपर्टी आहे, गर्व्हमेंट प्रॉपर्टी सेल करायला त्यांना अधिकार नाही. म्हणून त्यांची अडचण होत असेल. जमिन गर्व्हमेंट असल्यामुळे विक्रीचा प्रश्न निर्माण होतो.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब लावताना प्रश्न आला नाही ना, आता नविनला लावणार का?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

हा मुद्दा कायदेशीर तपासतो.

**नरेंद्र मेहता :-**

कायदेशीर तपासण्यापेक्षा देणारा व्यक्ति घेणारा व्यक्ति हे दोघ हमीपत्र देतात. आयदर तुम्ही त्यांना पत्र द्या. रजिस्टर्ड करा व आम्ही आमच्या प्रमाणे कर आकारणी केलेली आहे. योग्य आहे त्यांचे रजिस्टर्ड करा तसे रजिस्टरला पत्र द्या. मग ते रजिस्टर्ड करुन आणतील.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सरकारी जमिनिवरती बेसीकली गर्व्हमेंट लॅन्ड सबरजिस्टर डॉक्यूमेंट करणार नाही. हा महत्वाचा मुद्दा आहे. ह्याच्यात असे मॅटर आहे की, गर्व्हमेंटनी निर्णय घेतला की, वरचे जे स्ट्रक्चर आहे त्याच्याबाबत गर्व्हमेंटनी पूर्वी निर्णय घेतला त्याच्यामध्ये आपण चेक करु.

**नरेंद्र मेहता :-**

मग तसे करा. काही झोपड्या ट्रान्सफर करायच्या असेल त्याला मनपातर्फे २०-३० ................

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

कायदेशीर बाबी तपासून करतो.

**नरेंद्र मेहता :-**

असा नियम घ्या की, ज्याच्या झोपड्या त्याला ट्रान्सफर करताना २०-२० हजार अनुदान देऊ या. आपल्या अधिकाऱ्याने किती ट्रान्सफर केले आहेत दाखवू, हे केलेले आहेत ना, ज्याने पैसे दिले ते सगळे बोलतात. ठिक आहे आमच्याकडे पूरावे नसतात. झोपड्याचे किती तरी टॅक्स ट्रान्सफर केले नाही केले तर आम्ही भाईंदर सोडू. त्या लोकांचे केले जाते. २००९ ला झोपड झाल ते २०११ ला ट्रान्सफर केले किंवा सांगा आजपर्यंत एकही झोपड ट्रान्सफर केले नाही असे सांगा.

**दिपक सावंत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, मालमत्ता हस्तांतरणाचा जो विषय आहे तो प्रभाग अधिकाऱ्याच्या अखत्यारित आहे. आणि जे कर १० चे नियम आहेत त्याच्यात पहिला नियम हस्तांतर करण्याविषयी त्याच्यात रजिस्टर डॉक्युमेंट पाहिजे असे नमूद आहे.

**भगवती शर्मा :-**

त्यांनी सांगितले झोपडे ट्रान्सफर झाले होय की नाही.

**दिपक सावंत :-**

हस्तांतर केल्यानंतर त्याची जी ऑर्डर निघते त्याच्यानंतर त्याची एन्ट्री होते. अशा ज्या ऑर्डर आहेत त्या प्रभाग अधिकाऱ्याच्या अखत्यारित आहे असे कुठलेही झालेले नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम मी आता मागवतो. ठामपणे सांगा मॅडम आपल्याला वाटते ह्या १० वर्षात एकही टॅक्स ट्रान्सफर झाला नसेल. आपणही सांगू शकत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल भोसले :-**

मा. महापौर मॅडम जनता नगर झोपडपट्टीमध्ये अनेक टॅक्स ट्रान्सफर केलेले आहेत. १० ते १५ हजार घेऊन टॅक्स ट्रान्सफर केलेले आहेत. पैसे दिले तर ट्रान्सफर होतात पैसे दिले नाही तर ट्रान्सफर होत नाही.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आमच्या विभागात बऱ्याच झोपड्या अशा आहेत की ज्या ट्रान्सफर झाले आहेत पैसे देऊन अशी कामे होतात.

**मा. महापौर :-**

तुमच्याकडे असतील तर घेऊन या त्याच्यावर आपण कारवाई करु.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आमच्या भागात दोन ठिकाणी पाणी साचले आहे. जी.सी.सी. क्लबनी तो पूर्ण नाला बूजवला. ते करु देत नाही. अनेकदा ठेकेदार गेले त्याठिकाणी चाळी बांधल्या त्याच्या राहण्यासाठी स्टाफ क्वार्टर बांधले. ते काम बंद आहे. बारकुंड साहेबांना सांगितले त्याठिकाणी यावेळी पाण्याचा निचरा झाला नाही. मागच्या वेळी सोसायटीने भिंत तोडली. १० लाखाचे नुकसान केल सिल्वर पार्कचे पाणी ह्या साईडला येते. खाली १०-२० फुटाचा पॅच राहिला. नरेश शहानी ते अडकून ठेवले आहे. तेही आपण करत नाही. त्यामुळे दोन्ही ठिकाणी पाणी साचला जातो. मा. आयुक्त साहेब नरेश शहानी केलेला पाण्याचा अडकाव आणि जी.सी.सी. ने नाला बंद केला आहे.

**मिरोदवी यादव :-**

मा. महापौर मॅडम, यह विषय पे मैंने नगरपालिका में शिकायत की, कनकीया चार नंबर प्रभाग में वहाँ भी शिकायत किया। कहीं से सुनवाई नहीं हूई, ट्रान्सफर के लिए १५-२० हजार लेते है।

**मा. महापौर :-**

मैंने बोला रुलिंग दिया की, जो अधिकारीने किया है उनपर कारवाई की जाएगी।

**नगरसचिव :-**

प्रकरण २६ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. गिता जैन, अनुमोदन श्री. अनिल भोसले. दुसरा ठराव सुचक श्री. बर्नड डिमेलो, अनुमोदन श्री. जुबेर इनामदार. श्री. बर्नड डिमेलो ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. गिता जैन ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्रीम. गिता जैन ह्यांच्या बाजूने ४१ विरोधात २६, तटस्थ ० इतकी मते पडली आहेत. श्रीम. गिता जैन ह्यांनी मांडलेला ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २६ :-**

सन्मा. सदस्या श्रीम. गिता भरत जैन यांचा दिनांक १४/०७/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमधील झोपडपट्टीमधील नागरिकांना मुलभुत सेवा / सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.

**ठराव क्र. २८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टया, चाळीमध्ये राहणा-या रहिवाश्यांना पालिका प्रशासनाकडून मुलभूत सेवा दिल्या जात नसून, प्रशासनाकडून अशा वस्त्यांकडे मुलभुत सेवेबाबत दुर्लक्षित व निष्काळजीपणा होत आहे. या नागरिकांना मुलभुत सेवा देणेकरीता पुढीलप्रमाणे ठराव सर्वानुमते मांडण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये जे अनधिकृत बांधकाम केली जात आहे. अशा बांधकामांवर महानगरपालिका शास्तीसह कर आकारणी करीत आहे. त्याचप्रमाणे ज्या नागरीकांनी झोपड्या/ चाळी यांचे अनधिकृत बांधकाम केलेले आहे अशा घरांना मालमत्ता कराची आकारणी करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अंतर्गत अनधिकृत बांधकामांवर आकारण्यात येणारी शास्ती कराची आकारणी झोपडपट्टीधारकांवर करावी.

झोपडपट्टी/चाळ अशा वस्त्यांमध्ये प्रत्येक नागरिकाला नळ कनेक्शन महानगरपालिकेस देणे शक्य होणार नाही. याकरिता पाणीपुरवठा विभागाने ज्या ठिकाणी अशा वस्त्या आहेत त्यांचे सर्व्हेक्षण करून त्यांना

कमीत कमी पिण्याच्या पाण्याकरीता ग्रुप कनेक्शन किंवा सार्वजनिक नळ कनेक्शन (Stand Post) मंजुर करावे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये ज्या ठिकाणी झोपडपट्या व चाळींचे बांधकाम झालेले आहे अशा ठिकाणच्या मालमत्तांचे हस्तांतरण करणे करीता त्यांच्यामध्ये झालेले खरेदी विक्रिचे करारनामे/प्रतिज्ञापत्रे ग्राह्य धरून मालमत्तांचे हस्तांतरण करण्यात यावे. व महानगरपालिकेने नियमानुसार ठरविलेली फी घ्यावी.

झोपडपट्ट्या व चाळीमध्ये वीज कनेक्शन देणेकरीता बांधकाम विभागाने त्यांना नाहरकत प्रमाणपत्र द्यावे.

झोपडपट्ट्या व चाळीमधील नागरीकांकरीता महानगरपालिकेने प्राथमिक आरोग्य केंद्र/रूग्णालय सुरू करून वैद्यकिय सेवा सुविधा उपलब्ध करून दयाव्यात.

झोपडपट्ट्या व चाळीमधील नागरीकांकरीता ज्या ठिकाणी शौचालयाची व्यवस्था नाही अशा ठिकाणी सुलभ शौचालयाची व्यवस्था करावी. याकरीता बांधकाम विभागाने सुलभ शौचालय बांधण्याकरीता प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर करावेत. तसेच ज्या ठिकाणी सुलभ शौचालये नादुरूस्त आहेत अशा ठिकाणाची सुलभ शौचालयांची तातडीने दुरूस्ती करून घ्यावी.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध झोपडपट्टी वसाहती मध्ये तेथील नागरीकांना रस्ते व स्ट्रीट लाईटची व्यवस्था करीत आलेले आहेत. याकामी महानगरपालिकेने मोठ्या प्रमाणात निधी खर्च करीत असते. उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने त्यांच्या मुळ समस्या सोडविण्यास मदत होत असल्याने या ठरावात सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. गिता जैन        अनुमोदक :- श्री. अनिल भोसले**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| २ | कांगणे यशवंत ठकाजी | २ | पाटील वंदना विकास | **निरंक** |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | ६ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ९ | भानुशाली वर्षा गिरीधर | ९ | भोईर कमलेश यशवंत | |
| १० | रावल भगवती जयशंकर | १० | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | |
| ११ | शाह राकेश रतिशचंद्र | ११ | रविंद्र भिमदेव माळी | |
| १२ | शरद केशव पाटील | १२ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १४ | जैन गिता भरत | १४ | पाटील सुनिता कैलास | |
| १५ | जैन रमेश धरमचंद | १५ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १६ | डॉ. राजेंद्र जैन | १६ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| १७ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १७ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १८ | सुजाता रविकांत शिंदे | १८ | मोहम्मद फरिद सिध्दीक कुरेशी | |
| १९ | मेहता नरेंद्र लालचंद | १९ | काझी रशीदा जमील | |
| २० | शाह सिमा कमलेश | २० | इनामदार जुबेर | |
| २१ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २१ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २२ | डॉ. नयना मनोज वसानी | २२ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | २३ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २४ | अरोरा दिपीका पंकज | २४ | सामंत प्रमोद जयराम | |
| २५ | मीरादेवी रामलाल यादव | २५ | प्रभात प्रकाश पाटील | |
| २६ | अनिल बाबुराव भोसले | २६ | पुजारी कांचना शेखर | |
| २७ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २८ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |
| २९ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३० | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३१ | तारा विनायक घरत | | | |
| ३२ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३३ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| ३४ | जयमाला किशोर पाटील | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | परमार अनिता भरत | | |
| ३६ | पाटील प्रणाली संदिप | | |
| ३७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | |
| ३८ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | |
| ३९ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | |
| ४० | जाधव मोहन महादेव | | |
| ४१ | केळूसकर प्रशांत नारायण | | |

**ठराव बहुमताने मंजुर.**

**सही /-**
**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

अनुसूचित २ "क" खाली सुरुवातीला एक प्रस्ताव मंजूर केला होता. प्रकरण क्र. २७, छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (काशिमिरा रोड) उन्नत मार्ग, पादचारी पुल (Pedestrians Grade Separators / Subway Project) बांधणे कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) येथे राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ काशिमिरा नाका ते वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज मार्ग हा विकास योजनेतील ४५.०० मीटर रूंदीचा रस्ता असून शहरात येण्या-जाण्यासाठी संदर एकमेव प्रमुख रस्ता आहे. सदर रस्त्यावर वाहतूकीचा प्रचंड ताण असून सकाळ-संध्याकाळच्या वेळेस वाहतूकीचा खोळंबा होत असतो. सदर रस्त्यावर सात ठिकाणी सिग्नल आहेत. वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ येथे पोहोचण्यासाठी रहदारीच्या वेळेस २५ ते ४० मिनिटे वेळ लागतो. सदर रस्त्यावर खालील ठिकाणी उन्नत पुल/भुयारी मार्ग तसेच पादचारी पुल बांधण्याची आवश्यकता असून मा. स्थायी समितीच्या मान्यतेने मे. मोनार्च सर्व्हेअर्स ॲन्ड इंजिनिअर्स कंन्सल्टंट प्रा. लि. यांची सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तांत्रिक सल्लागार म्हणुन नेमणुक करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | ठिकाण | प्रस्तावित काम |
|---|---|---|
| १) | वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) | पादचारी पुल |
| २) | दिपक हॉस्पीटल समोरील चौक | उन्नत मार्ग |
| ३) | टाऊन पार्क समोरील चौक | उन्नत मार्ग |
| ४) | कनकिया चौक (मॅक्डोनल्ड जवळ) | उन्नत मार्ग |
| ५) | श्रीकांत जिचकर चौक (एस.के. स्टोन) | उन्नत मार्ग |
| ६) | सिल्व्हर पार्क चौक | उन्नत मार्ग |
| ७) | हटकेश उद्योगनगर चौक | उन्नत मार्ग |
| ८) | प्लेझंट पार्क चौक | उन्नत मार्ग |
| ९) | काशिमिरा नाका (छत्रपती शिवाजी महाराज पुतळया पाठीमागे) | पादचारी पुल |

प्रस्तावित कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून हाती घेणेबाबत पाठपूरावा करण्यात येत आहे, तथापी सदर कामे ही महानगरपालिकांतर्गत येणारी स्थानिक स्वरुपाची कामे असल्याने सदर कामे प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणार नाहीत असे धोरण निश्चित झाल्याचे त्यांनी कळविलेले आहे. शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने वरील प्रस्तावित ठिकाणी पादचारी पूल व उन्नत मार्ग बांधणे आवश्यक आहेत. सदर कामांसाठी रु. ३९.३२ कोटी एवढा खर्च अपेक्षित असून त्यापैकी वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) येथील पादचारी पूलासाठी शासनाकडून विशेष अनुदान म्हणून उपलब्ध झालेले आहे. तरी सदर कामाची रक्कम वगळून उर्वरीत ३७.८२ कोटी रक्कमेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामासाठी तातडीने निविदा प्रसिध्द करण्यात याव्यात तसेच अर्थसंकल्पात चालू वर्षात लागणारा आवश्यक निधी पूर्नविनियोजनाव्दारे उपलब्ध करुन देण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय सदर विषयासाठी आपण नंतर बैठक बोलावून प्रेझेंटेशन नगरसेवकांना द्या. ह्या वर्षात काम तरी सुरु होतील का?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

होईल.

**नरेंद्र मेहता :-**

कधीपर्यंत दिवाळीच्या अगोदर. बजेटला तरतूद आहे. मा. आयुक्तांचे अंदाजपत्रक दिले त्याच्यात तरतूद आहे का? "क" खाली ४० कोटीचा ठराव ५ कोटी असताना मंजूर शकतो. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) येथे राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ काशिमिरा नाका ते वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज मार्ग हा विकास योजनेतील ४५.०० मीटर रूंदीचा रस्ता असून शहरात येण्या-जाण्यासाठी सदर एकमेव प्रमुख रस्ता आहे. सदर रस्त्यावर वाहतूकीचा प्रचंड ताण असून सकाळ-संध्याकाळच्या वेळेस वाहतूकीचा खोळंबा होत असतो. सदर रस्त्यावर सात ठिकाणी सिग्नल आहेत. वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ येथे पोहोचण्यासाठी रहदारीच्या वेळेस २५ ते ४० मिनिटे वेळ लागतो. सदर रस्त्यावर खालील ठिकाणी उन्नत पुल/ भुयारी मार्ग तसेच पादचारी पुल बांधण्याची आवश्यकता असून मा. स्थायी समितीच्या मान्यतेने मे. मोनार्च सर्व्हेअर्स ॲन्ड इंजिनिअर्स कंन्सल्टंट प्रा. लि. यांची सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तांत्रिक सल्लागार म्हणुन नेमणुक करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | ठिकाण | प्रस्तावित काम |
|---|---|---|
| १) | वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) | पादचारी पुल |
| २) | दिपक हॉस्पीटल समोरील चौक | उन्नत मार्ग |
| ३) | टाऊन पार्क समोरील चौक | उन्नत मार्ग |
| ४) | कनकिया चौक (मॅक्डोनल्ड जवळ) | उन्नत मार्ग |
| ५) | श्रीकांत जिचकर चौक (एस.के. स्टोन) | उन्नत मार्ग |
| ६) | सिल्व्हर पार्क चौक | उन्नत मार्ग |
| ७) | हटकेश उद्योगनगर चौक | उन्नत मार्ग |
| ८) | प्लेझंट पार्क चौक | उन्नत मार्ग |
| ९) | काशिमिरा नाका (छत्रपती शिवाजी महाराज पुतळया पाठीमागे) | पादचारी पुल |

प्रस्तावित कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून हाती घेणेबाबत पाठपूरावा करण्यात येत आहे, तथापी सदर कामे ही महानगरपालिकांतर्गत येणारी स्थानिक स्वरुपाची कामे असल्याने सदर कामे प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणार नाहीत असे धोरण निश्चित झाल्याचे त्यांनी कळविलेले आहे. शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने वरील प्रस्तावित ठिकाणी पादचारी पूल व उन्नत मार्ग बांधणे आवश्यक आहेत. सदर कामांसाठी रु. ३९.३२ कोटी एवढा खर्च अपेक्षित असून त्यापैकी वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) येथील पादचारी पूलासाठी शासनाकडून विशेष अनुदान म्हणून उपलब्ध झालेले आहे. तरी सदर कामाची रक्कम वगळून उर्वरीत ३७.८२ कोटी रक्कमेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामासाठी तातडीने निविदा प्रसिध्द करण्यात याव्यात तसेच अर्थसंकल्पात चालू वर्षात लागणारा आवश्यक निधी पूर्नविनियोजनाव्दारे उपलब्ध करुन देण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मर्लिन डिसा :-**

मॅडम आज कितीतरी प्रस्ताव मांडले आणि किती तरी कामाची मंजूरी मिळाली. पण आता सध्याची रस्त्याची जी परिस्थिती आहे खूप वाईट आहे. पॅचवर्क नॉट पॉसीबल पण खडीतरी टाकून लेवलिंग करा.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मॅडम ह्याच्यावर कालच चर्चा झाली. अनुषंगाने कामाला सुरुवात झाली.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम दोन्ही सेम आहेत क्लब करुन घ्या.

**मा. महापौर :-**

कठराव मंजूर करत आहे.

**प्रकरण क्र. २७ :-**

छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (काशिमिरा रोड) उन्नत मार्ग, पादचारी पुल (Pedestrians Grade Separators / Subway Project) बांधणे कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. २९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) येथे राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ काशिमिरा नाका ते वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज मार्ग हा विकास योजनेतील ४५.०० मीटर रूंदीचा रस्ता असून शहरात येण्या-जाण्यासाठी सदर एकमेव प्रमुख रस्ता आहे. सदर रस्त्यावर वाहतूकीचा प्रचंड ताण असून सकाळ-संध्याकाळच्या वेळेस वाहतूकीचा खोळंबा होत असतो. सदर रस्त्यावर सात ठिकाणी सिग्नल आहेत. वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ येथे पोहोचण्यासाठी रहदारीच्या वेळेस २५ ते ४० मिनिटे वेळ लागतो.

सदर रस्त्यावर खालील ठिकाणी उन्नत पुल/ भुयारी मार्ग तसेच पादचारी पुल बांधण्याची आवश्यकता असून मा. स्थायी समितीच्या मान्यतेने मे. मोनार्च सर्व्हेअर्स अॅन्ड इंजिनिअर्स कंन्सल्टंट प्रा. लि. यांची सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तांत्रिक सल्लागार म्हणुन नेमणुक करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | ठिकाण | प्रस्तावित काम |
|---|---|---|
| १) | वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) | पादचारी पुल |
| २) | दिपक हॉस्पीटल समोरील चौक | उन्नत मार्ग |
| ३) | टाऊन पार्क समोरील चौक | उन्नत मार्ग |
| ४) | कनकिया चौक (मॅक्डोनल्ड जवळ) | उन्नत मार्ग |
| ५) | श्रीकांत जिचकर चौक (एस.के. स्टोन) | उन्नत मार्ग |
| ६) | सिल्व्हर पार्क चौक | उन्नत मार्ग |
| ७) | हटकेश उद्योगनगर चौक | उन्नत मार्ग |
| ८) | प्लेझंट पार्क चौक | उन्नत मार्ग |
| ९) | काशिमिरा नाका (छत्रपती शिवाजी महाराज पुतळया पाठीमागे) | पादचारी पुल |

प्रस्तावित कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून हाती घेणेबाबत पाठपूरावा करण्यात येत आहे, तथापी सदर कामे ही महानगरपालिकांतर्गत येणारी स्थानिक स्वरुपाची कामे असल्याने सदर कामे प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणार नाहीत असे धोरण निश्चित झाल्याचे त्यांनी कळविलेले आहे.

शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने वरील प्रस्तावित ठिकाणी पादचारी पूल व उन्नत मार्ग बांधणे आवश्यक आहेत. सदर कामांसाठी रु. ३९.३२ कोटी एवढा खर्च अपेक्षित असून त्यापैकी वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) येथील पादचारी पूलासाठी शासनाकडून विशेष अनुदान म्हणून उपलब्ध झालेले आहे. तरी सदर कामाची रक्कम वगळून उर्वरीत ३७.८२ कोटी रक्कमेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामासाठी तातडीने निविदा प्रसिध्द करण्यात याव्यात तसेच अर्थसंकल्पात चालू वर्षात लागणारा आवश्यक निधी पूर्नविनियोजनाव्दारे उपलब्ध करुन देण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही /-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नरेंद्र मेहता :-**

भाजप तर्फे ह्या शहरातील मुस्लिम बांधवांना सन्मा. सदस्य नगरसेवकांना रमझानच्या शुभेच्छा देतो.

**दुःखवटा ठराव ३० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन्मा. नगरसेविका सौ. सुमन कोठारी यांच्या जाऊ सौ. विमला देवी कोठारी यांचे अकस्मित निधन झालेले आहे. तसेच शिवसेनेच्या गटनेत्या सौ. निलम ढवण ह्यांच्या मातोश्री श्रीम. चंद्रभागा दत्तात्रेय जठार ह्यांचे १ जुलै २०१४ रोजी वृध्दपकाळाने निधन झाले आम्ही त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पित करतो. यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी असा मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- सौ. नयना वसाणी**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

सही/-
महापौर
मिरा भाईदर महानगरपालिका

**मा. महापौर :-**

सभा संपली असे मी जाहिर करते.

**(सभा संपण्याची वेळ ४.२५)**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५।०७।२०१५

## //गोषवारा//

**प्रकरण क्रमांक ( ४८ ) :-** पुर्नविनियोजन प्रस्तावास मान्यता देणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध विकास कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येतात. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वार्षिक अर्थसंकल्पात विविध लेखाशिर्षाखाली तरतुद करण्यात येतात. मा. आयुक्त यांच्या अंदाजानुसार मा. स्थायी समितीपुढे अर्थसंकल्प सादर करण्यात येतो. मा. स्थायी समितीच्या मंजुरी नंतर मा. महासभेच्या मान्यतेने अर्थसंकल्पास मंजुरी देण्यात येते. परंतु सन २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पास मा. महासभेनी दिलेली मंजूरी तांत्रिक कारणामुळे रितसर नसल्यामुळे मा. महासभेचा अर्थसंकल्प मंजूरीचा ठराव विखंडीत करण्यासाठी शासनाकडे पाठविण्यात आला होता. शासनाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही प्रस्तावित केली आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नूसार आयुक्त यांनी स्थायी समिती सभेपुढे सादर केलेल्या अर्थसंकल्पातील तरतूदीनूसार कार्यवाही करण्यात येत आहे. तथापी खालील बाबींसाठी वाढीव अर्थसंकल्पीय तरतुद करणे आवश्यक असल्यामुळे पुर्नविनियोजनचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) नगरसेवक स्वेच्छानिधी तसेच प्रभाग समिती निधी अंतर्गत मा. नगरसेवक/ नगरसेविका यांचेकडुन प्रस्ताव प्राप्त झाले असुन सदर प्रस्तावानुसार दरवर्षी ठेवण्यात येणाऱ्या तरतूदीनुसार व मा. स्थायी समितीच्या अंदाजपत्रकानुसार कार्यवाही होण्यास म्हणजेच नगरसेवक स्वेच्छानिधी अंतर्गत प्रत्येकी रु.१०.०० लक्ष व प्रभाग समिती निधी अंतर्गत प्रत्येकी रु.१५.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देणेस सतत मागणी होत असून सातत्याने सर्व मा. नगरसेवक/ नगरसेविका या बाबत पाठपुरावा करीत आहेत, तसेच सन २०१३-१४ या वर्षातील नगरसेवक स्वेच्छानिधी व प्रभाग समिती निधी अंतर्गत काही प्रस्ताव उशिरा दिल्याने सदर निधीतील कामाची प्रक्रीया होऊन दि. ३१/०३/२०१४ पर्यंत अनुक्रमे रु.३,१९,३६,५४०/- व रु.३,६७,२७,६४२/- खर्ची पडली नाही, त्यामुळे नवीन सन २०१४-१५ वर्षाच्या अर्थसंकल्पात सदर लेखाशिर्षाखाली अतिरिक्त निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. नगरसेवक स्वेच्छा निधी अंतर्गत सन २०१४-१५ या वर्षाच्या आयुक्त व मा. स्थायी समिती यांच्या अर्थसंकल्पात रु.३,३९,००,०००/- एवढा फरक असुन प्रभाग समिती निधी अंतर्गत रु.९,७५,००,०००/- एवढा फरक आहे. ३१ मार्च २५१५ पर्यंत सदर दोन्ही लेखाशिर्षातंर्गत होणारा संभाव्य खर्च पाहता नगरसेवक स्वेच्छा निधी अंतर्गत रु.६,५८,३६,०००/- व प्रभाग समिती निधी अंतर्गत रु.६,४१,६४,०००/- एवढ्या जादा निधीची आवश्यकता आहे.

२) मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील शाळा इमारत दुरुस्ती करणे कामी "शाळा इमारत दुरुस्ती निगा" या लेखाशिर्षाअंतर्गत रु.२०.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आली असुन शाळांची दुरुस्ती, डागडुजी करणेकामी रु.१००.०० लक्ष वाढीव रकमेची आवश्यकता आहे.

३) मा. पंतप्रधान यांनी घोषित केलेले "स्वच्छ भारत अभियानास" दि.०२/१०/२०१४ पासुन भारतभर सुरुवात झालेली आहे. सदर उपक्रम अंतर्गत शौचालयाची स्वच्छता/ देखभाल दुरुस्ती करणेकामी अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यानुसार १५०.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे.

(4)

४) भाईंदर (पूर्व) व (पश्चिम) रेल्वे खालील जैसल पार्क येथे सब-वे बांधणे कामाच्या नकाशांना Chief Bridge Engineer चर्चगेट, मुंबई यांनी दि. २४/०५/२०११ रोजी मान्यता दिलेली आहे. सदरील सब-वे बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदरील काम रेल्वेच्या हद्दीत असल्याने रेल्वे प्रशासनामार्फत Leviable Charges भरण्याबाबत सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. सन २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात "जैसलपार्क सब-वे/ पोहच रस्ते" या लेखाशिर्षाखाली रु.५००.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आली असुन सदरील लेखाशिर्षाअंतर्गत सद्यास्थितीत तरतुद संपलेली आहे. सदर लेखाशिर्षा अंतर्गत ३५०.०० लक्ष वाढीव तरतुद रेल्वेकडे भरण्याकरीता उपलब्ध करणे आवश्यक आहे.

५) मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील स्मशानभुमींची दुरुस्ती करणेकामी "सार्वजनिक स्मशानभुमी व दफनभुमी दुरुस्ती" या लेखाशिर्षाअंतर्गत रु.२०.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली असुन सदर स्मशानभुमींची व दफनभुमींची दुरुस्ती करणेकामी रु.४५.०० लक्ष वाढीव रकमेची आवश्यकता आहे. नगरभवन येथील कामे करणेकरीता "नगरभवन रंगकाम/ इतर कामे" या लेखाशिर्षाअंतर्गत रु.१.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली असुन नगरभवन येथील किरकोळ कामे करणे कामी रु.७.०० लक्ष वाढीव रकमेची आवश्यकता आहे. तसेच महानगरपालिका हद्दीतील मनपाच्या विविध "सार्वजनिक इमारती दुरुस्ती करणेकामी" या लेखाशिर्षाअंतर्गत रु.२०.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली असुन सदर इमारतीची दुरुस्ती कामी करणेकरीता रु.६०.०० लक्ष वाढीव रकमेची आवश्यकता आहे. "गटारे दुरुस्ती/ झाकणे बसविणे" या लेखाशिर्षाअंतर्गत रु.२५०.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली असुन गटारावरील झाकणे बसविणे तसेच गटाराची दुरुस्ती करणे कामी रु.५०.०० लक्ष वाढीव रकमेची आवश्यकता आहे. "वाचनालय विकास" या लेखाशिर्षाअंतर्गत रु.५.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली असुन वाचनालय विकास या लेखाशिर्षाअंतर्गत रु.१०.०० लक्ष वाढीव रकमेची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे "सार्वजनिक इमारती/ सिग्नल विजबिल" या लेखाशिर्षाअंतर्गत रु.१००.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली असुन सार्वजनिक इमारती/ सिग्नल विजबिल करणेकामी रु.५०.०० लक्ष वाढीव रकमेची आवश्यकता आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील "विविध विकास कामांचे त्रयस्य लेखापरिक्षण करणे" कामी या लेखाशिर्षाअंतर्गत रु.३०.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली असुन सदरील लेखाशिर्षाअंतर्गत रु.२३.०० लक्ष वाढीव रकमेची आवश्यकता आहे.

उपरोक्त प्रस्तावित कामे विहीत कार्य पध्दती अवलंबून खर्च ३१ मार्च २०१५ पर्यंत होणे आवश्यक असल्याने सदर प्रस्तावास तातडीने मान्यता मिळण्याची आवश्यकता आहे. सोबत पुर्नविनियोजन प्रस्ताव विहीत नमून्यात जोडला आहे. सदर पुर्नविनियोजन प्रस्तावास मा. स्थायी समिती सभा दि.२९/१२/२०१४ ठराव क्र. ९८ अन्वये मंजुरी प्राप्त आहे. तरी सदर पूर्नविनियोजन प्रस्तावास अंतिम मान्यता देणेस शिफारस आहे.

आयुक्त 2/1/15

मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पुर्नविनियोजन पत्रक

नमुना क्र.१० नियम ३० (३) पहा.

| या शिर्षातून | | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
